नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

युगवाणी

दिवाळी-१९४७, १९४९, १९५०,
१९५२, १९५४

अनुक्रमणिका



युगवाणी

ावली अंक नोव्हेंबर १९४७

अनुक्रमणिका

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

युगवाणी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

★ नोव्हेंबर-डिसेंबर अंक

अनुक्रमणिका

* * *

किरकोळ अंकास १२ आणे

निवेदन—

'युगवाणी'चा नोव्हेंबर अंक दिपावली अंक म्हणून काढावयाचे योजिलें होतें. परंतु अनपेक्षित व अपरिहार्य अडचणींमुळे नोव्हेंबर अंक नोव्हेंबर महिन्यांत निघूं शकला नाही. म्हणून हा अंक नोव्हेंबर-डिसेंबर जोड अंक काढांत आहे याबद्दल वर्गणीदार व ग्राहकांनी क्षमा करावी. या अंकाने बहुतेक सर्व वर्गणीदारांची १९४७ सालची वर्गणी संपत आहे. यापुढे युगवाणी नियामितच नव्हे तर आकर्षक निघेल येवढेंच तूर्त आश्वासन देतों. वर्गणीदार व ग्राहकांनी युगवाणीवरील लोभ पूर्ववत् ठेवल्यास हें शक्य आहे व त्यांनी तो तसा ठेवून आभारांत ठेवावें अशी विनंती आहे.

गतवर्षांत युगवाणीला अनेक विद्वान् आणि अधिकारी लेखकांनी निरपेक्ष लेखनसाहाय्य केलें. त्यांच्या साहाय्याशिवाय युगवाणी केवळ पोरकी झाली असती हें निश्चित्. त्यांनी केलेल्या अमूल्य साहाय्याबद्दल मी त्यांचा मनोमन आभारी आहे. त्यांनी युगवाणीवरील प्रेम व लोभ पूर्ववत् कायम ठेवावा व युगवाणीच्या अनियामितपणामुळे त्यांवर जो कांही अन्याय झाला असेल त्याबद्दल उदार मनाने क्षमा करावी.

शेवटीं श्री. वा. ना. देशपांडे यांच्या बहुमोल मदतीचा व तत्परतेचा उल्लेख न केल्यास मी कृतघ्न ठरेन. श्री. वामनराव देशपांडे यांनी युगवाणीच्या संपादनांत यत्किंचित्‌हि कसूर केलेली नाही. उलट युगवाणीचें नांव, रूप केवळ त्यांच्यामुळेच शिल्लक राहिलें. त्यांनी दिलेल्या या सहकाराबद्दल मी त्यांचा नित्य आभारी राहीन.

आपला

प्रकाशक

★

अनुक्रमणिका

विदर्भ-साहित्य-संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष २ रें
अंक ११ वा

: संपादक :
वामन नारायण देशपांडे

नोव्हेंबर-
१९४७

आशिया

* * *

कोण गर्जताहे !
पूर्वेच्या क्षितिजीं, निर्घन गगनीं
तापल्या उन्हांत, आरक्त नेत्रांनी
कुणा हाक देत, आव्हानीत कुणा, कोण येत आहे !
कोण गर्जताहे !

— २ —

बर्फानी झाकलीं, युगाची झोपलीं
पर्वतशिखरें हिमालयाचीं तीं आज दचकलीं.
तुडवीत तटा, ब्रम्हपुत्र नद
निघे उन्मादांत
जागलीं मनांत कोणती नवीन ऋचा ऐशीं !
हिंदवी सागर
खवळे उफळे
फोडिताहे बळें दिशांचें कपाट धूमिल धूसर
मनीं खोल खोल त्याच्या वडवाग्न
जागून का ओकी
आज आगलोळ संहाराचे ?
हिरवें हिरवें अग्निगर्भ पाणी
गिळू पाहे पृथ्वी पाताळ जाळोनी
त्याचा प्रलयाचा पडघम वाजे सहस्त्र लाटांनी
आव्हान कुणा हें !
कोण गर्जताहे !

— ३ —

गर्जत तापलें इंफालचें रण
गर्जती तृषित त्याचे धूलिकण,
मातीच्या मनांत तेजोमेघस्वप्न
आज जागताहे,
प्रतिकार तिचा आज गर्जताहे
आकाशवाणी ही
आशियाखंडाची
भीषण हा साद रूद्राच्या डमरूचा ऐकून धावले,
देशोदेशींहून
द्वीप द्वीपाहून
झुंजार तरुण
पेटवाया रण अधीर उन्मत्त.
पहा, हीन दीन हे कृश दुर्बळ
समिधाच शुष्क या रणयज्ञाच्या
उपाशी–ताप [illegible] शी यांतील कितीक
खावोनी ग [illegible] त राहिले कितीक
वेदही न [illegible] ड, तनुच्याहि चिंध्या
शस्त्रही न [illegible] करीं
घोर द [illegible] का–गिरिं
लंघीत [illegible] धावत आले अनवाणी;
उतू [illegible] जाय यांच्या नेत्रीं तप्त लाव्हा
जिवं [illegible] त जागते उभे ज्वालामुखी !

— ४ —

प्र [illegible] चंड उन्मत्त फेनिल या लाटा
पू [illegible] र्वेच्या प्रशांत महासागराच्या
की आज जागल्या
धुंद खवळल्या
स्वातंत्र्याकांक्षेने
या सिंधु-तांडवीं
क्रांतीचें स्थंडिल होय प्रज्वलित
घुमें क्रांतिगीत त्याच्या गर्जनेंत, इंफालरणांत.
या नव क्रांतीचा उद्‌गाता सुभाष
रचि आशियाची
ऋचा स्वातंत्र्याची
'रक्ताचे दान द्या, रक्ताचे दान घ्या.
पहा पहा पुढे,'

ध्वस्त टेकड्यांच्या
गिरींच्या नद्यांच्या
कृष्ण जंगलांच्या उषेने रंगल्या गूढ क्षितिजाच्या
पलिकडे दूर —
सुवर्णभूमिती
वरदायिनी ती
प्रिय हिंदभूमि वाहते तुम्हांस
व्याकुळ नेत्रांनीं
त्या जन्मभूमीचें, दिव्य भारताचें
चिंतन मनांत करा अहोरात्र.
उज्वल प्रकाश तेथील सूर्याचा
सुधा-शांत रम्य तेथील चांदणें
नद्या त्या देशींच्या आलापिती गीत,
निश्चयें निश्चल तेथील पर्वत
तेथे वृक्षांतळीं निगूढ छायांत
महान् ऋषींनी जीवनरहस्यें जगा सांगितलीं.
महान् तो देश होतांच स्वतंत्र
क्षणीं तुटतील आशियाचे बंध.
परंतु त्यासाठी
आधीं ह्या मातीस
रक्ताचें दान द्या, रक्ताचें दान द्या.
-वाणी ही ऐकून
मुग्ध धरणीचें अंग अंग झालें
तव्हा रोमांचित
उन्हांत नाहलें उज्वल आकाश
फेसाळती दिशां नव्या प्रकाशाने
किती युगेयुगें पदीं चुरडून
रक्तांत भिजून
चूर झालेले ते उद्याचे अरूण
अज्ञात अनंत
दिवसाच्या मनीं आज जागता

— ५ —

इंफालयुद्धांत लढलेले योद्धे
'हुकुमते आझाद हिंद'च्या फौजेचे
ते वीर शिपाई आशियाखंडाचे
आखिल मानवी दिव्य स्वातंत्र्याचे
शूर शिलेदार
एकत्र झुंजले
एकेठायीं मेले
अखंड आशिया-स्वप्न साकारलें !
हिंदी, ते चिनी, हिंद भारतीय
ह्हद रचना कुणा, ब्रम्ही, मलायी ते
तिबेटाच्या क्रूर पर्वतांमधील सुळक्यासारिखे
बघा ते पहाडी, इराणी दुराणी
लावून खांद्यास खांदा ते राहिले उभे, अविचल.
जणूं भविष्याच्या रम्य दिवसांची
पुंजाळलेली रम्य मालिकाच !

— ६ —

ती रोमहर्षण इंफालरणाची
कथा इतिहासीं असेल लोपली,
किनारेल काळ्या विस्मृतिधारांनी
उद्यां कधीतरी,
असेल-असूं द्या-पराभव झाला
पहिल्या आझाद हिंदवी सेनेचा,
असेलहि झाली उध्वस्त ती सेना
सेनानीहि तिचा असेल निमाला
अज्ञात, अपेश पदरीं बांधून;
त्याग, रक्तदान
दिव्य प्राणदान
असेलहि झाले सारे सारें आज
विफल विफल !
परी त्या भीषण विनाशांमधून
विफलतेंतून, त्याच राखेंतून
अग्न न मिळाल्या वीरांच्या शवांच्या
रानीं पसरल्या जीर्ण अस्थींतून
वनीं गिधाडांनीं फोडिल्या कोरिल्या अंध नेत्रांतून
जागली जागली !
विशाल आशिया !!

— ७ —

शब्दरूप झाली
स्वातंत्र्याकांक्षा ही समर्थ संयुक्त विशाळ पूर्वेची.
गिळाया पश्चिम साम्राज्यसत्तेस
वीरभद्र जागा होय प्रलयीचा,
भव्य आशियाचें पहिलें वहिलें
एक जागरण विराट, विक्राळ
दिव्य हिरण्मय !

— ८ —

ह्याच जागलेल्या नेत्रांचे स्फुल्लिंग
पॅलेस्टाईनांत आज उडतात
ईजिप्त इराण

आझर बैजान
मांडितात सर्व प्रकाशपूजन नव्या प्रात:काळीं,
खाली ठेवोनिया सुरापात्र आता
खय्यामचा साकी
ओती अन्नधारा !
म्हणून गुलाबा हृदय-रक्तांत,
गाईन बुलबुल गीत विरहाचे
पथांत धुळींत, बळींच्या रक्तांत
फुलती गुलाब !

— ९ —

हिंदचिनी पहा, अनामी युवक
शुभ्र हस्तिदंत!—
मदाने नाहून, लंगर तोडून
स्वैर सुटलेल्या मत्त मातंगाचे
शुभ्र हस्तिदंत, क्रूर वज्रदंत !
घेउनि धडक ऐरावतीशींहि
सत्तांध इंद्रास पायीं चेंदतील
इंद्रदंतीच्या गंडस्थळांतील मुक्ताफळांनीं ते
ओटी भरितील दीन धरणीची !

१०

शृंगार तरुण यवद्वीपाचे हे
पन्नग गव्हाळे !
पाताळीं घातल्या बळींचे वंशज
वडवाग्न ज्वाल !
सिंधुंतून आले
साम्राज्यसत्तेस देती उलथून.
जाळुनिया घरें, त्याच्या प्रकाशांत
धावतात घेत शत्रूचां ते वेध
कालाच्या कराल कृपाणा परी
हिंदसागरांत आपुल्या रक्ताने
पोवळ्यांचे बेट
स्वातंत्र्याचा स्वर्ग
निर्मिती हे वीर यवद्वीपाचे.

— ११ —

मलाई शिपाई
तेही सज्ज झाले
आशियादेवीच्या स्वातंत्र्ययज्ञास
हिंदसागराचा हिमशुभ्र फेन
मळूं न देतील
कुणा परक्यांच्या मत्त पाऊलाने.

— १२ —

सोनेरी पिवळा हा चिनी तरूण
गुलाम पूर्वेच्या आरुणी नेत्राचा
तप्त सोनियाचा अश्रु ओघळला
आशियाच्या गालीं !
भाजल्या जिवांची
दग्ध नगरांची
जळल्या पिकांची
आग याच्या मनीं पेट घेई
बाजारी भोगिल्या स्त्रियांच्या लज्जेचे
चिरिल्या बाळांच्या अजाण रक्ताचे
रंग यांच्या नेत्रीं
जागून उठती पहाट पूर्वेची उजळाया !
विश्वबंधुतेची
बुद्धाच्या दयेची
अश्रुधार याची
बळींच्या रक्ताने लाल लाल झालीं;
समरज्वाला ही
उफळली त्याची
शांत दयामय बुद्धाच्या अस्थींत
श्वासें फुलवीत ठिणग्या सूडाच्या !

— १३ —

प्रशांत सिंधूच्या उरांत जागलें
ज्वालामुखी-स्वप्न एक भयंकर !
रम्य कमळांचा
आरक्त ‘ चेरी ’ चा नागाकृति देश
पूर्वेस फुंफाटे ओकी विषवन्हि !
साम्राज्यसत्तेच्या राक्षसी ईर्षेने
मानवांच्या उरीं देऊनिया पाय
सूर्याचे ते पुत्र नाचती बेहोष
आशिया गुलाम कराया निघाले
उन्मत्त युद्धाश्व या सामुरायाचे
झेपेंत टापांनीं तुडवूं पाहती नभी सूर्यबिंब !
मंचूरिया गेला
चीन तुडविला
पाश आवळिला ब्रम्हदेशासही
पेटलेले देश, शेतांचे शिवार
कणसें डोलतीं कापल्या शिरांचीं जळत्या दाठांना !
फेसाळल्या नव्या रक्ताच्या धारांनी

निर्जन नगरीं शून्यपथावरि
हासती विकट हुतात्म्यांचीं प्रेतें.
पडक्या बुरुजीं फाटकें, निशाण
चालती भोंवती सणसण गोळ्या
बर्ळीच्या किंकाळ्या
स्त्रियांचे आक्रोश
प्रेतांस फाडून नभीं हिंडणाऱ्या
क्रूर गिधाडांचा कर्कश चित्कार!
शहरोंशहरीं मृत्यूचें तांडव
पदोपदीं पथीं संगीनमारांनी
विव्हळती वीर देशभक्त
तेथेच स्त्रियांही नग्न विटंबित
घोर वेदनांनी आक्रोशें क्रंदती
स्तनांतीं लोंबतीं शिरें अर्भकांचीं
कापलीं रक्ताळ!
विजयाने मत्त सत्तामदें धुंद
धावती चौफेर जपानी सैनिक
कराया आशिया बध्द शृंखलांनी
साम्राज्य-पिशाच्च नाचें सामुरायी
कुंड संहाराचें पेटवून
आसवी झुरत, रक्ताळली माती
कुशींत घेऊन प्रेतांस विचारी
'कोण अडवील संहार देत्या या!'
तोंच अणुस्फोट होय भयंकर
तुकडे होऊन कोसळे अंबर
उडून धरा ही जाय आकाशांत
खालीवरी कोंदे भयानक धूर
नभ पृथ्वी सारें अंध-अंधकार!
उठे चोहीकडे कल्पांत आक्रोश
मेघ वर्षतात दिशांत ज्वालांचे!—
क्षणांत नंतर
विझत्या ज्वाळांत विरत्या धुरांत
खाखुंडी झालेल्या भूमिवरी तेथे
घोर रात्रिंचर पडे उलथून
साम्राज्यसत्तेचा
फुजी' च्या कुशींत सुप्त मृत एक
ज्वालामुखी दुजा!
ज्वालामुखी-स्वप्न साम्राज्यसत्तेचें
क्रूर संहाराचें संपलें हें सर्व
आजचे निखारे होतील उद्या ते
कोमल सुमनें आरक्त चेरीचीं, चेरीचीं
याच रम्य रंगीं फुलांच्या रंगली
शांति-स्वातंत्र्याची उषा आशियाची

— १४

नील नदीची तीं आनील संतानें
जंगले तयांची आजला जागली
स्वातंत्र्याकांक्षेने
सुटे झंझावात
घन जंगलांच्या पिकल्या पानांत,
वाळवंटामधी, वाहत्या वाळूंत
वाहटुळीमधी वाळूच्या मेघांत
गर्जती भीषण क्रांतीचे तोडर!
धूलिस्तंभावरी वाळूवरी गेले
रोमन साम्राज्य मुसोलिनीचे ते.
गुलाम म्हणोनी ज्या श्यामवर्णांची
क्रीडानंदीं होळी केली चव्हाट्यांत
त्यांच्या चितांतून आज जागतात
तेजाचे विहंग
स्वातंत्र्याचें गीत गात आशियाचे!
हबशाणांच्या या काजळी रंगांत
दीन दलितांचे सर्व मानवांचे
सहानुभूतीचे सांद्र अश्रुघन येती ओथंबून

— १५ —

व्होल्गानदीतीर शुभ्र हिमावृत
जणु पसरले अजून धुक्यांत
जीवनानंदाचे प्रीतीच्या स्मिताचे आदिभावनाचे
रूपेरी स्वप्न!—
व्होल्गा नदी तीर
गातात मध्यान्हीं इथे रातछाया
मध्यरात्रीं उन ओसडे रुपेरी
चांदणें चंदेरी हासते दुपारी
तिमिरयुगाच्या आदिमानवाची विहारभूमि ही
व्होल्गानदी-तीर!
प्रिया अधरींची चुंबनमाधुरी
व्यथा, विश्रब्धता ऊर्व धडधड
आलिंगनांतील दोन हृदयांची
पाहिल्या प्रथम प्रगटल्या येथें मीलन रात्रींत
जागवून एक उद्दाम वादळ

प्रभाथी भावांचें आशाभिलापांचें सहानुभवांचे
इथेच नादली
पहिली किंकाळी प्रसुतिव्यथेची
आत्मप्रतिमेची नवनिर्माणाची जन्मरहस्याची
चिरंजीवित्वाची
नवी अनुभूती–
हर्षपुलकित व्यथा कंपाकुल
सस्मित सद्गद संमिश्र प्रत्यय चिरजीवनाचा !
तरूणी कुचांत रतिरस कुंभात
मातृवात्सल्याचा गोड शूल आधी इथेच उठला;
त्याच्या पाठोपाठ फुटे दुग्धधारा
जेवि धरित्रीची–अन्नदेवतेची
जीवनदानाची तळमळ, पूर्ति !
या हास्यअश्रूंत, या दुग्धधारेंत
या हर्षखेदांत, या स्वेदरक्तांत
तमोयुगांतून आजच्या दिनाची दिशा उजळली.
उद्याच्या जगाचा, नवमानव्याचा
येथेच होतसे नवा आविष्कार !
नवीन विश्वाचा जागे विश्वकर्मा, तोच हा रशिया
क्रांतीचें प्रेषित
व्होल्गा नदीतीर.
मानवतेचा हा नवा अविष्कार
समतेचें हें स्वप्न
दलितांची क्रांति विप्लवस्फुरण
ध्वंसाया धावले सत्तेचे झोटींग दैत्य धनोमत्त
वर्षत भीषण संहाराची शस्त्रें
पेटे पश्चिमेंत घोर महायुद्ध
धुंदकसरे भूमि गगनवितान.
गडाडल्या तोफा, कडाडलें नभ
तडकली पृथ्वी, पेटले निखारे बर्फखंडातून
आवेशें रणांत निखाऱ्याहुनी या
झुंजत चालती व्होल्गेचे ते पुत्र.
व्होल्गेच्या पाण्यांत
खळाळुनी नाचे हुतात्म्याचे रक्त
सूडाचे तुफान फुत्कारे वाऱ्यांत
घरोघरीं जागें प्रतिकारशक्ति असह्य अवध्य पीडि-
तांचें तेज !
अघोर संहार, भयंकर रण
डॉन नदी वाहे ज्वालांच्या लाटांनी
वसंत फुलवी आगीचा मोहोर !
राख नगरांची, पिकांचे कोळसे
प्रेताचा चिखल, चाले तुडवीत रशियाचा रुद्र
विजय वाटेने.
याच मार्गावरीं परी पदोंपदीं
प्रेतें पसरलीं असंख्य वीरांची विच्छिन्न भ्यानुर
बर्फात पुरलीं वृकांनी फाडिलीं,
गोठलेले देह थिजलेले डोळे
विंवणार नाही ज्यांत उषा संध्या कधींहि हासरी !
तेथेच पडलीं नग्न विटंबिलीं स्त्रियांची शरीरें
लुटलेली लाज जयांची निःशब्द
हंदके देतसे अजून बर्फात !
बालकांचीं शिरें कुठे लोळतात, धडांहुनी दूर
रडवीं हासरीं मुखें सान सान भीतीने बावळीं
तैसाच तोंडांत भाकरीचा घास
त्यांच्याच रक्ताने रंगला, गोठला
'आपल्या मुखीच्या स्वातंत्र्यकवळ
नाहीं घेऊं दिला कुणाही शक्तीला'
असेंच सांगून विकट हासतीं भेसूर हीं मुखें
छिन्न स्तन कुठें धरोनिया करीं
चोखींत पडलीं शवें बालकांचीं
बाळांसह पोटीं साठविते पृथ्वी
मातेच्या स्तनांचीं दिव्य वज्रधारा भाविकालासाठीं
चिरिल्या गर्भाचे ते भ्रूण पडले
मृदुगर्भनालीं अजून गुंतले
रूतले मातींत गर्भाचे हे नाल
अमरवेलींच जणुं स्वातंत्र्याच्या रुजल्या भूमींत !
विनाशावरी या घोर भयंकर
शुभ्र पसरले बर्फाचे पदर—
निःशब्द निस्तब्ध बर्फाचे हे थर
अपार घृणा की निस्तल विषाद
अचल कठोर गंभीर मौन का प्रलयरुद्राचें
व्होल्गा नदी तीरीं !
घोर अत्याचार दुःख अपमान
दारूण संकटे वेदना सहून
जहर पिऊन, आग पचवून पचवून
दिव्य बलिदान खंडिलीं देऊन
संहारानलाच्या या ज्वालांमधून निजाचितेंतून
विजयी रशिया प्रगटे हासत

निर्जन नगरीं शून्यपथावरि
हासती विकट हुतात्म्यांचीं प्रेतें .
पडक्या बुरुजीं फाटकें निशाण
चालती भोंवती सणसण गोळ्या
बळींच्या किंकाळ्या
स्त्रियांचे आक्रोश
प्रेतांस फाडून नभीं हिंडणाऱ्या
क्रूर गिधाडांचा कर्कश चित्कार !
शहरोंशहरीं मृत्यूचें तांडव
पदोपदीं पथीं संगीनमारांनी
विव्हळती वीर देशभक्त
तेथेच स्त्रियांही नग्न विटंबित
घोर वेदनांनी आक्रोशें क्रंदती
स्तनांसीं लोंबतीं शिरें अर्भकांचीं
कापलीं रक्ताळ !
विजयाने मत्त सत्तामदें धुंद
धावती चौफेर जपानी सैनिक
कराया आशिया बध्द शृंखलांनी
साम्राज्य–पिशाच्च नाचें सामुरायी
कुंड संहाराचें पेटवून
आसवी झुरत, रक्ताळली माती
कुशींत घेऊन प्रेतांस विचारी
' कोण अडवील संहार देत्या या ! '
तोंच अणुस्फोट होय भयंकर
तुकडे होऊन कोसळे अंबर
उडून धरा ही जाय आकाशांत
खालीवरी कोंदे भयानक धूर
नभ पृथ्वी सारें अंध–अंधकार !
उठे चोहीकडे कल्पांत आक्रोश
मेघ वर्षतात दिशांत ज्वालांचे !—
क्षणांत नंतर
विझत्या ज्वाळांत विरत्या धुरांत
राखुंडी झालेल्या भूमिवरी तेथे
घोर रात्रिंचर पडे उलथून
साम्राज्यसत्तेचा
' फुजी ' च्या कुशींत सुप्त मृत एक
ज्वालामुखी दुजा !
ज्वालामुखी–स्वप्न साम्राज्यसत्तेचें
क्रूर संहाराचें संपलें हें सर्व

आजचे निखारे होतलि उद्या ते
कोमल सुमनें आरक्त चेरीचीं, चेरीचीं
याच रम्य रंगी फुलांच्या रंगली
शांति–स्वातंत्र्याची उषा आशियाची

— १४ —

नील नदीची तीं आनील संतानें
जंगले तयांची आजला जागली
स्वातंत्र्याकांक्षेने
सुटे झंझावात
घन जंगलांच्या पिकल्या पानांत,
वाळवंटामधी, वाहत्या वाळूंत
वाहटुळीमधी वाळूच्या मेघांत
गर्जती भीषण क्रांतीचे तोडर !
धूलिस्तंभावरी वाळूपरी गेले
रोमन साम्राज्य मुसोलिनीचे ते.
गुलाम म्हणोनी ज्या श्यामवर्णांची
क्रीडानंदीं होळी केली चव्हाट्यांत
त्यांच्या चितांतून आज जागतात
तेजाचे विहंग
स्वातंत्र्याचें गीत गात आशियाचे !
हबशाणांच्या या काजळी रंगांत
दीन दलितांचे सर्व मानवांचे
सहानुभूतीचे सांद्र अश्रुघन येती ओथंबून

— १५ —

व्होल्गानदीतरि शुभ्र हिमावृत
जणु पसरले अजून धुक्यांत
जीवनानंदाचे प्रीतीच्या स्मिताचे आदिमावनाचे
रुपेरी स्वप्नच !–
व्होल्गा नदी तीर
गातात मध्यान्ही इथे रातछाया
मध्यरात्रीं उन ओसडे रुपेरी
चांदणे चंदेरी हांसते दुपारी
तिमिरयुगाच्या आदिमानवाची विहारभूमि ही
व्होल्गानदी-तीर !
प्रिया अधरींची चुंबनमाधुरी
व्यथा, विश्रब्धता ऊर धडधड
आलिंगनांतील दोन हृदयांची
पाहिल्या प्रथम प्रगटल्या येथें मीलन रात्रींत
जागवून एक उद्दाम वादळ

प्रमाथी भावांचें आशाभिलाषांचें सहानुभवांचे
इथेच नादली
पहिली किंकाळी प्रसुतिव्यथेची
आत्मप्रतिमेची नवनिर्माणाची जन्मरहस्याची
चिरंजीवित्वाची
नवी अनुभूती—
हर्षपुलकित व्यथा कंपाकुल
सस्मित सद्गद संमिश्र प्रत्यय चिरजीवनाचा !
तरूणी कुचांत रतिरस कुंभात
मातृवात्सल्याचा गोड शूल आधी इथेच उठला;
त्याच्या पाठोपाठ फुटे दुग्धधारा
जेवि धरित्रीची—अन्नदेवतेची
जीवनदानाची तळमळ, पूर्ति !
या हास्यअश्रूंत, या दुग्धधारेंत
या हर्षखेदांत, या स्वेदरक्तांत
तमोयुगांतून आजच्या दिनाची दिशा उजळली:
उद्याच्या जगांचा, नवमानव्याचा
येथेच होतसे नवा आविष्कार !
नवीन विश्वाचा जाणे विश्वकर्मा, तोच हा रशिया
क्रांतीचें प्रेषित
व्होल्गा नदीतीर.
मानवतेचा हा नवा अविष्कार
समतेचें हें स्वप्न
दलितांची क्रांति विप्लवस्फुरण
ध्वंसाया धावले सत्तेचे झोटींग दैत्य धनोमत्त
वर्षत भीषण संहाराची शस्त्रें
पेटे पश्चिमेंत घोर महायुद्ध
धुंदकसरे भूमि गगनवितान.
गडाडल्या तोफा, कडाडलें नभ
तडकली पृथ्वी, पेटले निखारे बर्फखंडातून
आवेशें रणांत निखाऱ्याहुनी या
झुंजत चालती व्होल्गेचे ते पुत्र.
व्होल्गेच्या पाण्यांत
खळाळुनी नाचे हुतात्म्याचे रक्त
सूडाचे तुफान फुत्कारे वाऱ्यांत
घरोघरीं जागें प्रतिकारशक्ति असह्य अवध्य पीडितांचें तेज !
अघोर संहार, भयंकर रण
डॉन नदी वाहे ज्वालांच्या लाटांनी
वसंत फुलवी आगीचा मोहोर !
राख नगरांची, पिकांचे कोळसे
प्रेताचा चिखल, चाले तुडवीत रशियाचा रुद्र
विजय वाटेने.
याच मार्गावरीं परी पदोंपदीं
प्रेतें पसरलीं असंख्य वीरांची विच्छिन्न भ्यातुर
बर्फात पुरलीं वृकांनी फाडिलीं,
गोठलेले देह थिजलेले डोळे
मिटणार नाही ज्यांत उषा संध्या कधीहि हासरी !
तेथेच पडलीं नग्न विटंबिलीं स्त्रियांची शरीरें
लुटलेली लाज जयांची निःशब्द
हुंदके देतसे अजून बर्फात !
बालकांचीं शिरें कुठे लोळतात, धडांहुनी दूर
रडवीं हासरीं मुखें सान सान भीतीने वाळलीं
तैसाच तोंडांत भाकरीचा घास
त्यांच्याच रक्ताने रंगला, गोठला
'आपल्या मुखीच्या स्वातंत्र्यकवळ
नाहीं घेऊं दिला कुणाही शत्रूला'
असेंच सांगून विकट हासतीं भेसूर हीं मुखें
छिन्न स्तन कुठें धरोनिया करीं
चोळींत पडलीं शवें बालकांचीं
बाळांसह पोटीं साठविते पृथ्वी
मातेच्या स्तनांचीं दिव्य वज्रधारा भाविकालासाठीं
चिरिल्या गर्भाचे ते भ्रूण पडले
मृदुगर्भनालीं अजून गुंतले
रुतले मातींत गर्भाचे हे नाल
अमरवेलीच जणुं स्वातंत्र्याच्या रुजल्या भूमींत !
विनाशावरी या घोर भयंकर
शुभ्र पसरले बर्फाचे पदर—
निःशब्द निस्तब्ध बर्फाचे हे थर
अपार घृणा की निस्तल विषाद
अचल कठोर गंभीर मौन का प्रलयरुद्राचें
व्होल्गा नदी तीरीं !
घोर अत्याचार दुःख अपमान
दारूण संकटे वेदना सहून
जहर पिऊन, आग पचवून पचवून
दिव्य बलिदान खंडिलीं देऊन
संहारानलाच्या या ज्वालांमधून निजाचितेंतून
विजयी रशिया प्रगटे हासत

घेउनि मानवी अनंतयौवन !
आला हिमकाल
नगरें जंगलें झाकली हिमाने
पण थांबा थोडें,
सारूनिया बर्फ कुठेंही पाहतां
तिथें हुतात्म्याचे हाडांचे पंजर
गात दिसतील स्वातंत्र्याचें गीत दीन दलितांचें !
आला हिमकाल
हिमवर्षताहे, धुक पसरलें
बळींच्या रक्ताने का तेही रंगलें ?
नाही. हिमधुंद गूढ क्षितिजांत
दिसें उगवले भव्य इंद्रचाप
आर्द्र, अस्पर्शित, रेशमी, अम्लान
असंख्य वलये या सुरचापाची
वेगे चक्राकार फिरती नाचती
सर्व अंतराळीं
आणि भूमिहून नभोमंडळांत
जाति उंचावत सप्तरंगी स्तंभ इंद्रधनुष्याचे
अद्भूत विराट हिंवाळ्याच्या गूढ इंद्रधनुष्यांत
उद्यांच्या विश्वाचीं तेजाळ पाउलें
हळू उमटतीं !
ऐकूं ये चाहूल नवमानवाची, क्रांतीच्या दूताची
याच सप्तरंगी तेजोपथांवर !
व्होल्गानदीतीरीं

— १६ —

चाळीस कोटी हे भारतीय वीर
निर्भय, कोमल
असिधारेपरी, श्वेतपद्मापरी
यांच्या हृदयांत जान्हवीचीं धारा झुळझुळ वाहे.
अरुण कालीचें उपनिषद्गान
संध्यासमयींचें मंत्रजागरण
गाईंच्या घंटांची मंजुळ किणकिण
चांदण्या रात्रींचें प्रेमळ कूजन
ऋषिकन्यकांचें अंचलस्फुरण
अनंतयौवना ऊर्वशीउरींचें उन्मत्त स्पंदन
यांच्या मनामध्ये अजून जागतें !
कुरुक्षेत्रींचें तें भीषण क्रंदन
चितांचें ज्वलन
स्त्रियांचें क्रंदन
युधिष्ठिराचे ते निश्वास करुण
शांतीची वेदना
दाटे त्यांच्या मनीं आज कांठोकाठ
कालिंदीकांठीचे मंद वेणुध्वनि
विणितात स्वप्नें तयांची अजुन
द्रौपदीच्या मुक्त कृष्ण वेणींतील
अदग्ध फुलांच्या कथा तरळती त्यांच्या नयनांत !
बुद्धीचें निर्वाण
अशोकाचे अश्रु
अक्षयवटाच्या पान-पारंब्याची गूढ सळसळ
ताजमहालाचे सुंदर मीनार
आरस्यानी ते–
कृष्ण प्रेमिकांचे हिमगौर बाहु
कृष अस्थिशेष
चिर पसरले आलिंगनासाठी
अनंत नभांत, कांपती हालती !
चित्रें ही अनंत त्यांच्या नयनांत
जागती लोपती.
रत्नांची पेरणी
मोत्यांची कणसें
दुधाचे निर्झर
फुलांच्या झोपड्या, सोनियाचा धूर
चांदीच्या रात्रींचीं सोन्याचीं ती स्वप्नें
स्वातंत्र्याच्या उषा
मुक्तीचीं तीं गाणी
जरी पटक्यांची विजेची पताका
आणि त्यांत हाय ! —
फितुरी खंजीर मीरजाफराचा
घुसे पाठींतून विषारी दुधारी
उडे चिळकांडी रक्ताची चौफेर
पायीं खळाळती दास्याचे लंगर
ढासळले दुर्ग, पेटले बुरूज
चूर्ण सिंहासनें
उध्वस्त महाल
मुकुटांची धूळ
उठे जयांतून दारूचा तो धूर !
हासत जे गेले फासावरि वीर
तयांची शरीरें वृक्षांस लोंबतीं
फुलेंच क्रांतीचीं !
स्मरतें हें सारें

सत्तावनीच्या त्या रक्तांनी रंगल्या
रोट्यांचा तो घास
अजून घशांत घोटाळे देशाच्या
जालियनवाला बागेमधील त्या रक्त-चिखलाने
वस्त्रे मळलेली साऱ्या भारताची
अंदमानातील
अन् काळ्या पाण्याचे विखार डोळ्यांत
वादळ मांडिती क्रोधाचें, लज्जेचें
आणिं हुतात्म्यांच्या चितांचे निखारे
खवखवोनिया त्यांत पेटतात!
निःशस्त्रांचा तैसा शांत प्रतिकार
तापलेल्या लाल बंदुकीच्या गोळ्या
विझती स्मितांत एक दयामय!
विकल कटांचा
क्रांतिकारकांच्या विजयघोषांचा नभीं कोलाहल
होई मेघनाद गंभीर भीषण
प्रगटे त्यांतून रूद्ररूपधारी
आगस्ट क्रांति ती!
क्रांतिपथें चाले
दिव्य आशियाचा पुराणपुरुष
पदोपदीं त्याच्या खचे तारांगण,
हादरे ही भूमि
ऊठे पाऊलांच्या धुळींतून धूर
दिग्गज नाचती त्याच्या पाउलांत
फुत्कारती नाग त्याच्या मानसांत
परशुरामाची परशूची ती धारा
त्याच्या नेत्रांमधी तळपे कठोर
होतांच आज्ञा ती रेणुकेचा वध करील तात्काळ
पुन्हा निज माता जिवंत करून
करील धरणी निःक्षत्रिय सारी एकवीस वेळां
उन्मत्त अधीर ऐसा रणधीर
आशिया खंडाचा, नव्या मानवाचा
हा क्रांतिपुरुष अवध्य, अनंत!
स्वातंत्र्यतिलक पूर्वेच्या कपाळीं
उद्या हा रेखील
रक्त अश्रु आग मेळवोनी

— १७ —

लोहशृंखलांनी बांधली गांजली
पदीं तुडविली युगाची पीडिली
अंधारीं आघातीं सदा विव्हळली
हजारों वरूषें स्फुंदली क्रंदली
अंतरीं फुटोनि
हिंसडल्या रूक्ष मोकळ्या केशांनी
निज जखमांच्या रूधिरधारांनी
लाज झाकियली जिने शतकांची
उघड्या छातीशीं अर्भकें धरून!
आपलीं बालकें उपाशी मारून
परक्यास दे दूध जी स्तन पिळून
प्रेतराशींवर आपुल्या पुत्रांच्या
ध्वज उंचाविला जिने परक्यांचा
आसूडमारांनी किंचकिंचाळून!
बांधलेल्या नेत्रीं अंध देवता जी
फांसावर मु[illegible] टांगीत आपुलीं
अन् चांचप[illegible] त रूधिरलांछित पाउलांच्या खुणा
कष्टत टेकत [illegible]हत चालली
शतके अने
जिकडे पाऊल टाकीत ही जाय
उठती तिकडे हाडांचे झंकार
घोर हाहाकार पेटत्या चितांचे
दग्ध माल तिचें, कपाळीं कलंक
किती शतकांचा परतंत्रतेचा
शेंदूर भांगांत लज्जेने क्रोधाने
जळे, विझे, पेटे!
परवश दीन अशी ही [illegible]ाशिया
संतप्त होऊन, बंधनें तोडून
उभी राहे आज
तिच्या तोडिलेल्या श्रृंखळांचा नाद
हिंदी सागराच्या प्रचंड लाटांत निनादे, खळाळे!
महाकाली परी ती रूद्रगंभीर
वाहते गर्जते
'माझ्या बाळकांनो,
रक्ताचें दान द्या, रक्ताचें दान द्या.'
तिचीच ही वाणी
आझाद फौजेचा तो वीर सेनानी
सुभाष गर्जला इंफाल रणांत
'रक्ताचे दान द्या, रक्ताचे दान द्या.
स्वातंत्र्य देईन उज्वल मंगल
या हिंदभूमीस, आशिया खंडास

परी कृष्ण उष्ण अरुण तरुण रक्तांचें दान द्या
रक्ताचें दान द्या. '
—सर्व आशियाचें हेंच जागरण प्रथम अबोध
विराट, विकाळ, दिव्य हिरण्मय !

— १८ —

आशिया, ही पूर्वा
चाले क्रांतिमार्गे
संयुक्त स्वतंत्र सामर्थ्यशालिनी
कोटी कर तिचा ध्वज उभविती
कोटी कोटी कंठ तिचें गीत गाती
तिच्या पदस्पर्शे बळींच्या अस्थींची कमलें फुलतीं
आज मातींतून !
एक नवें विश्व, नवीन आकाश
तिच्या निश्वासांत
साकारें विशाल
अखिल विश्वाच्या नव्या आकाक्षांचें
नवें सूर्यबिंब
रक्ताश्रूंत तिच्या
आज जगताहे नव्या युगतेजें !

— १९ —

दुर्दम अजिंक्य नवयुगवाणी आशियाक्रांतीची
राष्ट्रसंघामाजी निनादली हीच
रुपेरी रेशमी मंजुळ भाषणीं विजयालक्ष्मीच्या
एक विजेपरी,
वज्रानलापरी
सुधा जिंकणाऱ्या वैनतेयाच्या त्या
विजयी पंखाच्या फटकारापरी !
ऐकून ते शद्व
गगनग्रासिनी समुद्राच्या लाटा
झाल्या थबकून निश्चल निस्तब्ध
आणि पश्चिमेचा श्वेतसाम्राज्याचा
पडे राजदंड उन्मळून खाली
काजळीं खंडांत नीलनदीपात्रीं !
–आणि हस्तिनेंत
पुराण दुर्गांत विस्मृत मोगल साम्राज्याच्या त्या
स्वप्निल वास्तूत
खिन्न अस्तंगत रुधिरलींछित
आंग्लसाम्राज्याच्या त्या सांध्यछायात
भव्य आशियाचें
विश्वविप्लवाचें
जमलेत आज सांद्र विद्युन्मेघ !
जागते आव्हान त्यांच्या गर्जनेंत
अखिल दलित मानवजातींचें
विशाल आशिया आता न राहिल
कधीही कुठेहि
दीन, परतंत्र
मजूर कुणी न
गुलाम न कोणी
कुणी न दलित, बद्ध, परवश त्याच्या जगतांत
काळा–गोरा भेद
जाति धर्म–भेद
उरती न त्याच्या विशाल क्षितिजीं
अखंड आशिया
एक मानवता, अनिरूद्ध, पूर्ण !
घोषणा ही त्याची
हा त्याचा संदेश
आशिया खंडाचा विश्वदेवतेचा
रम्य उषःसूक्तें
प्रस्थानाची गीतें दिव्य ब्राम्हणांचीं
उपनिषदांचीं अमृताचीं गाणीं
बुद्धाचीं आंसवें
खिस्ताचें रुधिर
झरथुष्ट्राची ती दीप्त यज्ञज्वाला
' कोहेनूर '–प्रभा महंमदाची ती
गांधीची करूणा जागती नि गाती जियें एकमेळीं
तीच ही आशिया
चांदणें नि अग्न प्रलयविजांचें
एक इथे झाले
आशियाच्या शब्दीं, आशियाच्या नेत्रीं
दलित विश्वाच्या
विझल्या मशालीं
करा, या, येथेंच पुन्हां प्रज्वलित
वज्रानल तेजें !

—वा. रा. कान्त

• • •

अनुक्रमणिका

केशवसुत
(कै. कृष्णाजी केशव दामले)

परशराम चिंतामण दामले,
बी. ए., एल्एल्. बी.

● प. चिं. दामले हे आधुनिक मराठी कवींचे मुकुटमणी क. केशवसुत यांचे सख्ले पुतणे होत. ते राहुरी, जि. अहमदनगर, येथे वकिली करतात. ते लहानपणीं कांहीं काळ खुद्द केशवसुतांच्या जवळ राहिले होते. त्यांनीच केशवसुतांच्या काव्य-संग्रहाची चौथी आदर्शभूत आवृत्ति काढली आहे.

अशा अधिकारी गृहस्थांनी लिहिलेला हा केशवसुतांवरील लेख केशवसुतांच्या चाहत्यांस अतिशय महत्त्वाचा वाटेल, यांत शंका नाही.

● ● ●

केशवसुत हे ज्या दामले घराण्यांत जन्मले, त्याचें मूळ गांव रत्नागिरी जवळचें कोळंबे हें होय. परंतु केशवसुतांचे आजे विठ्ठलपंत हे कोळंबे सोडून चिपळूणजवळील सोनगांव येथे राहूं लागले पुढे हें सोनगांवहि सुटून दामले मंडळी देशावर व मुंबईस रोजगारासाठीं गेली म्हणून आता दामल्यांचा रत्नागिरी जिल्ह्याशीं संबंध राहिलेला नाही. केशवसुतांची हल्ली हयात असलेली मुलगी वत्सला ही चिपळूण जवळील गांग्रई येथें अद्यापि राहत आहे, तेवढाच कायतो या घराण्याचा कोंकणशी संबंध उरला आहे!

केशवसुतांचे वडील, म्हणजे माझे आजे, केसोपंत हे रत्नागिरी जिल्ह्यांत शिक्षक होते. ते अत्यंत कडक शिस्तीचे होते. इतके कीं, त्यावेळीं रत्नागिरी जिल्ह्यांत कडक शिस्तीचा प्रश्न निघाला असतां त्याला 'केसो विठ्ठली कायदा' असें म्हणत असत! केसोपंत हे स्वतःच्या घरांतहि कडक शिस्तीनेच राहत असत.

अर्थात् केसोपंतांची ही कडक शिस्त त्यांचे चिरंजीव कै. कृष्णाजी केशव दामले ऊर्फ केशवसुत यांच्यांतहि पुष्कळ प्रमाणांत उतरली होती. प्रस्तुत लेखक लहानपणीं केशव-सुतांजवळ राहिला असल्यानें त्याला त्यांच्या कडक शिस्तीचा उत्तम अनुभव आहे! केशवसुतांच्या या कडक शिस्तीचा प्रस्तुत लेखकांस फायदा झाला आहे. मात्र केशवसुतांची कडक शिस्त मर्यादा सोडून कधीच गेली नव्हती, हेंहि नमूद केलें पाहिजे.

●

केशवसुतांच्या हयातींत त्यांच्या काव्याकडे कोणी फारसें पाहिलें नाही, ही गोष्ट आता सर्वमान्य झाली आहे! प्रसिद्धि प्राप्त होण्यास पुष्कळवेळां 'मरावें' लागतें, असें म्हणतात! केशवसुतांचें असेंच झालें.त्यांच्या हयातींत कांहींना तरी पण त्यानंतर मात्र त्यांच्या काव्याचें महत्त्व व श्रेष्ठत्व लोकांस पटलें आहे, हा कालाचा प्रभाव होय! 'कालाय तस्मै नमः'- असेंच म्हटलें पाहिजे!

●

कोणत्याहि कवीच्या काव्याचा विचार करावयाचा झाला, तर त्या कवीचें व्यक्तिगत जीवन ठाऊक असावयास पाहिजे. केशवसुतांचें व्यक्तिगत जीवन माहीत करून घेण्याचा पद्धत-शीर प्रयत्न झाला नाही! आणि, आता त्या दिशेने प्रयत्न करून फारसा उपयोगहि होणार नाही! कारण केशवसुतांचे चुलत चुलते कै. हरि सदाशिव दामले (यांच्याचजवळ केशव-सुत प्लेग होऊन वारले!) अथवा त्यांचे वडील बंधु, म्हणजे माझे वडील, कै. चिंतामण केशव दामले हे हयात होते तोंपर्यंत त्यांजकडून केशव-

सुतांची व्यक्तिविषयक माहिती विपुल प्रमाणांत मिळणें शक्य होतें; पण हे दोघेहि दिवंगत झाल्याने आता ती शक्यता राहिली नाही! खुद्द मला त्यांची माहिती थोडीफार आहे खरी; पण ती या व्यक्तींइतकी खासच नव्हे. १९१७ मध्ये 'नाट्यछटा' कार कै. 'दिवाकर' हे मला केशवसुतांची माहिती विचारण्यासाठी भेटले होते व त्यांना मीं मला ठाऊक असलेली माहिती पुरवलीहि पण हरिकाका व चिंतोपंत यांजकडून माहिती मिळवावयास हवी होती!

केशवसुतांचे कनिष्ठ बंधु कै. सितारामपंत दामले यांनी केशवसुतांच्या कवितेच्या पुस्तकांत त्यांचें लहानसें चरित्र दिलेलें आहे. परंतु त्यांतील माहिती केवळ स्थूल म नानेच बरोबर आहे, हे येथ नमूद करून ठेवण जरूर वाटते! एवढेंच नव्हे, तर केशवसुतांच्या स्वभावाचे विशेष गुण म्हणून ज त्यांनीं लिहून ठेवले आहेत, तेहि तितकेसे बरोबर वाटत नाहीत! आधी माहिती अत्यंत थोडी दिली आहे. स्वभावविशेषां-संबंधीं सांगावयाचें, तर त्यासंबंधाची माहिती सीतारामपंतांस विशेष होती, असें वाटत नाहीं! उलट, चौकशी-अंती मला असें समजले आहे कीं, केशवसुतांचा व सीतारामपंताचा एकत्र राहण्याचा योग फारसा आलाच नाहीं! केशवसुत विद्यार्थीदशेंत असतांना व सीतारामपंत अगदी लहान असतांना त्यांचा वडिलांपाशीं एकत्र राहण्याचा योग कांही दिवस आला असावा. पण त्यावेळीं त्यांस केशवसुतांचें स्वभावदर्शन होणें केवळ अशक्य होते! या अडचणीमुळेच सीताराम-पंतांनी केशवसुतांचे चरित्र व प्रस्तावना लिहि-ण्याचें कार्य त्यांचे मित्र प्रसिद्ध कादंबरीकार ह.ना. आपटे यांजकडे सोपविलें असावें, असें वाटतें!

●

केशवसुतांच्या कडक शिस्तीचें वर्णन वर आलें आहे. मग त्यांनी "मुलांस झोडपणाऱ्या एका पंतोजीस"— ही कविता का लिहिली, असा प्रश्न उपस्थित होतो! केशवसुत हे फार त्रासिक व रागीट असत आणि ते प्रसंगोपात्त वर्गांतील मुलांस खूप झोडपून काढीत असत, असेंहि वर्णन करण्यांत आलें आहे!

पण माझ्या समजुतीप्रमाणे तें साफ चुकीचें आहे! प्रत्येक माणसाचा नेहमी कायम असणारा स्वभाव व प्रसंगविशेषीं निर्माण होणारा तात्पुरता आवि-र्भाव या दोहोंत फरक करणें जरूर आहे. एखादा पंतोजी मुलास नुसतें बोलून थांबेल व दुसरा दोन छड्याहि मारील! म्हणून उपरोक्त शिक्षक अत्यंत क्रूर आहे, असें म्हणतां येणार नाही! केशवसुत नेहमी अत्यंत शांत व गंभीर असत. त्यांच्या डोक्यामध्ये सदैव विचार परिभ्रमण सुरू असल्या-मुळे घरांतील नित्याच्या 'कटकटी'कडे ते फारसें लक्ष्य देत नसत. त्यांना कवितेचें 'वेड' असे व त्या वेडाच्या नादांत ते असत, असें वर्णन केल्यास तें फारसें चुकीचें होणार नाही! त्यांनी अनेक ठिकाणीं म्हटलेलें आहे की, कविता लिहा-वयाची म्हणून मुद्दाम बसून तयार केलेली रचना 'काव्य' होणार नाही. केशवसुत कविता करण्या-साठी म्हणून केव्हाहि बसलेले नसत. उलट कविते-शिवाय त्यांच्या डोक्यांत कधीच दुसरा विषय नसे, अशी त्यांची स्थिति व स्वभावविशेष होता! केशवसुत एके ठिकाणीं स्तब्धपणें बसलेले आहेत व कविता लिहीत आहेत, असें दृश्य कोणालाच कधीं दिसलें नव्हतें. मी स्वत: अनेक वेळां असें पाहिलें आहे की, रात्रभर ते इकडून तिकडे येर-झारा करीत आहेत व तोंडाने कांही गुणगुणत आहेत; आणि, पेन्सिलीचा एक तुकडा व कागद एका कोनाड्यांत पडलेला आहे! कागदावर लिहिलेलें काय?—तर फार तर दोन चार ओळी! —अशा रात्रीच्या रात्री व दिवसच्या दिवस केशवसुतांनी घालविलेल्या प्रस्तुत लेखकास माहीत आहेत! एखाद्या वेळीं असें व्हावयाचें की, केशवसुतांनी रात्रभर इकडून तिकडे फिरावें, ते थेट दुसऱ्या दिवशीं ११-१२ वाजेपर्यंत! सुमारें १२ वाजतां शाळेची वेळ झाली, गेलें पाहिजे, अशी जाणीव त्यांच्या मनांत उत्पन्न व्हावयाची व मग भराभर विहिरींतून बादलीने पाणी काढून, अंगावर कसेंबसें ओतून, उपाशी पोटींच त्यांनी अक्षरशः पळत शाळेंत जावयाचें

आणि मधल्या सुटींत घरीं येऊन जेवण करावयाचें ! –असे एक ना अनेक प्रसंग आठवतात. बरें, अशा प्रसंगीं घरांतील माणसांनीं कांहीं एक बोलण्याची सोय नसे ! कारण, अशा मन:स्थितींत असतांना त्यांस कोणी हटकल्यास त्यांना फारच राग यावयाचा ! जणूं काय, त्यांना काव्याची समाधिच लागत असे ! ! त्यांची 'फिर्याद' कविता त्यांच्या मन:स्थितीचें योग्य दिग्दर्शन करणारी आहे ही व इतर कांहीं प्रेमविषयक वाटणाऱ्या कविता वस्तुत: कवितादेवीस उद्देशून लिहिलेल्या आहेत. मात्र याचा अर्थ केशवसुतांना स्त्रीविषयक प्रेम समजत नव्हतें, त्यांच्या ठिकाणीं ती भावना नव्हती, असा करण्याचें बिलकूल कारण नाहीं !

वर वर्णन केल्याप्रमाणें केशवसुत हे नेहमी एक प्रकारच्या तंद्रींत असावयाचे. ज्यांना त्यांच्या मन:स्थितीची कल्पना नव्हती, ते त्यांना भ्रमिष्ट समजावयाचे ! ही त्यांची मन:स्थिति जन्मसिद्ध होती. अगदी लहानपणापासून तें असे वागावयाचे, असें मला माझे वडील, चुलते व खुद्द केशवसुतांचे चुलते यांनीं अनेक प्रसंगीं सांगितलेलें आठवतें !

याचा अर्थ असा नाहीं कीं, केशवसुतांनीं आपलीं संसारविषयक कर्तव्यें नीट पार पाडलीं नाहींत ! उलट, संसारविषयक कर्तव्यें करण्याच्या कामीं ते दक्षच असत. परंतु हीं कर्तव्यें करतांना त्यांची मनोरचना एखाद्या कर्मयोगी विरक्त पुरुषाची असे. संसारामध्ये निमग्न होऊन ते राहात नसता मात्र जरूर तें लक्ष्य सर्व गोष्टींकडे देण्यास ते चुकत नसत. आपल्या कुटुंबांतील व नात्यागोत्यांतील मंडळींची योग्य ती विचारपूस ते नेहमी करीत असत. कुटुंब म्हणजे स्वत:चीं बायकामुलें अशी त्यांची कल्पना नव्हती !

●

केशवसुतांच्या कांहीं कवितांत निराशेचा सूर आढळतो, त्याचा संबंध त्यांच्या आर्थिक परिस्थितीशीं लावण्यांत येतो ! त्यांच्या 'तुझें नाम मुखीं, ध्यान तुझें डोळां'– या कवितेंत हा सूर सर्वांत जास्त उमटतो, असा टीकाकारांचा दावा आहे ! परंतु हें काव्य पूर्णपणें आध्यात्मिक आहे व त्या पातळीवरूनच त्याचा विचार केला पाहिजे. केशवसुतांच्या स्वभावाचे जे अनेक पैलू आहेत, त्यांत पारमार्थिकतेचा पैलू फार महत्त्वाचा आहे. त्यांच्या काव्यांत निराशा आहे; पण ती ऐहिक भूक न भागल्यामुळे उत्पन्न झालेली नसून आध्यात्मिक भूक न भागल्यामुळे उत्पन्न झालेली आहे !

केशवसुत गरीब होते; पण 'गरिबी' व 'दारिद्र्य' यांत अंतर आहे ! खेरीज, मनाने ते 'श्रीमंत' च होते ! मी स्वत: फैजपूर येथे त्यांजपाशीं होतों. कोकणांत शिक्षणाची सोय नाही, हें जाणून मला त्यांनी आग्रहाने स्वत:च जवळ ठेवून माझा विद्याभ्यास केला ! त्यांच्या घरांतील परिस्थिति गरिबीची असली, तथापि अत्यंत व्यवस्थित व समाधानाची होती. केशवसुत आपल्या खर्चाची व उत्पन्नाची तोंडमिळवणी नेहमी ठेवीत असत. इतकेंच नव्हे, तर थोडीफार बचतहि त्यांजपाशीं असे ! सारांश, केशवसुतांचें काव्य जर नीट समजावून घ्यावयाचें असेल, तर त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा त्यांच्या काव्यावर परिणाम झाला होता, असें कोणीहि समजूं नये. उलट गरिबी ही त्यांनी आनंदाने व स्वखुषीनें पत्करलेलें एक व्रत होतें ! त्यांच्या काळी मॅट्रिक-पर्यंतचें शिक्षण म्हणजे बरेंच मोठें भांडवल होतें. त्यांनी प्रयत्न केला असता, तर उत्तम नोकरी मिळून ते बऱ्याच मोठ्या पगारास चढले असते. कवितेच्या नादांत गुंगले असल्याने त्यांच्या मनास आपण गरीब वा दरिद्री आहों, असा विचारहि कधी शिवला नाही ! याच नादामुळे ते कधी शेजारीं पाजारींहि फारसे जात नसत. किंबहुना, आमच्या दामले घराण्याचा हा एक विशेष गुणच आहे. असो, मानी व संकोची वृत्ती आणि आपल्यापासून दुसऱ्यास त्रास न व्हावा, ही इच्छा –अशा तऱ्हेने केशवसुत वागत असत. म्हणून त्यांनी आपल्या बंधूंपासून देखील कधी पैशाची मदत घेतली नाही.

केशवसुतांच्या चाहत्यांस व मराठी काव्याच्या अभ्यासकांस माझी अशी विनंति आहे कीं, केशवसुतांच्या आर्थिक परिस्थितीचा त्यांच्या

काव्यावर परिणाम झाला, असें त्यांनी मुळींच समजूं नये !

केशवसुत सामाजिक सुधारणेचे पुरस्कर्ते होते. पण जुन्यांतील ग्राह्यांशहि ते घेत. ते स्वतः नियमाने संध्या वगैरे करीत नसत. पण मला स्वतःला त्यांनीं संध्यावंदनाचे पाठ दिलेले आठवतात —आणि ते देखील अगदी शास्त्रीय पद्धतीने ! कवितेच्या वेडामुळें त्यांनी नियमित संध्यावंदन केलेलें नसलें, तथापि फुरसतीप्रमाणें ते संध्यावंदन करण्यास चुकत नसत !

पोषाखाच्या बाबतींतहि ते जुन्याच वळणाचे होते. अंगांत लोकमान्य टिळक घालीत असत तसा अंगरखा, डोक्याला काळी पगडी व शुभ्र कांठाचें उपरणें—असा त्यांचा नेहमीचा साधा पोषाख असे. केव्हा केव्हा ते पांढरा रुमालहि घालीत असत. फक्त जेवणानंतर सुपारी खाण्याचें त्यांना व्यसन होतें. या व्यतिरिक्त दुसरी कोणतीहि सवय त्यांना नव्हती. त्यावेळीं चहा फारसा रूढ नव्हता व तोंहि ते घेत नसत. सुपारी खावयाची तीहि तोंडांत एखादे खांड टाकावयाचे व तें चघळावयाचे. सुपारी फोडण्याची त्यांची पद्धत म्हणजे, ती चाकूने फोडायची ! सुपारीवर चाकू धरून त्यावर हात मारावयाचा ! अडकित्ता ते सहसा वापरीत नसत.

●

केशवसुतांचे बहुतेक उत्तर आयुष्य मुंबई व खानदेश येथे गेलें, तथापि त्यांना कोकण व तेथील जीवन फार आवडे. सुटींत फारसें कोठे न जातां कोकणांत चिपळूण येथें श्वशुरगृहीं अगर दापोली जवळील वळणें या गांवीं त्यांचे ज्येष्ठ बंधु, माझे वडील, चिंतोपंत राहत असत, त्यांच्याकडे ते जात असत. 'एक खेडे' 'गोष्टी-घराकडील'—या कवितांतील गांव हें वळणेंच होय. हें गांव अत्यंत रमणीय असून तेथील हवापाणी तर फारच उत्तम आहे. चिंतोपंत व केशवसुत यांस परस्परांचा विशेष लळा होता. केशवसुतांचे धाकटे बंधु कै. प्रा. मोरो केशव दामले यांनीं केशवसुतांच्या विद्वत्तेसंबंधाने मला अनेक गोष्टी सांगितलेल्या आठवतात. इंग्रजी कवींचा केशवसुतांनी फारच बारीक अभ्यास केला होता, असें मोरोपंत सांगत असत. शेक्सपियर व बायरन यांच्या काव्य-नाट्यांतील कठिण मर्मस्थानें केशवसुतांकडून आपण समजावून घेतल्याचे ते सांगत असत ! इंग्रजीप्रमाणें संस्कृत काव्यहि केशवसुतांनी चांगलें अभ्यासिलें होतें, असेंहि मोरोपंतांकडून मला कळलें.

●

केशवसुतांना कोणत्याहि विषयाचा खोलवर विचार करण्याची संवय होती. मला असें स्मरतें की, मला संध्या शिकविण्याच्या निमित्तानें त्यांनीं पुष्कळ संस्कृत पोथ्यापुस्तकें वाचलीं. संध्या नुसती पाठ न म्हणतां स्वरासहित म्हणण्यास त्यांनी शिकविली ! हाच प्रकार त्यांच्या कविते-बाबत असे. योग्य शब्द न सुचल्यास त्यासाठीं ते दिवसच्या दिवस विचारमग्न होऊन घालवीत ! आणि, मनासारखी रचना न झाल्यास ते कागद-च्या कागद फाडून टाकीत ! जगाला कांही विशेष सांगण्यासारखें असलें, तर तें ठेवावयाचें नाहींतर, माराभर कशाला हवें, अशी त्यांची विचारसरणी असे !

केशवसुतांच्या नादिष्टपणामुळे विद्यार्थिदशेंत त्यांच्या हातून कांही विषयांच्या अभ्यासाची हयगय होई ! वडिलांच्या कडक नजरेमुळें लहान-पणीं त्यांचा अभ्यास उत्तम झाला. पण पुढे वडिलांपासून दूर गेल्यामुळे त्यांचा कांही विष-यांचा अभ्यास फार खोल तर कांही विषयांचा कच्चा राही !

त्यावेळच्या रिवाजाप्रमाणें केशवसुतांचें लग्न लहानपणीं झालें. त्यांचें लक्ष सांसारिक गोष्टींकडे मुळांतच कमी होतें. त्यामुळे मुंबईस नोकरी करूं लागल्यानंतर कांही दिवस ते एकटेच राहात असत. बिऱ्हाड करून संसाराला सुरुवात करावी असें त्यांच्या मनांतहि आलें नाही ! मात्र दुस-ऱ्यांनीं का होईना, संसाराला सुरुवात करून दिल्यानंतर ते कर्तव्यपालनास चुकले नाहीत. आपल्या मुलींना अभ्यास शिकवितांना व त्यांना 'फुलांची पखरण' कविता पाठ म्हणण्यास सांगतांना

मीं त्यांना पाहिलें आहे. आपलें काव्य श्रवणसुभग होण्यासाठीं ते स्वत: त्यांतील ओळी पुन: पुन्हा म्हणतांना मीं ऐकिल्या आहेत. कविता गुणगुणण्याचा त्यांना नादच असे !

त्यांची राहणी साधी, पण स्वच्छ असे. कपडे अत्यंत स्वच्छ ठेवण्याकडे त्यांचा कटाक्ष असे. घरांतील जागा झाडून-झटकून स्वच्छ ठेवण्याकडे ते जातीनें लक्ष्य पुरवीत. त्यांचे बंधु मोरोपंत हेही आपली बैठकीची जागा स्वत: झाडून घेत. नोकरानें ती कितीहि स्वच्छ झाडली, तरी तें त्यांच्या पसंतीस येत नसे! केशवसुत आपल्या कुटुंबांतील सर्व माणसांशीं आनंदानें व मनमिळाऊपणानें वागत. संध्याकाळीं फिरावयास जाण्याचा त्यांचा नित्यक्रम असे. पण ते बहुधा एकटेच जात. मित्रपरिवार फारसा नसेच. आणि, मित्रांना बरोबर घेऊन ते फारसे फिरावयास जातहि नसत.

केशवसुतांचा फोटो मिळणें केवळ अशक्य आहे ! अगदी अलिकडे धारवाड हायस्कूलमध्ये एखाद्या ' ग्रूप ' मध्यें त्यांचा फोटो आहे की काय, याचा शोध केला. पण असा फोटोच नसल्याचें समजलें ! यामुळे आता कधींकाळीं त्यांचा फोटो सापडेल, ही आशा व्यर्थ आहे. तेव्हा केशवसुत कसे दिसत, हें आता वर्णनानेंच सांगितलें पाहिजे ! ते मध्यम उंचीचे असून वर्णानेहि मध्यम असत, डोळे मात्र पाणीदार व तेजस्वी असून दृष्टि अंतर्मुख असे. ते दिसण्यांत साधारणपणें त्यांचे बंधु चिंतोपंत यांजसारखे होते. चिंतोपंतांचा फोटो आहे, तो केव्हा तरी प्रसिद्ध करतां येईल. त्यावरून थोडी फार केशवसुतासंबंधानें कल्पना येऊं शकेल.

• • •

कुसुमाग्रज
(वि. वा. शिरवाडकर)

' कलिन्द '

● कविवर्य कुसुमाग्रज यांचा हा अत्यंत सरस परिचयलेख त्यांच्या एका निकटाच्या आप्तानें लिहिलेला आहे.

* *

१९३०-३१ मधली गोष्ट. त्यावेळीं नाशिकच्या ह. प्रा. ठा. कॉलेजमध्ये नुकत्याच प्रवेश केलेल्या दोन विद्यार्थ्यांकडे इतर विद्यार्थी कवि म्हणून बोट दाखवीत. कवि म्हणून अद्याप त्यांना नाशिकांत फारसी मान्यता मिळाली नव्हती, किंवा प्रसिद्ध मासिकांमध्यें त्यांच्या कविता अद्याप प्रसिद्ध झाल्या नव्हत्या. तरीहि हीं दोघं पोरं कवि म्हणून लवकरच नांव मिळवणार, असा पुष्कळांना विश्वास वाटत होता.

नाशिक कॉलेजचे त्यावेळचे हे दोन उदयोन्मुख कवि म्हणजे ग. ल. ठोकळ आणि कुसुमाग्रज हे होत. ह्या दोघांनीहि मराठी कवितेच्या क्षेत्रांत आपलें वैशिष्ट्य लवकरच सर्वांच्या निदर्शनास आणलें. अलिकडील कवींमध्यें कुसुमाग्रजांइतकी पृथगात्म, भावनोत्कट, कल्पना-वैभवानें नटलेली आणि सामर्थ्यशाली कविता दुसऱ्या कोणीहि लिहिलेली नाहीं, ह्याबद्दल, मला वाटतं, मतभेद होण्याचा फारसा संभव नाही.

बहुतेक कवींच्या काव्यरचनेला प्रारंभ लहानपणींच होतो. कुसुमाग्रजहि या नियमाला अपवाद नाहीत. शाळेमध्ये असतांनाच त्यांनी काव्यलेखनास सुरवात केली. त्यांचें मराठी शिक्षण नाशिक जिल्ह्यांतील पिंपळगांव या गावीं झालें. त्यांचे वडील पिंपळगावला वकील होते. वाङ्मय आणि

राजकारण या दोन्ही विषयांची त्यांच्या वडिलांना अतिशय आवड असे. रामदास, मोरोपंत-वगैरे जुन्या कवींच्या कविता ते आपल्या मुलांना वाचून दाखवीत, समजावून सांगत. घरामधील हें वाङ्मयीन वातावरण कुसुमाग्रजाच्या प्रतिभेला अत्यंत पोषक ठरलें. खेडेगावीं राहिल्यामुळे, "सौंदर्य फुलाचें, गाणीं वनविहगाचीं ती गोड शांतता हिरव्या वृक्षलतांचीं"- या सर्वांची गोडी त्यांना लहानपणापासूनच लागली.

इंग्रजी शिक्षणासाठी कुसुमाग्रज नाशिकला आले. त्या काळीं सर्व वाङ्मयप्रेमी लोकांवर गडकऱ्यांची विलक्षण मोहनी पडलेली होती. शाळेंत असतांना कुसुमाग्रजांना गडकऱ्यांनी, जणु काय, वेड लावलें होतें! गडकऱ्यांच्या कविताच नव्हेत, तर नाटकेंहि त्यांना जवळजवळ तोंडपाठ असत. पण गडकऱ्यांची ही छाप त्यांच्यावर फार काळ टिकूं शकली नाहीं. केशवसुत, तांबे, बी, बालकवि हे त्यांचे आवडते कवि. पण यापैकीं कोणाचीहि छाया त्यांनी आपल्या कवितेवर पडूं दिली नाही. १९३० मध्ये कुसुमाग्रजांनी कॉलेजमध्ये प्रवेश केला आणि कॉलेजच्या मोकळ्या वातावरणांत त्यांनी काव्यदेवतेची आराधना अतिशय उत्साहानें करायला सुरवात केली. पहिल्या वर्षीच त्यांनी प्रमुख इंग्रज कवींची कविता वाचून काढली. शेले, बायरन् आणि ब्रौनिंग हे त्यांचे आवडते कवि असून बायरनवर त्यांनीं एक कविताहि लिहिली आहे. शाळेमध्ये असतांना कुसुमाग्रज हुशार विद्यार्थी म्हणून शिक्षकांना चांगलेच परिचित होते. इंग्रजी आणि मराठी या दोन्ही विषयांत ते नेहमी अघाडीवर असत. नाशिकचे दुसरे एक प्रसिद्ध कवि 'अशोक' आणि कुसुमाग्रज

हे एकाच शाळेंत आणि कांही दिवस एकाच वर्गांत होते. दोघेहि शाळेंत चलाख विद्यार्थी म्हणून गणले जात. कॉलेजमध्ये आल्यावर मात्र कुसुमाग्रज वाङ्मयाकडे इतके आकर्षिले गेले की, अभ्यासाकडे ते क्वचितच लक्ष देत. दरवर्षी शेवटी थोडाफार अभ्यास करुन पास होणें एवढेंच ध्येय त्यांनी अभ्यासाच्या बाबतींत आपल्यापुढें ठेवलें. ज्युनियर आणि सीनियर बी. ए. ला असतांना तर ते चार दिवस तरी कॉलेजमध्ये नेमाने आले असतील की नाही, याची शंकाच आहे! नाशिक कॉलेजचे त्या वेळचे मराठीचे प्राध्यापक कै. जोगळेकर यांना कुसुमाग्रज मराठीचा पेपर कसा लिहितात, हें पाहण्याची नेहमी उत्कंठा लागायची आणि म्हणून कुसुमाग्रजांनी एखाद्यातरी सहामाही परिक्षेला बसावें, असं त्यांना वाटे. पण त्यांची ही इच्छा कधीच पुरी झाली नाही! कुसुमाग्रज फक्त विश्वविद्यालयाच्या परीक्षेला बसले आणि तींत ते पास झाले.

कुसुमाग्रज कॉलेजमध्ये असतांना नाशिकला वाङ्मयीन चळवळींना मोठी भरती आली होती. नाशिकच्या साहित्यिकांत दोन गट पडले होते. कै. दा. ग. पाध्ये, नाथ निफाडकर-वगैरे साहित्यिकांनी 'महाराष्ट्रवाङ्मय मंडळ' नांवाची संस्था स्थापन केली होती. तर प्रा. पाटणकर, टिळकप्रभृतींनी 'वाङ्मय-विहार-मंडळ' स्थापन केलें होतें. या मंडळांनीं अनुक्रमें गोदातटीचा गुंजारव आणि माधवी हे कवितासंग्रह प्रसिद्ध केले होते. कुसुमाग्रज दुसऱ्या मंडळाचे सदस्य असले, तरी त्या मंडळाच्या कामकाजांत त्यांनीं हिरिरीने भाग घेतला नाही. याचें कारण कुसुमाग्रजांचा स्वभाव पहिल्यापासून प्रसिद्धी पराङ्मुख आहे, हे होय. किंबहुना, प्रसिद्धी-पराङ्मुखतेचा त्यांच्या ठिकाणी अतिरेक झाला आहे, असेंहि म्हणतां येईल. त्यांना 'खेचून' पुढें आणण्याचे श्रेय रा. देवदत्त ना. टिळक यांना दिलें पाहिजे. टिळक त्यावेळी मुलांसाठी बालबोधमेवा हें मासिक काढीत. कुसुमाग्रजांनी एकदा त्या मासिकाकडे कविता पाठविली. तावडतोब टिळकांनी त्यांना आपल्या घरीं बोलाविले आणि कविता लिहिण्यास ते त्यांना उत्तेजन देऊं लागले. कुसुमाग्रजांच्या कवित्वशक्तीबद्दल टिळकांना अतिशय विश्वास वाटे. कुसुमाग्रजांना स्वतःच्या कवित्वशक्तीबद्दल वाटणारा आत्मविश्वास प्रथम कोणी वाढीस लावला असेल, तर तो टिळकांनीच होय. तसें पाहिलें तर, त्यावेळी नाशकांत प्रसिद्ध असें पुष्कळ कवि होते आणि ते बहुतेक टिळकांचे स्नेही होते. पण जेव्हा

जेव्हा एखादी चांगली कविता पाहिजे असेल किंवा स्वत:ला आवडलेल्या एखाद्या इंग्रजी कवितेचें भाषांतर करावयाचें असेल तेव्हा तेव्हा ती कामगिरी टिळक कुसुमाग्रजांवरच सोपवीत; ज्या वेळीं कुसुमाग्रजांना कवि म्हणून नाशकांत पांच-दहा लोक ओळखत असतील नसतील त्यावेळीं सुद्धां टिळक त्यांना मोठा कवि मानीत. टिळकांकडे मोठ्या साहित्यिकांची नेहमी वर्दळ असायची. परगांवचा एखादा मोठा साहित्यिक आपल्याकडे आला कीं, टिळक न चुकतां कुसुमाग्रजांची, त्याच्याशीं ओळख करून देत. मला आठवतं कीं, एक दिवशीं रात्रीं कुसुमाग्रजांना टिळकांचे तातडीचें बोलावणें आलें होतें. सुप्रसिद्ध कवि 'बी' त्यावेळीं टिळकांकडे आले होते आणि ते लगेच परगांवीं जाणार होते. एवढ्या गडबडींत सुद्धा कुसुमाग्रजांची 'बीं' शी ओळख करून द्यायला टिळक विसरले नाहींत. प्रत्येक लेखकाला, मग तो किती का प्रतिभाशाली असेना, आरंभीं उत्तेजनाची थोडीफार गरज असते, असें उत्तेजन मिळालें नाही, तरीहि प्रतिभावान् लेखक उशिरा का होईना, पण पुढे येईलच, हें खरं असेल पण म्हणून लेखकाला, त्याच्या आरंभीच्या दिवसांत, उत्तेजन देणाऱ्यांची कामगिरी त्यामुळे कांहीं कमी महत्त्वाची ठरत नाही. हें उत्तेजन बालकवींना जसें रे. टिळकांपासून तसें कुसुमाग्रजांना रा. दे. ना. टिळक यांच्यापासून मिळालें.

कुसुमाग्रजांनी काव्यलेखनास आरंभ केला, त्यावेळीं महाराष्ट्रांत 'रत्नाकर,' 'मनोरंजन' आणि 'यशवंत'—हीं मासिकें अत्यंत नावाजलेलीं होतीं. विशेषत: 'रत्नाकरा'मध्यें लेख किंवा कविता प्रसिद्ध होणें ही मोठ्या मानाची गोष्ट समजली जाई. ह्या मासिकांत ज्यांचें नांव नेहमी झळके, असे एकच साहित्यिक त्यावेळीं नाशकांत होते आणि ते म्हणजे प्रा. रा. श्री. जोग उर्फ निशिगंध कवि हे होत. निशिगंधांची वैशिष्ट्यपूर्ण भावगीतें 'रत्नाकरां' तच प्रसिद्ध होत. निशिगंधांनी पुढे लवकरच नाशिकला 'रामराम' ठोकला आणि ते पुण्याला गेले. पुढे पुढे माधव मनोहर यांचे लेख आणि कुसुमाग्रज—अशोक यांच्या कविता 'रत्नाकरां' मध्यें प्रसिद्ध होऊं लागल्या. कुसुमाग्रजांच्या 'रत्नाकरां'त दोन कविता प्रसिद्ध झाल्या. बी. ए. ला असतांना कुसुमाग्रज माधव मनोहर, स. वा. केळकर आणि कै. प्रा. गळेकर यांनी नाशिकला रविकिरण मंडळाच्या धर्तीवर 'ध्रुव' मंडळाची स्थापना केली. या मंडळाच्या बैठकी बालाजी-मंदिरांत कुसुमाग्रजाच्या खोलीवर भरत. या मंडळाचें पहिलें (आणि शेवटचें!) प्रकाशन म्हणून कुसुमाग्रजांनी 'जीवन-लहरी' हें आपलें काव्य १९३३ मध्ये प्रसिद्ध केलें. हें प्रकाशन पैशाच्या दृष्टीनें अपेक्षेप्रमाणें महागच पडलें. पण ज्यांच्या ज्यांच्या वाचनांत हें चिमुकलें पुस्तक आलें, त्यांनी त्यांनी त्याची मुक्तकंठानें स्तुति केली. "तुमच्या 'जीवन-लहरी' अतिशय सुंदर आहेत" असें कविवर्य तांबे यांनी कुसुमाग्रजांना पत्र लिहून कळविलें. प्रा. जाग यांनीहि पत्र लिहून जीवनलहरींच्या पृथगात्मतेची ग्वाही दिली. ह्या काव्याचें परीक्षण करतांना "इतकीं प्रतिभाशाली गीतें कुसुमाग्रज लिहूं तरी कसे शकले" असे उद्गार नागपूरच्या 'विहंगम' कारांनी काढले. रचनेची सफाई आणि भाषाप्रभुत्व हे विशाखेचें विशेष 'जीवनलहरी' मध्ये आढळून येत नसलें, तरी तें काव्य वाचतांना आपण कांहीं तरी निराळें काव्य वाचीत आहोंत याची जाणीव त्यावेळींहि सर्वांना झाल्याशिवाय राहिली नाही. मर्यादित प्रमाणांत का होईना, पण 'जीवनलहरी'. मुळे कुसुमाग्रजांना कवि म्हणून मान्यता मीळाली यांत शंका नाही. यानंतर त्यांच्या कविता 'प्रतिभा,' 'विहंगम'' विश्ववाणी' 'सह्याद्री' वगैरे नियतकालिकांमधून प्रसिद्ध होऊं लागल्या.

बी. ए. झाल्यानंतर कुसुमाग्रजांनी सरकारी नोकरी स्वीकारावी, अशी घरांतील मंडळींची इच्छा होती पण सरकारी नोकरी करावयाची नाही, असा त्यांचा निर्धार होता आपल्या मन:-प्रवृत्तीला मानेल आणि रुचेल अशीच नोकरी करावयाची, असें त्यांनीं ठरविलें. नाशिक येथे त्यावेळीं नुकत्याच निघालेल्या गोदावरी सिनेटोनचें ते असिस्टंट डायरेक्टर झाले! त्या कंप-

नीच्या एका चित्रपटांत त्यांनी कामहि केलें! असिस्टंट डायरेक्टर हें फक्त नांव होतें! गोदावरी सिनेटोन लवकरच निकालांत निघाली. १९३५ मध्यें कुसुमाग्रजांनी नोकरीच्या शोधार्थ मुंबईला प्रयाण केलें. दोन तीन वर्षें ते मुंबईलाच राहिले. हीं दोन तीन वर्षे अनेक दृष्टींनी संस्मरणीय ठरलीं. मुंबईतील या वास्तव्याचा एक मात्र मोठा फायदा झाला. पायदळीं तुडविल्या जाणाऱ्या लोकांचीं दु:खें त्यांना अगदी जवळून पाहायला मिळालीं. त्यांच्या कवितेला जें तेजस्वी स्वरूप प्राप्त झालें, त्याला हा अनुभव थोडाफार कारण असावा. मुंबईला असतांनाच त्यांची स्वप्नाची समाप्ति ही कविता ज्योत्स्नेमध्ये (ऑक्टोबर १९३६) प्रसिद्ध झाली. ह्या कवितेने त्यांचें स्थान श्रेष्ठ मराठी कवींमध्ये निश्चित झालें. खांडेकरांना ही कविता इतकी आवडली की, 'ज्योत्स्ने'च्या प्रत्येक अंकांत कुसुमाग्रजांची कविता दिसावी, अशी इच्छा त्यांनी प्रगट केली. 'स्वप्नाची समाप्ति' आणि त्यापूर्वी लिहिलेल्या कुसुमाग्रजांच्या कवितांमधील वातावरण सामान्यत: उदासरम्य आहे; असें म्हणतां येईल. पण १९३७ मध्यें ज्योत्स्नेंत प्रसिद्ध झालेल्या 'बळी' या कवितेंत त्यांच्या प्रतिभेने अत्यंत तेजस्वी रूप धारण केलें. यापुढे कुसुमाग्रजांची कविता हें एक 'ज्योत्स्ना' मासिकाचें आकर्षण झालें.

मुंबईहून कुसुमाग्रज पुण्याला आले आणि तेथील 'प्रभात' दैनिकांत त्यांनी नोकरी धरली. पुण्याला असतांनाच त्यांच्या ओजस्वी कविता ज्योत्स्नेमधून एकामागून एक प्रसिद्ध होत होत्या. पुणें सोडून मुंबईला जाण्याचा प्रसंग पुन्हा लवकरच आला. 'सारथी' या नांवाचें साप्ताहिक काढण्याचें दौंडकरांनीं ठरविलें होतें आणि त्यासाठी त्यांना सहसंपादक हवा होता. खांडेकरांनी कुसुमाग्रजांचें नांव सुचवलें आणि १९४० मध्ये कुसुमाग्रज पुन्हा मुंबईला आले. 'सारथी' मधील त्यांचें लिखाण सर्वांनाच अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण वाटलें. १९४१ मध्ये 'सारथी' पत्र बंद पडलें आणि कुसुमाग्रजांनी धनुर्धारी आणि नवयुगमध्ये प्रवेश केला. परवां परवा पर्यंत ते या दोन्ही पत्रांमध्ये लिहीत. 'नवयुगा'ची राजकीय बाजू आकर्षक करण्यांत आचार्य अत्रे यांच्या बरोबर प्रभाकर पाध्ये आणि कुसुमाग्रज यांनीहि पुष्कळच श्रम घेतले. पुढेपुढे कुसुमाग्रजांना मुंबईचा फार कंटाळा आला आणि मुंबईला 'रामराम' ठोकून ते नाशिकला आले. सध्या ते नाशिकला निघणाऱ्या 'स्वदेश' साप्ताहिकाचे संपादक आहेत.

'स्वप्नाची समाप्ति' ही कविता ज्योत्स्नेमध्ये प्रसिद्ध झाल्यापासून खांडेकरांचें लक्ष्य कुसुमाग्रजांकडे विशेष वेधलें होतें. दोघांची भेट झाल्यावर खांडेकरांनी कुसुमाग्रजांना आपला कवितासंग्रह प्रसिद्ध करून टाकण्याची सूचना केली. कवितासंग्रह काढल्यास तो अंगावर येतो असा सर्वसामान्य अनुभव असल्यामुळे कुसुमाग्रज या बाबतींत विशेष उत्सुक नव्हते. पण खांडेकरांची सूचना केवळ सूचनाच नव्हती! हा संग्रह तात्बडतोब प्रसिद्ध करण्याचा त्यांचा निश्चय होता. खांडेकरांनी कुसुमाग्रजांबद्दल—थोडीहि पहिली ओळख नसतांनां विलक्षण आपलेपणा दाखविला. चांगल्या प्रथितयश कवीचें कवितासंग्रहहि प्रसिद्ध केल्यास आर्थिक दृष्ट्या तोटा होतो, हें माहित असूनहि त्यामानाने अप्रसिद्ध पण ज्याच्या कविता आपल्याला आवडल्या आहेत अशा एका उदयोन्मुख कवीचा कवितासंग्रह प्रसिद्ध करण्याची सर्व जबाबदारी घेणें ही गोष्ट अपार सौजन्याशिवाय शक्य आहे काय? विशाखा प्रथम प्रसिद्ध झाले, ते अगदीं अनाकर्षक स्वरूपांत. पण तरीहि 'विशाखे'चें अपार कौतुक झालें. थोडक्या अवधींत विशाखेची दुसरी आवृत्ति निघाली आणि तिसरी सध्या प्रकाशनाच्या मार्गावर आहे. विशाखा प्रसिद्ध होण्यापूर्वी एकच वर्ष कुसुमाग्रजांचे वडील वारले. कुसुमाग्रजांना अगदी लहानपणापासून काव्याची गोडी लागली, ती त्यांच्या वडिलांपासूनच. विशाखेचें काम ते असतांनाच सुरू झाले होते, पण प्रसिद्ध झालेला विशाखा हा कवितासंग्रह त्यांच्या स्मृतीस वाहिलेला होता!

कुसुमाग्रजांना आपल्या कवित्वशक्तीबद्दल पाहिल्यापासून आत्मविश्वास वाटे, पण पुढे येण्यासाठी कांही प्रयत्न करावा, असें त्यांना कधींच

वाटलें नाही. वर म्हटल्याप्रमाणें, प्रसिद्धी-पराङ्मुखतेचा त्यांच्या ठिकाणीं अतिरेक झाला आहे, हे ज्यांचा त्यांच्याशी परिचय आहे, ते तात्काळ मान्य करतील पुण्याला ते किती तरी दिवस राहात होते आणि तेथे असतांनाच त्यांच्या ओजस्वी कविता 'ज्योत्स्ने' मधून एकामागून एक प्रसिद्ध होत होत्या. पण असें असूनहि त्यांच्या या विशिष्ट स्वभावरचनमुळे त्यांना कोणीहि फारसें ओळखीत नव्हते. मुंबईकरांनी मात्र त्यांना साहित्यिकांच्या वर्तुळांत ओढलें. तेथे असतांना वा. रा. ढवळे, वा. ल. कुलकर्णी, चित्रकार गोडसे, प्रभाकर पाध्ये, पु. भा. भावे—वगैरेशीं त्यांचा गाढ स्नेह जडला. याशिवाय, त्यांचे अत्यंत निकट स्नेही म्हणजे ज्यांना त्यांनी आपली वैष्णव कादम्बरी अर्पण केली आहे, ते स. वा. केळकर हे होत. शाळेमध्ये असतांना कुसुमाग्रज क्रिकेटपटु होते आणि शाळेच्या क्रिकेटसंघांत त्यांचा समावेश होई. शाळा–कॉलेजमध्ये गॅदरिंगनिमित्त झालेल्या नाटकांमध्ये त्यांनी प्रमुख भूमिकाहि केलेल्या आहेत. त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध करायचें ठरलें, तेव्हा "संन्याशाच्या संसाराला शेंडीपासून सुरवात" अशीच स्थिती होती. कवितासंग्रह काढायचा खरा, पण कविता कोठे आहेत? कवितांचीं कात्रणें त्यांनी जवळ ठेवलेलीं नव्हती. मासिकांचे अंक कोणीना कोणी तरी पसार केलेले आणि मूळ कविता लिहिलेले कागद बेपत्ता झालेले! त्यांच्या कवितांची ही स्थिती पाहून त्यांचे एक स्नेही विनोदानें म्हणाले, "तुमच्या कविता गोळा करायचं काम तुम्ही भारत इतिहास-संशोधक-मण्डळावर सोपवा!" प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या कविता गोळा करण्यांत जवळ जवळ आठ महिने गेलें आणि त्यामुळे 'विशाखे' चें काम कितीतरी दिवस रेंगाळत पडलें होतें. आता मात्र ते कवितांचीं कात्रणें काळजीपूर्वक जपून ठेवतात. त्यांनी कित्येक अविस्मरणीय लघुकथा लिहिल्या असून त्यांचा लघुकथासंग्रह प्रसिद्धीच्या मार्गावर आहे. प्रसिद्ध झालेलें त्यांचें अलिकडील लिखाण म्हणजे 'वैष्णव' ही कादंबरी, 'दूरचे दिवे' व 'दुसरा पेशवा' हीं नाटकें आणि 'समिधा' हा गद्यगीतांचा संग्रह

कुसुमाग्रजांच्या काव्याबद्दल येथे कांही लिहावें, असें नाही, पण कांही गोष्टी सांगितल्यास हरकत नाही, असें वाटते रविकिरणमंडळाचा व त्या काळातील इतर कवींचा बहर ओसरल्यानंतर, मराठी कवितेबाबत जें औदासिन्य कांही लोकांच्या ठिकाणीं दिसून येई, तें विशाखा प्रसिद्ध झाल्यानंतर नाहीसें झालें. मराठी कवितेला आहोटी लागली, ही ओरड विशाखेने बंद पाडली. विशाखेचें उज्ज्वल यश पाहून अनेक उदयोन्मुख कवि उत्साहाने कविता लिहू लागले आणि, "महाराष्ट्र कविपरंपरा, खंड न पडला तिला जरा-" ह्या कविवर्य Bee यांच्या उद्गारांची सत्यता पुन्हा एकवार सिद्ध झाली. साकल्याने विचार करतां, माधव जूलियन, यशवंत, निशिगंध, आनन्द, आ. रा. देशपांडे, वा. ना. देशपांडे, गु. ह. देशपांडे, काणेकर-प्रभृतींच्या काव्यापेक्षां कुसुमाग्रज, ना. घ. देशपांडे, कांत, काळेले, बोरकर-वगैरे कवींची कविता कमी सरस आहे, असें म्हणणें निःसंशय धाडसाचें होईल. कुसुमाग्रजांच्या कवितेची छाया अलिकडील बहुतेक कवींच्या काव्यावर पडलेली दिसते. अलिकडील सर्व कवींपेक्षा त्यांची कविता अधिक प्रभावी ठरली, याचें मुख्य कारण म्हणजे त्यांच्या कवितेचा वेगळेपणा हें होय. ताम्बे, माधव ज्यूलियन्, यशवन्त यांच्यासारखे धुरंधर कवि आपल्या वैभवांत तळपत असतांना कुसुमाग्रजांनी काव्यलेखनास सुरवात केली. पण प्रा. जोग यांनी म्हटल्याप्रमाणें त्यांना कोणाच्याहि कक्षेंत न जातां स्वतःचाच मार्ग चोखाळला ह्या पृथगात्मतेला, भावनांच्या उत्कटतेची, भाषाप्रभुत्वाची आणि भव्य कल्पकतेची जोड मिळाल्यामुळे त्यांच्या कवितेने सर्वांच्या मनांची तात्काळ पकड घेतली. खांडेकरांनी म्हटल्याप्रमाणें, कुसुमाग्रज मानवतेचे कवि आहेत. वैयक्तिक सुखदुःखांपेक्षा सामाजिक सुखदुःखांकडेच त्यांची प्रतिभा सामान्यतः अधिक आकर्षिली जाते. त्यांचा हा दृष्टिकोन समजून घेण्याच्या दृष्टीने "टिळकांच्या पुतळ्याजवळ" ही कविता महत्त्वाची आहे, असें मला वाटतें. या कविते-

मधील नायक "उद्दाम निराशा करि तांडव हृदयांत घोंगावे वादळ जेवी जीर्ण गडांत" अशा विकल मानासिक अवस्थेंत टिळकांच्या पुतळ्याजवळ जातो. इतक्यांत डोंगराप्रमाणें टिळकांची मूर्ती त्याच्या डोळ्यांत भरते आणि,त्याचें मन टिळकांच्या आणि आपल्या जीविताची तुलना करूं लागतें. टिळकांना काय वैयक्तिक सुखदु:खें नसतील? पण टिळकांनी त्यांची कधींच तमा बाळगली नाही. टिळकांचें खरेखुरें जीवित होतें आणि आपलें?

– " तें होतें जीवित–अन् हा जीवितभास!"

आपलें जीवित नसून जीविताचा नुसता भास आहे; कारण, क्षुद्र वैयक्तिक सुखदु:खांतच आपण सदैव गुरफटलेलों असतों. आणि असें गुरफटलेले असतांनाच एक दिवस आपली जीवनयात्रा संपते!

" कण क्षुद्र घेउनी सुख:दुखाचे हातीं
बेहोष धांवतों जीवन मार्गावरती
पर्णापरि वाऱ्यावरती हलतों डुलतों!
जो धुळींत लाभे अखेरची विश्रांती!
हें जीवन कसलें, ही मरणाची माला,
मासोळी झटते तोडायास गळाला,
दर्यावरती वाहे दुभंगलेली नाव
क्षण खालीं वरती, क्षणांत आणि तळाला!"

आपलीं वैयक्तिक सुखदु:खें कितीहि मोठीं असलीं, तरी तीं क्षुद्रच होत आणि तीं जर क्षुद्र असलीं, तर कवितेनें त्यांची फारशी दखल घेण्याचें कारण नाही. कुसुमाग्रजांची भूमिका अशी असल्यामुळेच त्यांची प्रतिभा सामाजिक सुखदु:खें चितारण्यांत अधिक दंग होते, असें वाटतें.

'बळी,' 'लिलाव', 'गुलाम', 'सहानुभूति', 'जालियनवाला बाग', 'बंदी'–वगैरे कवितांमध्ये सामाजिक दु:खांना त्यांनी मोठ्या आवेशानें, त्वेषानें आणि उत्कटतेनें वाचा फोडली आहे. आणि, हे अन्याय आणि दु:खें नाहीशीं करावयाचीं असतील, तर दुबळे अश्रु ढाळून किंवा परमेश्वरावर विसंबून चालणार नाही; तर त्यासाठी स्वत:चें सामर्थ्य उपयोगांत आणणें हा एकच मार्ग आहे, असा त्यांचा अढळ विश्वास आहे.' गर्जा जयजयकार', 'आगगाडी व जमीन', 'कोलंबसाचें गर्वगीत', 'हा काठोकाठ कटाह भरा'-वगैरे कवितांमध्ये कुसुमाग्रजांनी क्रांतीचा सावेश पुरस्कार केला आहे. भावनांची उत्कृष्टता आणि समर्पक शब्दयोजना यांमुळे या सर्व कविता अंत:करण थरारून टाकतात. मात्र या कवितांमधील त्यांची भूमिका प्रचारकाची नसून कलावन्ताची आहे आणि त्यामुळेच त्यांचें काव्य इतकें प्रभावी वाटतें. हिंदु विधवांच्या शोचनीय स्थितीवर प्रवचन झोडणाऱ्या अनेक कविता लिहिल्या गेल्या आणि विस्मृतीच्या गर्तेंत नष्ट झाल्या, पण तांब्यांच्या 'विधवेचें स्वप्न आणि हिंदु विधवेचें मन' या कविता अमर ठरल्या, याचें कारण या कवितांमधील तांब्यांची भूमिका कलावंताची आहे, हेंच होय. वरील सर्व कवितांमधील कुसुमाग्रजांची भूमिका तशीच आहे. दलित वर्गाच्या हृदयभेदक जीवनाचें चित्रण करायचें झाल्यास, तें त्या समाजांतील बळी पडलेल्या एखाद्या अभागी जीवाच्या भावनांचें आणि दुर्दशेचें चित्र उत्कट स्वरूपांत रेखाटतील. सर्व अन्याय मुकाट्यानें सहन करणारा खालचा वर्ग सुद्धा एक दिवस मिरासदारांची धुळधाण उडवील, हें त्यांना सांगावयाचें असल्यास ते 'आगगाडी व जमीन' या कल्पकतापूर्ण रूपकाचा आश्रय घेतील. क्रांतिकारकांच्या अचल निर्धाराचें दर्शन घडवायचें असल्यास ते "डमडमच्या तुरुंगां"तील राजबंद्यांच्या प्रक्षुब्ध भावनांना तोंड फोडतील. प्रचारकाचा पेशा पत्करून त्यांनी एकहि कविता लिहिलेली नाही. कुसुमाग्रजांची कोणचीहि कविता घेतली, तर तिच्यामधील भावनांची उत्कटता आणि रम्य कल्पकता हे दोन विशेष सहज डोळ्यांत भरतात. खांडेकरांनी म्हटल्याप्रमाणें, कुसुमाग्रजांइतकी अष्टपैलु कल्पकता फारच थोड्या मराठी लेखकांच्या वाट्याला आली असेल. त्यांच्या कल्पना जितक्या भव्य, तितक्याच रम्य आणि जितक्या नाविन्यपूर्ण तितक्याच काव्यपूर्ण असतात. आणि, मुख्य म्हणजे त्यांच्या कवितांतला कल्पकताविलास हा

त्यांत व्यक्त केलेल्या भावनांशीं अगदीं एकजीव झालेला असतो. 'अहि-नकुल', 'ताजमहाल', 'उषास्वप्न', 'विराटवड', 'मेघांची सेना', 'पृथ्वीचें प्रेमगीत', 'आगगाडी व जमीन', 'मूर्तिभंजक', 'मातीची दर्पोक्ति', 'किनाऱ्यावर'—वगैरे कवितांमधील कल्पकतेचा विलास कोणाला मोहविणार नाही? काव्यांत जीवन-विषयक तत्त्वज्ञान नको, असें म्हणणाऱ्यांना सुद्धा कुसुमाग्रजांची कविता, तिच्यामधील कल्पकतेच्या विलासामुळे, भावनांच्या उत्कटतेमुळे आणि डौलदार भाषाशैलीमुळे सदैव प्रिय वाटेल, यांत शंका नाही.

• • •

भवभूतीच्या नाटकांतील कालप्रियनाथ

प्रिन्सिपॉल वा. वि. मिराशी, एम्. ए.

* * *

● महाकवि भवभूति याचीं तीन्ही नाटकें 'कालप्रियनाथा'च्या उत्सवप्रसंगीं रंगभूमीवर आलीं, असें स्वत: तोच सांगतो. हा 'कालप्रियनाथ' कोणता?—म. म. पां. वा. काणे यांच्या मतें तो उज्जयनीचा 'महाकालेश्वर' होय; आणि हेंच मत आतापावेतों विद्वन्मान्य झालेलें आहे. पण या मतास प्रिन्सि. मिराशी यांनी या लेखांत जबरदस्त धक्का दिला आहे! त्यांनी साधार दाखविलें आहे कीं, 'कालप्रियनाथ' म्हणजे उज्जयनीचा 'महाकालेश्वर' नसून काल्पी येथील 'सूर्यदेव' होय!

प्रिन्सि. मिराशी यांचा हा शोध संस्कृत पंडितांत खळबळ उडविणारा वाटेल!

सुप्रसिद्ध वैदर्भ कवि भवभूति यांची तीनहि उपलब्ध नाटकें कालप्रियनाथाच्या उत्सवप्रसंगीं प्रथम रंगभूमीवर आलीं, असें त्यांच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. उदाहरणार्थ, त्याचें पहिलें नाटक 'महावीरचरित' याच्या प्रस्तावनेंत सूत्रधार म्हणतो—

भगवत: कालप्रियानाथस्य यात्रायामार्यमिश्रा: समादिशन्ति। (भगवान् कालप्रियानाथाच्या यात्रेमध्ये जमलेल्या सद्गृहस्थांनी मला आज्ञा केली आहे.)

त्यानंतरचें नाटक 'मालतीमाधव' याच्या प्रस्तावनेंत त्याच्या प्रथम प्रयोगाविषयीं खालील उल्लेख आहे. सूत्रधार म्हणतो, 'मारिष सुविहितानि रङ्गमङ्गलानि, संनिपतितश्च भगवत: कालप्रिय-नाथस्य यात्राप्रसंगेन नानादिगन्तवास्तव्यो महाजनसमाज:। आदिष्टश्चास्मि विद्वज्जनपरिषदा यथा केनचिदपूर्वप्रकरणेन वयं विनोदयितव्या इति।' (मारिषा! रङ्गभूमीचीं मंगलकृत्यें उत्तम रीतीने पार पडलीं आहेत. भगवान् कालप्रियनाथाच्या यात्रेच्या निमित्ताने भिन्न भिन्न दिशांतील दूर देशांत वास्तव्य करणारे अनेक लोक येथे आले आहेत. तेव्हा विद्वज्जनसभेने मला आज्ञा केली आहे की, एखाद्या नवीन नाटकाने आमचें मनोरंजन करावें.)

उत्तररामचरित हें तिसरें नाटकहि काल-प्रियनाथाच्या यात्रेमध्ये जमलेल्या लोकांपुढें प्रथम दाखविलें गेलें, असें त्याच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. तेव्हा भवभूतीचीं नाटकें प्रथम राजदरबारीं मान्यता पावलीं नसून लोकाश्रयावर प्रसिद्धीस आलीं व त्यांचा प्रथम

प्रयोग कालप्रियनाथ नामक देवतेच्या यात्रेच्या प्रसंगीं झाला, हें स्पष्ट आहे. हें कालप्रियनाथाचें देवालय फार प्रसिद्ध असून त्याच्या यात्रेकरिता हिंदुस्थानांतील दूरदूरच्या भागांतून लोक येत असत, असें 'मालतीमाधवां'तील वर्णनावरून दिसतें. हें कालप्रियनाथाचें देवालय कोठे होतें, हें ठरविण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखांत केला आहे.

प्रथम याविषयीं संस्कृत टीकाकार काय म्हणतात, तें पाहूं. या देवाचें नांव 'कालप्रियानाथ' व 'कालप्रियनाथ' असें दोन प्रकारें आढळतें. दुसऱ्या नांवांतहि मूळचें रूप 'कालप्रियानाथ' असेंच असून नंतर 'ङ्यापोः संज्ञाछन्दसोर्बहुलम्[१]' या पाणिनीच्या सूत्रानुसार 'कालप्रिया' याचें 'कालप्रिय' असें रूप झालें, असें एका टीकाकाराने म्हटलें आहे. पुढे तो म्हणतो. कालप्रिया म्हणजे अम्बिका व तिचा नाथ म्हणजे शंकर. या स्पष्टीकरणांत 'भवानीपतिः' या नांवांतल्याप्रमाणें 'विरुद्धमतिकृत्' हा दोष येतो (काव्यप्रकाश, उल्लास ७) ही गोष्ट वेगळी. कालप्रियनाथाचें देवालय कोठे होतें, याविषयीं टीकाकारांनी विशेष काही लिहिलें नाही. 'त्या क्षेत्रांतील हें दैवत होतें,' 'कालप्रिया नांवाची देवता तेथे होती, तिची कथा पुराणांत पाहावी' इत्यादि उडवाउडवीचीं विधानें करून त्यांनी वेळ मारून नेली आहे. रामचंद्रबुधेन्द्र नामक एका टीकाकाराने मात्र कालप्रियनाथ हा विदर्भांतील पद्मनगरांत स्थापलेला देव होता व त्याच्या उत्सवप्रसंगीं हें 'मालतीमाधव' नाटक प्रथम दाखविलें गेलें, असें म्हटलें आहे. पण त्याच्या म्हणण्याला काही आधार दिसत नाही. भवभूति हा स्वतः विदर्भांतील पद्मपुरचा राहणारा. त्याचे पूर्वजहि तेथे चार पाच पिढ्या वास्तव्य केलेले. त्या नगरांत त्याच्या नाटकांचे प्रथम प्रयोग झाले असते, तर त्यानें त्यांमध्ये आपले पूर्वज व स्वतःची विद्वत्ता ,याविषयीं जी सविस्तर माहिती दिली आहे, ती देण्याची त्याला आवश्यकता वाटती ना. शिवाय विदर्भांत कालप्रियनाथ या नावाचें विख्यात क्षेत्र होतें, असा इतरत्र कोठेंहि उल्लेख नाही. तेव्हा हें कालप्रियनाथाचें देवालय विदर्भापासून दूर अंतरावर असावें व त्या ठिकाणीं भवभूतीविषयीं लोकांस माहिती नसल्यामुळे त्याला ती आपल्या नाटकांच्या प्रस्तावनेंत देणें आवश्यक वाटलें असावें, असें अनुमान करण्यास हरकत नाही.

भवभूतीच्या नाटकाचे आधुनिक टिप्पणीकार कालप्रियनाथ हा उज्जयनीचा 'महाकाल' होय, असें म्हणतात.[२] उज्जैनी हें फार पुरातन काळापासून क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. तेथील महाकालाची द्वादश ज्योतिर्लिंगात गणना होते व भवभूतीच्या पूर्वीच्या कालिदासादि संस्कृत कवींनी त्याचें सुंदर वर्णन केलें आहे. शिवाय कालिदासाप्रमाणें भवभूतीहि शिवोपासक होता, असा समज आहे. तेव्हा त्याचीं नाटकें महाकालाच्या यात्रेच्या प्रसंगीं प्रथम रंगभूमीवर आलीं असलीं तरी त्यांत आश्चर्य नाही. या कारणामुळे कालप्रियनाथ म्हणजे उज्जैनीचा महाकालेश्वर हें मत आतापर्यंत विद्वन्मान्य झालें आहे.

पण हें मत बरोबर आहे, असें वाटत नाही. महाकालाचा उल्लेख व वर्णन अनेक संस्कृत ग्रंथांत व पुराणांत आढळतें खरें, पण त्यामध्ये कोठेहि त्याचें कालप्रियनाथ असें नांव दिसत नाही. शिवाय भवभूति हा शिवोपासक होता, असेंहि दिसत नाही. तसें असतें, तर कालिदासाने आपल्या सर्व नाटकांच्या आरंभीं शिवस्तुतिपर नान्दी घातली आहे, तसा प्रकार भवभूतीच्या नाटकांतहि दिसला असता. पण भवभूतीने फक्त 'मालतीमाधवां'त आरंभी गणपतीच्या विनोदमय वर्णनानंतर शिवस्तुतिपर श्लोक घातला आहे. 'महावीरचरिता'च्या नान्दींत स्वयंभू नित्य चैतन्य ज्योतीला म्हणजे ब्रह्माला व 'उत्तररामचरितां'त पूर्वसूरींना नमन केलें आहे

---

१ वेदांत व विशेषनामांत समासाच्या पहिल्या अवयवाच्या शेवटच्या स्त्रीलिंगवाचक ई व आ या प्रत्ययाचा स्वर पुष्कळदा ह्स्व होतो. उदाहरणार्थ 'कालिदास.'

२ म. म. पां. वा. काणे यांची 'उत्तररामचरिता'ची आवृत्ती (टिप्पणी, पृ. ३) पाहा.

व तें त्याच्या वेदान्ती मताला अनुरूप असेंच आहे. ' मालतीमाधवा ' च्या प्रस्तावनेंत

यद्वेदाध्ययनं तथोपनिषदां सांख्यस्य योगस्य च
ज्ञानं तत्कथनेन किं नहि ततः कश्चिद्गुणो नाटके।

—इत्यादि श्लोकांत आपण वेद, उपनिषदें, सांख्य, योग इत्यादिकांचें अध्ययन केलें होतें, असें त्याने स्वतःच सांगितलें आहे. तेव्हा त्याचीं धार्मिक मतें उदार झालीं होतीं व सर्व देवतांत एकच ब्रह्मतत्त्व वास करतें, हें मत त्याला मान्य झालें होतें, यांत संशय नाही. अर्थात् ' तो शैव होता व कालप्रियनाथाच्या यात्रेच्या प्रसंगीं त्याच्या नाटकाचे प्रयोग झाले, म्हणून कालप्रियनाथ हा उज्जैनीचा महाकालच असावा, ' असें म्हणतां येत नाही.

तर मग कालप्रियनाथ कोण व त्याचें देवालय कोठे होतें, असा प्रश्न उपस्थित होतो. यासंबंधी प्रस्तुत लेखकाच्या अलीकडील संशोधनावरून उपलब्ध झालेली माहिती पुढे दिली आहे.

भविष्यपुराण, वराहपुराण, स्कन्दपुराण इत्यादि पुराणांत कृष्णपुत्र साम्बाची कथा आली आहे. साम्बावर कृष्णाच्या अनेक स्त्रिया अनुरक्त झाल्या होत्या, असें नारदाने कृष्णाला सांगितल्यावर त्याने त्यासंबंधी चौकशी करून सांबाला तूं कुष्ठी होशील-असा शाप दिला. नंतर सांबाने भगवान् सूर्याची आराधना मूलस्थान येथे केल्यावर तो त्या रोगांतून मुक्त झाला. पुढे सूर्याने त्याला वर देऊन लौकरच तुला माझी प्रतिमा मिळेल, तिची स्थापना कर असें सांगितलें. नंतर नेहमीप्रमाणें ऋषींसह तो चन्द्रभागा नदीस स्नानास गेला असतां सूर्याची तेजस्वी मूर्ति वाहत आलेली त्याला दिसली. तेव्हा त्याला सूर्यदेवाच्या सांगण्याची सत्यता पटून त्याने ती मूर्ति प्रवाहांतून काढून घेतली व तेथील मित्रवनामध्ये स्थापिली. नंतर त्याने त्याच मूर्तीला 'आपली ही सुंदर आकृति कोणी बनविली ' असें विचारलें. त्यावर सूर्याने सांगितलें की, विश्वकर्म्याने हिमालयावर कल्पवृक्षांतून ही मूर्ति निर्माण केली व तुझ्याकरितां चंद्रभागेमध्ये सोडली. हे सांबा, या रम्य ठिकाणीं माझें सांनिध्य नेहमी राहील. पुढें भगवान सूर्य म्हणाले, सांनिध्ये मम पूर्वाह्णे सुतीरे द्रक्ष्यते जनः। कालप्रिये च मध्याह्ने ऽपराह्णे चात्र नित्यशः॥ लोकांना माझें सानिध्य पूर्वाह्णीं सुतीर येथे, व मध्याह्नीं कालप्रिय येथे व सायंकाळीं येथें म्हणजे चन्द्रभागातीरीं मूलस्थान या ठिकाणीं नेहमी पाहावयास मिळेल. कांही ठिकाणी ' सुतीरे ' याच्या ऐवजी ' मुण्डीरे ' असाहि पाठ आहे. हीं तीन स्थानें कोठे होतीं, याविषयीं वराहपुराणांत (अध्याय १७८, श्लोक ५५-५७) खालील वर्णन आढळतें.

साम्बः सूर्यप्रतिष्ठां च कारयामास तत्त्ववित्।
उदयाचले च संश्रित्य यमुनायाश्च दक्षिणे॥
मध्ये कालप्रियं देवं मध्याह्ने स्थाप्य चोत्तमम्।
मूलस्थानं ततःपश्चाद् अस्तमानाचले रविम्॥
स्थाप्य त्रिमूर्तिं साम्बस्तु प्रातर्मध्यापराह्णिकम्॥

इत्यादि. या श्लोकांत साम्बाने सूर्यमूर्तीची स्थापना उदयाचलावर, म्हणजे पूर्व दिशेच्या पर्वतावर, यमुनेच्या दक्षिणेस कालप्रिय येथे व अस्तमानाचलीं किंवा पश्चिमपर्वतावर मूलस्थान येथें अशा तीन ठिकाणीं केल्याचा निर्देश आहे. यांपैकीं पहिल्या स्थानाचा उल्लेख गंगासागरसंगम असाहि कांही ठिकाणीं केलेला आढळतो. कांही ठिकाणीं त्याला सूर्यकानन, रविक्षेत्र किंवा सूर्यक्षेत्र असे म्हटलें आहे. ब्रह्मपुराणांत उत्कल देशांतील कोणादित्य किंवा कोणार्क यालाहि रविक्षेत्र असें नांव दिलें आहे. कोणार्क हें पूर्वतीरावर बांधलेल्या अत्यंत भव्य अशा सूर्यमंदिराचें नांव आहे. हें देवालय पुरीपासून सुमारे तीस मैलांवर आहे. तें ओरिसा (प्राचीन उत्कल) देशाच्या गङ्गवंशी पहिल्या नरसिंह राजानें[3] इ. स. च्या तेराव्या शतकांत बांधलें असून हिंदुस्थानांतील प्राचीन काळच्या प्रेक्षणीय स्मारकांत त्याची गणना होते. पुराणवस्तुसंशोधनखात्याचे माजी डायरेक्टर जनरल सर जॉन मार्शल यांनी एके ठिकाणीं म्हटलें आहे की, ' जर कोणी मला हिंदुस्थानांतील प्राचीन काळचीं प्रेक्षणीय स्मारकें कोणतीं असा प्रश्न केला, तर आग्र्याचा ताजमहाल, कोणार्क येथील सूर्याचें देवालय, वेरूळ येथील कैलासनामक लेणें, अजंठ्याचीं चित्रें असलेलीं लेणीं व सांचीचें

---

३ ह्या राजाने सुमारें इ. स. १२३८ पासून १२६४ पर्यंत राज्य केलें.

स्तूप–इतक्यांचा निर्देश मी निःसंशय करीन.' यावरूनहि कोणार्काच्या श्यामप्रस्तरनिर्मित देवालयाचें (Black Pagoda) महत्त्व ध्यानांत येईल. हें देवालय समुद्रकाठीं वालुकामय प्रदेशांत बांधलें आहे. समुद्रावरच्या क्षारमिश्रित वायूने त्याच्या शिलाखंडावर परिणाम होऊन ते खडबडीत होतात. म्हणून पुराणवस्तुसंशोधनखातें तें देऊळ गोड्या पाण्यानें धुण्यांत दरवर्षी पुष्कळ खर्च करतें. आठ वर्षांपूर्वी कलकत्त्यास अखिल-भारतीय-इतिहास- परिषदेला आम्ही गेलो होतों, त्यावेळीं हें कोणार्काचें देऊळ पाहिलें. आम्ही तेथें गेलों, त्यावेळीं हें धुण्याचें काम चालू होतें. अशा ठिकाणीं हें अत्यंत भव्य देवालय बांधण्याचें कारण तें स्थान प्राचीन काळापासून सूर्यक्षेत्र म्हणून प्रसिद्ध होतें हें होय.

पश्चिमेकडील मूलस्थान हें सध्याचें मुलतान होय. मुलतान चन्द्रभागा (सध्याच्या चिनाब) नदीवर वसलें आहे. या ठिकाणीं एका टेकडीवर सूर्याचें सुप्रसिद्ध देवालय होतें. अरब इतिहासकारांनी या देवळाचें व त्यांतील मूर्तीचें वर्णन केलें आहे त्यावरून त्यांतील सूर्याची प्रतिमा लाकडाची होती[४] व तिच्या डोळ्याच्या ठिकाणीं दोन माणकें बसविलीं होतीं, असें दिसतें. मागे भविष्यपुराणांतील या मूर्तीचें वर्णन दिलें आहे, त्यांतही मूर्ति चंद्रभागा नदीच्या प्रवाहांतून वाहत आली, असें म्हटलें आहे. त्यावरून पुरींतील जगन्नाथाच्या मूर्तीप्रमाणें मूलस्थानमध्येंहि लांकडी मूर्तीची पूजा होत असे, असें दिसतें.

मूलस्थानच्या सूर्याच्या यात्रेला सिंधमधून व हिंदुस्थानांतील दूरदूरच्या प्रदेशांतून लोक जमत असत, असें अरब इतिहासकार सांगतात. त्यामुळे तेथील देवस्थानाला मोठें उत्पन्न होई. महम्मद काशीमने मुलतान काबीज केलें, तेव्हा त्याला या देवळांत तेरा हजार दोनशे मण सोनें मिळालें, असें ' चचनामा ' ग्रंथांत वर्णन आहे. अरब हे मूर्तिभंजक होते, तथापि या ठिकाणच्या यात्रेच्या उत्पन्नाच्या लोभाने त्यांनी ही मूर्ति भग्न केली नाहीं व तिची पूजा पूर्वीप्रमाणें चालू दिली. त्याकाळीं कनोजचे प्रतिहार हे उत्तर हिंदुस्थानांत अत्यंत प्रबळ होते. त्यांनी व इतर राजांनी मुलतानचें पवित्र क्षेत्र मुसलमानांच्या ताब्यांतून सोडविण्याचा अनेकदा प्रयत्न केला. पण जेव्हा जेव्हा मुसलमानांना त्यांच्याशीं सामना करणें कठीण वाटे तेव्हा तेव्हा ते ही सूर्याची मूर्ति भग्न करण्याचा धाक घालीत आणि त्यामुळे हिंदू लागलीच माघार घेत, असें अरब इतिहासकार अल मसूदी याने लिहून ठेवलें आहे.

मुंडीर किंवा कोणार्क, आणि मूलस्थान किंवा मुलतान येथें सूर्याचीं सुप्रसिद्ध देवालयें होतीं व तेथे दूरदूरचे लोक यात्रेच्या निमित्तानें जमत असत हें आपण पाहिलें. कालप्रियाच्या बाबतींतहि तशीच स्थिती होती, असें मानण्यास हरकत नाहीं. वरील दोन क्षेत्रें हिंदुस्थानच्या पूर्व व पश्चिम टोकांना होतीं, तर कालप्रिय हें त्यांच्या मध्यभागी होतें व म्हणून त्या ठिकाणीं सूर्याचें सांनिध्य मध्याह्नीं असे, असें पुराणांत म्हटलें आहे. कालप्रिय हें कन्नोजच्या दक्षिणेस होतें, असें राजशेखराच्या काव्यमीमांसेवरून दिसते. राजशेखर म्हणतो ' अनियतत्वाद्दिशामनिश्चितो दिग्विभाग इत्येके । तथाहि यो गाधिपुरस्य दक्षिणः स कालप्रियस्य उत्तरः ।' यावरून गाधिपुर किंवा कनोज व कालप्रिय यांमध्ये फारसें अंतर नसावें, असें दिसतें. कालप्रिय हें यमुनेच्या कांठीं होतें, हें आपण मागे पाहिलेंच आहे. तेव्हा कालप्रिय हें सध्याचे यमुनेच्या कांठचें काल्पी असावें, असें वाटतें.[५] कालप्रिय व काल्पी यांतील नामसादृश्यही ध्यानांत घेण्यासारखें आहे. सध्याच्या काल्पी शहराच्या बाहेर पश्चिमेच्या बाजूस अद्यापि जुने अवशेष दिसतात. तेथील जुन्या पडक्या इमारतींच्या अवशेषांना चौऱ्यायशी घुमट अशी संज्ञा आहे. काल्पी येथे उत्खनन झालें नाहीं.

कालप्रिय हें यमुनेच्या काठीं असून तेथें एक विस्तृत आवार असलेलें भव्य देवालय होतें, हें कोरीव

---

४ 'चचनाम्यांत ही मूर्ति सोन्याची होती असें म्हटलें आहे.

५ कालप्रिय हें काल्पी असावें असें अनुमान प्रथम कै. माधव व्यंकटेश लेले यांनी आपल्या ' मालतीमाधव सार व विचार ' (पृ. ९८) या लेखांत केलें होतें. पण नुसतें या अनुमानाला शब्दसादृश्यावाचून दुसरा आधार नाहीं, असें त्यांनीच म्हटलें आहे, याच्या बरोबरच ' विदर्भदेश म्हणजे (ग्वाल्हेर संस्थानांतील) नरवारच्या आसपासचा प्रदेश होय, ' असेंहि चमत्कारिक विधान त्यांनीं केलें आहे !

लेखांवरूनहि दाखवितां येते. इ. स. च्या दहाव्या शतकाच्या आरंभीं दक्षिणेंत मान्यखेट (सध्याचें निजामच्या राज्यांतील मालखेड) येथें राष्ट्रकूट वंशी महाप्रतापी राजा तिसरा इन्द्र हा राज्य करीत होता. हा इ. स. ९१५ मध्यें गादीवर आला. त्यानंतर लौकरच त्याने उत्तरेंत कनोजच्या प्रतिहार राजाच्या मुलखावर स्वारी केली व कनोजपर्यंत चाल करून तें राजधानीचें शहर उध्वस्त केलें. या स्वारींत त्याला वाटेंत कालप्रिय येथे देवळाच्या परिसरांत आपल्या सेनेसह कांहीं काळ थांबावें लागलें व नंतर त्याने यमुना पार केली; याचें सुंदर वर्णन खालील श्लोकांत केलें आहे. हा श्लोक त्याचा मुलगा चतुर्थ गोविंद याच्या खंबायत व सांगली या ठिकाणीं सांपडलेल्या दोन्ही ताम्रपटांत आला आहे.

यन्माद्यद्द्विपदन्तघातविषमं कालप्रियप्राङ्गणं
तीर्णा यत्तुरगैरगाधयमुना सिन्धुप्रतिस्पर्धिनी ।
येनेदं हि महोदयारिनगरं निर्मूलमुन्मूलितं
नाम्नाद्यापि जनैः कुशस्थलमिति ख्यातिं परां नीयते॥

भावार्थ—

तृतीय इन्द्राच्या मदोन्मत्त हत्तीच्या दंतांच्या आघाताने कालप्रियाचें प्राङ्गण उंचसखल झालें, त्याच्या घोड्यांनी सागराशीं विशालत्वांत स्पर्धा करणारी यमुना नदी पोहून पार केली. त्याने समूळ उध्वस्त केल्यामुळे हीं महोदय (कनोज) नामक शत्रूची राजधानी अद्यापि कुशस्थल या नांवाने प्रसिद्ध झाली आहे.[६] (पूर्वीच्या सुसमृद्ध शहरांत सध्या गवत उगवलें आहे असा अर्थ).

या श्लोकावरून कालप्रिय देवाचें अंगण अत्यंत विस्तृत होतें–इतकें की, त्यामध्यें हत्ती, घोडे, पायदळ इत्यादि इंद्र नृपतीची चतुरंग सेना सामावली. तें शहर यमुनेच्या काठीं होतें. कारण त्यानंतर इंद्रराजाला यमुना पार करून कनोजवर चाल करतां आली–इत्यादि माहिती मिळते. इंद्रराजाच्या दरबारच्या कवींनी आपल्या प्रभूच्या उत्तर हिंदुस्थानांतील स्वारीच्या वर्णनांत दुसऱ्या कोणत्याहि शहराचा उल्लेख केला नाहीं. कालप्रियाचा उल्लेख करण्याचें कारण तेथील देवालयामुळे त्याला भरतखंडभर प्रसिद्धी प्राप्त झाली होती व तेथून विशाल यमुनेचें पात्र ओलांडल्यावर लौकरच इंद्राला कनोजवर हल्ला करतां आला, हें असावें हें उघड आहे. सध्याचें काल्पी हें मान्यखेट (मालखेड) पासून कनोजला जाणाऱ्या प्राचीन मार्गावर आहे. काल्पीहून कनोज उत्तरेस सुमारें ७५ मैलांवर आहे. कालप्रिय येथील देवालयांत कोणत्या देवतेची स्थापना केली होती, याचा या कोरीव लेखांत उल्लेख नाहीं. पण त्या शहराचें बाकीचें वर्णन राजशेखराची काव्यमीमांसा व भविष्य, वराह, सांब इत्यादि पुराणें यांतील वर्णनाला धरूनच आहेत, हें दिसून येईल.

तेव्हा कालप्रिय (सध्याची काल्पी) येथे सर्व भरतखंडांत सुविख्यात झालेलें असें सूर्याचें विशाल देवालय होतें, तेथे यात्रेच्या निमित्ताने दूरदूरच्या प्रदेशांतून लोक येत व त्या यात्रेच्या प्रसंगीं भवभूतीचीं नाटकें प्रथम रंगभूमीवर आलीं हें स्पष्ट होईल. ही माहिती ध्यानांत घेतली असतां भवभूतीने मालतीमाधवांत सूर्यस्तुतीपर खालील श्लोक कां घातला; याचें स्वारस्य ध्यानांत येईल.[७] सूत्रधार म्हणतो—

कल्याणानां त्वमसि महसां भाजनं विश्वमूर्ते
धुर्यां लक्ष्मीमथ मयि भृशं धेहि देव प्रसीद ।
यद्यत्पापं प्रतिजहि जगन्नाथ नम्रस्य तन्मे
भद्रं भद्रं वितर भगवन्भूयसे मङ्गलाय ॥

[भावार्थ–हे विश्वमूर्ते ! तूं मंगल अशा तेजाचा निधि आहेस. मजवर कृपा करून वरिष्ठ अशी समृद्धि मला दे. मी तुजपुढे नम्र झालों आहे. माझीं सर्व पापें नष्ट करून मङ्गलप्राप्ती-करिता सर्व कल्याणप्रद वस्तु प्राप्त करून दे.]

---

६ महोदय व कुशस्थल हीं दोन्ही कनोजचीं प्राचीन नांवें होत.

७ या श्लोकावरून भवभूतीचें आराध्य दैवत सूर्य असावें, असें अनुमान कै. मा. त्र्यं. लेले यांनी केलें आहे, पण तें बरोबर दिसत नाहीं.

कालप्रिय येथे भवभूतीच्या नाटकांचे प्रयोग झाल्यावर लौकरच त्याची कीर्ति कनोजचा सम्राट यशोवर्मा याच्या कानावर गेली व नंतर त्याने त्याला सन्मानाने बोलावून आपल्या दरबारीं ठेवून घेतलें, असें कल्हणाची राजतरंगिणी व वाक्पतिराजाचें गउडवहो, या ग्रंथांवरून दिसतें.

वरील विवेचनावरून भवभूतीच्या नाटकांत उल्लेखिलेलें कालप्रियनाथाचें देवालय हें सूर्याचें असून तें उज्जैनीस नव्हतें, तर यमुनेच्या काठीं काल्पीस होतें, हें दिसून येईल.

• • •

शकुन्तला आणि वनज्योत्स्ना

प्रा. गणेश त्र्यंबक देशपांडे,
एम्. ए., एल्‌एल्. बी.

● उमरावतीच्या श्री शिवाजी कॉलेजांतील प्रा. ग. त्र्यं. देशपांडे हे गाढे संस्कृत पंडित आहेत. कवि-कुल-गुरु कालिदासाच्या 'शाकुंतल' नाटकांत शकुन्तला व वनज्योत्स्ना यांचा कसा समान्तर वृत्तांत आला आहे, नव्हे, त्यांची कशी एकरूपता वर्णन केली आहे, हें या लेखांत प्रा. देशपांडे यांनी अत्यंत सरसतेने व साधार दाखविलें आहे.

'शाकुंतला' च्या अभ्यासकांस हा मुद्दा खचित नवीन वाटेल!

* * *

अनसूया–हलाशकुन्तले, इयं स्वयंवरवधू: सहकारस्य त्वया कृतनामधेया " वनज्योत्स्ना " इति नवमालिका। एनां विस्मृतवत्यसि।

शकुन्तला– तदा आत्मानमपि विस्मरिष्यामि। (लतामुपेत्य, अवलोक्य च सहर्षम्) हला, रमणीये खलु काले एतस्य लतापादपमिथुनस्य व्यतिकर: संवृत्त:। नवकुसुमयौवना वनज्योत्स्ना, स्निग्धपल्लवतया उपभोगक्षमश्च सहकार:।

...... शाकुन्तल अंक १ ला.

\+ \+ \+

शकुन्तला — (स्मृत्वा) तात, लताभगिनीं वनज्योत्स्नां तावत् आमन्त्रयिष्ये!

काश्यप:—अवैमि ते तस्यां सोदर्यस्नेहम्। इयं तावत् दक्षिणेन।

शकुन्तला—(लतामुपेत्य) वनज्योत्स्ने. चूतसङ्गतापि मां प्रत्यालिङ्ग इतोगताभि: शाखाबाहाभि:। अद्यप्रभृति दूरवर्तिनी ते खलु भविष्यामि।

काश्यप:—सङ्कल्पितं प्रथममेव मया तवार्थे
भर्तारमात्मसदृशं सुकृतैर्गता त्वम्।
चूतेन संश्रितवती नवमालिकेय—
–मस्यामहं त्वयि च संप्रति वीतचिन्त:॥

— शाकुन्तल अङ्क ४–१२

महर्षि कण्वांच्या आश्रमांत लतावृक्षांवरोबरच शकुंतला, अनसूया आणि प्रियंवदा या मुलीहि वाढत होत्या. मुलींनी वृक्षवेलींना रोज पाणी घालावें, त्यांची योग्य निगा राखावी आणि त्यांच्या निसर्गरम्य सहवासांत आपला काळ आनंदानें घालवावा. तिघींचेंहि सारखेंच वय आणि सारखेंच रूप; त्यांची मैत्री कोणाच्याहि नजरेत चटकन् भरत असे.[1] कण्वाश्रमाच्या पवित्र वातावरणांत त्या निरागस मुलींची निसर्गाशीं एकरूपता झाली होती.

त्यांतल्या त्यांत शकुंतलेची तर निसर्गाशीं विलक्षणच तन्मयता होत असे. आश्रमांतील वृक्षवेलींवर तिचें सोदर्यप्रेम होतें[2] आणि याची जाणीव महर्षि कण्वांनाहि होती.[3] लतावृक्षांची काळजी घेतांना कितीहि कष्ट झाले, तरी त्याची तिला खंत नसे. इतकेंच नव्हे, तर त्यांना पाणी घातल्याशिवाय ती स्वत: पाण्याचा थेंबहि घेत नसे; अलंकारांची आवड असूनसुद्धा त्यांच्या पल्लवांना शिवत नसे; वेलींना फुलांचा नवीन बहर आला, म्हणजे ती आनंदाने सण करीत असे.[4]

---

(१) राजा—अहो समानवयोरूपं भवतीनां सौहार्दम्। अंक १ ला.

(२) शकुन्तला—न केवलं तातनियोग एव, अस्ति मे सोदर्यस्नेहोऽपि एतेषु।··· अंक १ ला

(३) काश्यप:—अवैमि तेऽस्यां सोदर्यस्नेहम्। अंक ४ था

(४) पातुं न प्रथमं व्यवस्यति जलं
युष्मास्वपीतेषु या
नादत्ते प्रियमण्डनापि भवतां स्नेहेन
या पल्लवम्!
आद्ये व: कुसुमप्रसूतिसमये यस्या
भवत्युत्सव:-अंक ४।८

खरोखरच, ते सर्व तिचे ‘ वनवास बंधु ’ होते.[५] पतिगृहीं जातांना तिची मोठी विलक्षण अवस्था झाली होती. तिचें मन तिला पतीकडे ओढीत होतें, तर आश्रमांतून तिचा पाय निघत नव्हता.[६]

आणि, आश्रमांतील निवासियांची सुद्धा तशीच अवस्था झाली होती. कण्वासारखा एवढा तपोनिष्ठ मुनि, पण तोसुद्धा शकुंतला जाणार, या कल्पनेने व्याकूळ झाला होता ![७] मैत्रिणींना तर कांहीच सुचत नव्हतें. हीं तर बोलतीं चालतीं माणसें होतीं; पण आश्रमांतील प्राणी व लतासुद्धा शकुंतलेला जातांना पाहून बेचैन झाल्या होत्या ! मृगींनी गवत खाणें टाकून दिलें, मोरांना नाचणें सुचेना आणि लता तर ढळढळा रडावयास लागल्या ![८]

आश्रमांतील या लतांमध्येच नवमालिकेची एक लता होती. शकुंतलेची ती अत्यंत आवडती वेल. त्या लतेवर ती अगदी बहिणीसारखें प्रेम करीत असे. मोठ्या आवडीने तिने त्या लतेचें नांव ‘ वनज्योत्स्ना ’ ठेवलें होतें; आणि त्या नांवांत खरोखरच यथार्थता होती. मोसमांत ती वेल फुलांनी बहरून आली, म्हणजे ती केवढी खुलून दिसत असेल ? शकुंतलेचें प्रेम, कल्पकता, औचित्य आणि आनंद-सर्व कांही त्या नांवांतून प्रतीत होत होतें.

आणि, एका सहकार वृक्षाशीं त्या वन-ज्योत्स्नेचें लग्न शकुंतलेने ठरवूनहि टाकलें होतें. वनज्योत्स्नेचेंहि त्या वृक्षावर प्रेम असावें, कारण दिवसेंदिवस ती त्या वृक्षाकडेच झुकतांना दिसत होती.

एकदा तिघीहि मैत्रिणी आश्रमांतील लता-वृक्षांना पाणी घालीत होत्या. त्याबरोबरच हसत-खेळत त्यांच्या गोष्टी चालू होत्या. आपल्याला पेलतील असे घट भरून एकएका वेलीच्या आळ्यांत पाणी ओतावें, थोडावेळ तिच्याकडे निरखून बघावें, आणि ती नीट आहे, असें दिसलें की, प्रसन्न चित्ताने दुसरीकडे जावें.

अनसूयेचें लक्ष्य वनज्योत्स्नेकडे गेलें. शकुंतलेने तिला अजून पाणी घातलें नव्हतें.

“ अग शकुंतले, ” अनसूया म्हणाली, “ ती बघ, तुझी वनज्योत्स्ना. तिला विसरलीस वाटते ! ”

“ अग, तिला विसरलें, तर मी स्वतःलाच विसरेन ना ! ”—शकुंतलेने उत्तर दिलें.

शकुंतला लागलीच वनज्योत्स्नेकडे धावली. तिच्याकडे पाहतांच आज तिला केवढा आनंद झाला !

आणि, खरोखरच वनज्योत्स्ना आज अत्यंत रमणीय दिसत होती. त्या रमणीय ऋतूंत तिचा त्या आम्रवृक्षाशीं संयोग झाला होता. आणि काय अनुरूप जोडपें होतें तें ! नवकुसुमांनी बहर-लेल्या वनज्योत्स्नेचें यौवन तिच्या अंगाअंगांतून ओसंडत होतें आणि नवपल्लवांनीं युक्त असा सहकार उपभोग घेण्यास तयार होता ![९]

त्या मोहक दृश्यावर शकुंतलेची दृष्टि खिळून गेली.

प्रियंवदेचें लक्ष्य तिकडे गेलें. ती पोर मोठी लबाड ! मिस्किलपणें हंसत ती म्हणाली, “ अनसूये, ही शकुंतला त्या वनज्योत्स्नेकडे इतकी निरखून का बघते, सांग बरं ! ”

अनसूया बिचारी सरळ. प्रियंवदेचा खट्याळ-पणा तिला कुठला अवगत असणार ! “ मला नाही बाई कळत. तूंच सांग आपली ! ” ती प्रियंवदेलाच विचारूं लागली.

---

(५) अनुमतगमना शकुंतला
तरुभिरियं वनवासबन्धुभिः । —अंक ४।९

(६) शकुंतला—हला प्रियंवदे, ननु आर्यपुत्र-
दर्शनोत्सुकाया अपि
आश्रमपदं परित्यजन्त्या दुःखेन मे
चरणौ पुरतः प्रवर्तेते । —अंक ४

(७) यास्यत्यद्य शकुंतलेति हृदयं
संस्पृष्टमुत्कण्ठया
कण्ठः स्तंभितबाष्पवृत्ति
कलुषश्चिन्ताजडं दर्शनम् ।
वैक्लव्यं मम तावदीदृशमिदं
स्नेहादरण्यौकसः —अंक ४।५

(८) उग्गलिअदब्भकवला मिआ
परिच्चत्तनत्तणा मोरा ।
ओसरिअ पाण्डुपत्ता मुअन्ति
अस्सू विअ लदाओ ॥ —अंक ४।११

(९) लेखाच्या सुरुवातीचा पहिला उतारा पहा.

"अग, त्या वनज्योत्स्नेचा सहकाराशीं समागम झाला ना, तसाच आपल्यालाहि अनुरूप पति मिळावा, असें शकुंतलेला वाटतें. दुसरें काय?" प्रियंवदेने उत्तर दिलें.

"चल, तुलाच तसं वाटत असेल." शकुंतला म्हणाली[१०]

आणि, काय योगायोग! शकुंतलेचा तो अनुरूप पति जवळच झाडाआड उभा होता व हें सर्व पाहात–ऐकत होता! आणि त्याच मोसमांत त्यांचाहि लौकरच समागम झाला!

× ❀ ×

कण्व बाबांची दोघींबद्दलचीहि काळजी दूर झाली. शकुंतला पतिगृहीं जाण्यास निघाली. पर्णकुटींतून बाहेर पडल्यानंतर ती आपल्या वनवासबंधूंचा निरोप घेऊं लागली. कण्व बाबा आणि मैत्रिणी तिला कांहीं अंतरापर्यंत पोंचवावयास निघाल्या. जातां जातां तिला आठवण झाली.

"बाबा, लताभगिनी वनज्योत्स्नेचा निरोप घेऊन मी येतें."

"बाळे, तुझा तिच्यावर खरोखरच सोदर्य स्नेह आहे! ही पाहा, तुझ्या उजव्या हातालाच वनज्योत्स्ना आहे."

शकुंतला वनज्योत्स्नेजवळ जाऊन म्हणाली, "वनज्योत्स्ने, तूं सहकाराशीं संगत झालेली असलीस, तरीहि या इकडल्या शाखांनीं मला आलिंगन दे. यापुढे मी तुझ्या पासून दूर जाणार आहे!"

कण्व जवळच होते. ते म्हणतात, "बाळे, तूं खरोखरच भाग्यवान्! तुझ्याकरिता मी मनांत योजून ठेवलेल्या पतीकडे तूं चालली आहेस, तशीच ही नवमालिकाहि आम्रवृक्षाशीं संश्रित झाली आहे. आता तुझ्या आणि हिच्या बाबतींत मी अगदी निष्काळजी झालों!"[११]

× ❀ ×

शकुंतला आणि वनज्योत्स्ना! योगायोगाने दोघीहि कण्वाश्रमांत आल्या. दोघीहि बरोबरच वाढल्या. दोघीहि यौवनांत आल्या आणि दोघीहि अनुरूप पतींशीं संगत झाल्या. दोघींच्याहि बद्दल कण्वांना चिंता राहिली नाही.

या पुढील त्यांचें जीवन? ... "भाग्यायत्तमत: परं न खलु तद्वाच्यं वधूबन्धुभि:"[१२]

शकुंतला आणि वनज्योत्स्ना यांच्यांत तादात्म्य आहे. "वनज्योत्स्नेला विसरलें, तर मी स्वतःलाच विसरेन ना!"— अशी कबूली खुद्द शकुंतलाच देते. दोघीहि एकमकींच्या प्रतिमाच आहेत की काय, असें वाटतें. दोघींचीहि एकच कहाणी!

म्हणूनच, वनज्योत्स्नेसंबंधीं शाकुंतलांतील वाक्यें वाचलीं, म्हणजे शकुंतलेची मूर्ति डोळ्यासमोर उभी राहते आणि शकुंतलेसंबंधीं बोलायला लागलें म्हणजे वनज्योत्स्नेची आठवण होते.

× ❀ ×

शकुंतला आणि वनज्योत्स्ना यांच्यांतील नैसर्गिक साधर्म्य तिच्या सहवासांत असणाऱ्या सर्वांनाच दिसतें. कण्वांच्या तर त्या दोन मुलीच; तेव्हा त्यांना त्या सारख्याच दिसाव्यात, यांत मोठेसें नवल नाहीं. पण शकुंतलेच्या ठिकाणीं असणारे लताधर्म तिच्या मैत्रिणींच्याहि नजरेंतून सुटत नाहीत. उदाहरणार्थ, पुढील प्रसंग पाहा—

(१) मैत्रिणी झाडांना पाणी घालीत असतां अनसूया सहज बोलून जाते, "गडे शकुंतले, तुझ्या पेक्षाहि या आश्रमवृक्षांवर बाबांचें अधिक प्रेम असलें पाहिजे; म्हणूनच नवमालिकेच्या फुलासारखी नाजूक तूं आणि त्यांनी तुला हें झाडांना पाणी घालण्याचें काम दिलें."[१३]

---

(१०) प्रियंवदा— (सस्मितम्) अनसूये, जानासि किं निमित्तं शकुन्तला वनज्योत्स्नाप्रतिमात्रं पश्यति इति।

अनसूया–न खलु विभावयामि। कथय।

प्रियंवदा–यथा वनज्योत्स्ना अनुरूपेण पादपेन सङ्गता, अपिनाम अहमपि एवं आत्मनोऽनुरूपं वरं लभेय इति।

शकुन्तला–एष नूनं तव आत्मगतो मनोरथः।

११ या लेखाच्या सुरुवातीचा दुसरा उतारा पाहा.

१२ शाकुन्तल, अंक ४।१६

१३ अनसूया–हला शकुन्तले, त्वत्तोऽपि तातकाश्यपस्य आश्रमवृक्षकः प्रियतरा इति तर्कयामि। यनें नवमालिकाकुसुमपेलवा त्वमपि एतेषामालवालपूरणे नियुक्ता। (अंक १ ला)

(२) झाडांना पाणी घालतांना शकुंतलेने वर पाहिलें. केसर वृक्ष तिला आपल्या पल्लवांगुलींनी बोलावीत होता. ती त्या वृक्षाजवळ गेली. प्रियंवदा म्हणते, " शकुंतले, तूं तेथेच उभी राहा. तेथे तूं उभी असतांना असें वाटतें की, केसर वृक्षाचें लतेशींच मीलन झालें आहे." [१४] आणि वृक्षाआडून हें बोलणें ऐकणारा दुष्यंत म्हणतो—

" प्रियमपि तथ्यमाह प्रियंवदा—

अधरः किसलयरागः। कोमल विटपानु कारिणौ बाहू।

कुसुममिव लोभनीयं, यौवनमङ्गेषु सन्नद्धम्॥

(अंक १।२१)

समजा, खरोखरच दुष्यंत त्या वृक्षामागे उभा असता, (नसेलच असें कोणी सांगावें!) तर प्रियंवदेचें म्हणणे यथार्थच झालें नसतें काय ?

(३) शकुंतलेचें दुष्यंतावर प्रेम बसल्याचें जेव्हा मैत्रिणींना कळते, तेव्हा प्रियंवदेच्या तोंडून उद्गार निघतात, " सागराला सोडून महानदी कोठे जाईल? किंवा, पल्लवित अतिमुक्त लतेला [१५] सहाकाराशिवाय कोण आधार होऊं शकेल!" [१६]

(४) दुर्वास मुनीने शकुंतलेला दिलेला शाप मैत्रिणी ऐकतात आणि व्याकुल अंतःकरणाने पर्णकुटीकडे परततात. दुरूनच त्यांना पर्णकुटीच्या दाराशीं बसलेली शकुंतला दिसते. त्याबरोबर प्रियंवदा म्हणते, " अनसूये पाहा बरं, डाव्या हातावर गाल टेवून शकुंतला कशी बसली आहे ती! जणूं कांही चित्रच! पतीच्या विचारामुळे तिला स्वतःचीच जाणीव नाही; तर मग आल्या गेल्याची कोठून ? "

अनसूया त्यावर म्हणाली, " सखि, हा शापवृत्तांत आपल्याशींच राहूं दे. ती अगोदरच कोमल मनाची; तिला आपण सांभाळलें पाहिजे."

" अग, नवमालिकेला कोणी ऊन पाणी घालील काय ? " प्रियंवदा उद्गारली. [१७]

शकुंतला व नवमालिका यांच्यांत मैत्रिणींना कोणतें साधर्म्य आढळलें ? शकुंतला आणि नवमालिका सुकुमार आहेत; दोघीहि यौवनवती आहेत; दोघीहि इतक्या रूपवती आहेत की, नवमालिकेला सहकारासारखा उत्तम वृक्ष, तर शकुंतलेला दुष्यंतासारखा राजाच अनुरूप शोभती आहे; आणि शकुंतला हळुवार मनाची तर नवमालिका ऊन पाण्याच्या स्पर्शाने किंवा गरम झळीने [१८] सुद्धा सुकणारी आहे. ह्या सर्व गोष्टी मैत्रिणींना दिसतात, कारण त्या नित्य दोघींच्याहि सहवासांत आहेत.

प्रथम हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे की, ही नवमालिका वनलता आहे, उद्यानलता नाही. उद्यानांतील लता या सुंदर असतात, नाही असें नाही. पण त्यांत मालाकाराचाहि हात असतो आणि म्हणून कांही अंशीं कृत्रिमता असतेच. उलट वनांत वाढलेली नवमालिका पाहा. नैसर्गिकपणे वाढणारी ती लता जवळच्या सहकार वृक्षाला वेष्टत वेष्टत जेव्हा त्याच्या फांद्यांशीं खेळ खेळते, तेव्हा कुसुमांनी बहरलेल्या ह्या वनलतेचें यौवन व सौंदर्य हें अवर्णनीयच असतें. शकुंतला आणि नवमालिका यांचें सौंदर्य नैसर्गिक आहे; कृत्रिम नाही. त्यांच्यांत सौंदर्याचा स्वयंविकास आहे. चित्रकाराची कुंचली फिरत असतां आपोआप सुंदर चित्र निर्माण व्हावें, (त्यांत तरी थोडाबहुत चित्रकाराचा हात असतोच,) किंवा त्याहीपेक्षां म्हणजे इकडे सूर्यकिरण प्रकट होतांच आपोआप अरविंद विकसित व्हावें, त्याप्रमाणे यौवनाच्या उद्गमाबरोबरच शकुंतलेचें रूप अभिव्यक्त झालें आहे. [१९]

---

१४ प्रियंवदा—यावत् त्वयोपगतया लतासनाथ इवायं केसर वृक्षकः प्रतिभाति। (अंक १ ला)

१५ अतिमुक्त, नवमालिका आणि माधवी हीं एकाच वेलीचीं नांवें आहेत. ही वेल म्हणजे 'जुई.'

१६ सागरम् उज्झित्वा कुत्र वा महानदी अवतरति। क इदानीं सहकारमन्तरेण अति मुक्तलतां पल्लवितां सहते। (अंक ३)

१७ को नाम उष्णोदकेन नवमालिकां सिञ्चति।(अंक ४ था)

१८ पुढें टीप नं. पाहा.

१९ विर्मिभितं तूलिकयैव चित्रं,
सूर्यांशुभिर्भिन्न मिवारविंदम्।
बभूव तस्याश्चतुरस्रशोभि वपुर्विभक्तं
नवयौवनेन॥ कुमार १।३२

पण शकुंतलेच्या सौंदर्याचा आणि यौवनाचा खरा रसिक दुष्यंतच.[२०] त्याने चटकन् म्हणून टाकलें, "वेलीच्या डहाळी-डहाळीवर जितक्या सहजपणें मोहक फूल दिसावें, तितक्या सहजपणें शकुंतलेच्या अंगा-अंगांत "लोभनीय यौवन" भरलें आहे."[२१]

शकुंतलेचा आणि नवमालिकेचा नाजुकपणाहि सारखाच. थोड्याशा वाऱ्यामुळे ती लता त्रस्त होते, पानें गळायला लागतात आणि फुलें पटापट बंधनांतून सुटूं लागतात. शकुंतला "नवमालिकाकुसुमपेलव" आहे, असें अनसूया म्हणते, यांत मुळीच अतिशयोक्ति नाही. थोड्याशा झाडांना पाणी घातलें न घातलें, तोंच शकुंतलेचे बाहू गळून आले; हातांचे तळवे लाल झाले; ऊर श्वासाने भरून आला; मुखावर धर्मबिंदूंचें जाळें पसरलें; आणि वेणी मोकळी सुटून केस अस्ताव्यस्त पसरले.[२२]

शकुंतलेच्या मनाचा हळुवारपणा तर मैत्रिणींना ठिकठिकाणीं प्रतीत होत होता. मैत्रिणींना त्रास होईल या भीतीने ती आपलें प्रेम चोरून ठेवते.[२३] तर मैत्रिणींची संमति मिळाल्यावर सुद्धा दुष्यंताशीं गांधर्व विवाह करावा की नाही, हें ठरवण्यासहि ती मैत्रिणींकडेच जाते.[२४] आश्रमांतून बाहेर पडतांना देखील तिला किती कष्ट होतात! आपल्या मागे इतरांची काय स्थिती होईल, याचीच तिला चिंता वाटते. "बाबा, ही गर्भमंथर हरिणी प्रसूत झाली, म्हणजे मला कळवा, बरं!"[२५] "हें मृगबालका, आतापर्यंत मीं तुला वाढवलें, पण यापुढे हे बाबाच तुझी काळजी घेतील!"[२६] "सख्यांनो, या वनज्योत्स्नेला सांभाळा, बरं!"[२७] "बाबा, तुमचें शरीर तपाने अगोदरच क्षीण झालें आहे। माझ्या काळजीने त्याला अधिक कष्ट देऊं नका बरं!"[२८] "बाबा, अनसूया आणि प्रियंवदा येथूनच परततात का हो?"[२९]— अशा एक ना अनेक गोष्टी तिच्या मुखांतून बाहेर पडतात. "शकुंतले, राजाने कदाचित् तुला एकदम ओळखलें नाही, तर ही आंगठी दाखव, बरं का!"[३०]—असें मैत्रिणींनी सांगताच तिच्या हृदयाचा थरकाप होतो. बरें झालें, तिला शाप-वृत्तांत कळला नाही, नाहीतर ऊनपाण्याने नवमालिका करपून जाते, तशी शकुंतलाहि सुकून गेली असती!

हें कालिदासाने केलेलें पार्वतीचें वर्णन शकुंतलेलाहि लागूं पडतें.

२० कवि: करोति कवितां स्वादं जानाति पण्डित:।
सुंदर्या अपि सौंदर्यं पतिर्जानाति नो पिता ॥—
सुभाषित.

"क इदानीं सहकारमन्तरेण पल्लवितामतिमुक्तलतां सहते" हें प्रियंवदेचें वचन दुष्यन्ताचाच निर्देश करीत नाही काय!

२१ कुसुममिव लोभनीयं यौवनमङ्गेषु सन्नद्धम्॥ अंक १।२१

(२२) स्रस्तांसावतिमात्रलोहित तलौ बाहू घटोत्क्षेपणा—
दद्यापि स्तनवेपथुं जनयति श्वास: प्रमाणाधिक:।
बद्धं कर्णशिरीषरोधि वदने धर्माम्भसां जालकं
बन्धे स्रंसिनि चैक हस्तयमिता: पर्याकुला मूर्धजा: ॥ अंक १।३०

(२३) शकुंतला— "सखि, कस्य वान्यस्य कथयिष्यामि। आयासयित्री इदानीं वां भविष्यामि। अंक ३ रा.

(२४) शकुन्तला— मुञ्च तावन्माम्। भूयोऽपि सखीजनमनुमानयिष्ये। अंक ३

(२५) शकुन्तला—तात, एषा गर्भमंथरा मृगवधू: यदा अनघप्रसवा भवति तदा मह्यं कमपि प्रियनिवेदयितृकं विसर्जयिष्यथ। अंक ४ था.

(२६) शकुन्तला—इदानीं मया विरहितं त्वां तातश्चिन्तयिष्यति। अंक ४ था.

(२७) शकुन्तला—हला, एषा युवयोर्हस्ते निक्षेप:। अंक ४ था.

(२८) शकुन्तला—तपश्चरणपीडितं तात शरीरम्। तन्मा अतिमात्रं मम कृते उत्कण्ठितुम्। अंक ४ था.

(२९) शकुन्तला—तात, इत एव किं प्रियंवदामिश्रा: सख्यो निवर्तिष्यन्ते। अंक ४ था.

(३०) सख्यौ—सखि, यदिनाम स राजा प्रत्यभिज्ञा मन्थरो भवेत् तत: तस्य इदं आत्मनाम धेयाङ्कित मंगुलीयं दर्शय। अंक ४ था.

शकुंतलेंत आणि नवमालिकेंत आणखी एक साधर्म्य आहे, तें म्हणजे लावण्याचें. लावण्य म्हणजे अंगसौष्ठव, रूप किंवा अलंकृतता नव्हे; तर यांहून वेगळा, पण अंगाअंगांतून व्यक्त होणारा असा प्रतीतिगम्य गुण-विशेष आहे.[३१] लावण्य या अर्थीच आपण 'पाणी' हा शब्द वापरतो. मोत्यांमध्ये त्याचा रंग आणि आकार यांहून वेगळी, पण त्यांतून दिसणारी अशी जी एक तरल छटा असते, त्याप्रमाणेंच प्रत्यवयवांतून खेळणारें जें भासतें, तें लावण्य होय.[३२] आणि, ज्या प्रमाणें मोत्याचें पाणी रत्नपारख्यालाच समजतें, त्या प्रमाणेंच लावण्य हें सहृदय-लोचनांनाच प्रतीत होतें. शकुंतला व नवमालिका यांच्या ठिकाणीं हें लावण्य आहे. शकुंतला विरह-ज्वरानें दिवसेंदिवस सुकत चालली, तरीहि तिचें लावण्य कायम होतें.[३३] शकुंतलेला त्या अवस्थेंत पाहिल्यावरोवर दुष्यंताला ग्रीष्माच्या तापानें वाळलेल्या, तरीहि पण सुंदरच दिसणाऱ्या माधवी (नवमालिका) लतेचीच आठवण झाली.[३४]

शकुंतला आणि नवमालिका यांच्यांतील साधर्म्य मैत्रिणींना दिसतें यावद्दल फारसें नवल नाही. एक तर, त्या एकाच आश्रमांत राहात होत्या. शिवाय समान वयोरूपाच्या असल्यानें त्यांना एकमेकींची पूर्णपणें ओळख झाली होती. पण दुष्यंतासारख्या अनोळखी पुरुषाच्याहि नजरेंतून तें प्रथमदर्शनीसुद्धा सुटत नाही. दुष्यंतानें जेव्हा प्रथमच त्या मुलींना पाहिलें, तेव्हा पाहतांक्षणींच त्याच्या तोंडून उद्‌गार निघतात, "अन्त:पुरांतील सौंदर्याला मागें टाकणारें रूप जर आश्रमकन्यांकांत सापडतें, तर असेंच म्हटलें पाहिजे की, वनलतांनीं उद्यानलतांना मागें टाकलें!"[३५]

ज्यावेळीं ही कल्पना दुष्यंताच्या मनांत आली, तेव्हा त्याची आश्रम-कन्यकांशीं ओळख नव्हती. अगदी परक्या माणसाच्या तोंडून त्या मुलींना पाहिल्यावर सहज निघालेले ते उद्गार आहेत. पण दुष्यंताची शकुंतलेशीं ओळख झाल्यावर सुद्धा हें साधर्म्य त्याच्या मनांतून जात नाही. आश्रमांतून वापस गेल्यावर विदूषकाजवळ शकुंतलेसंबंधीं बोलतांना तो म्हणतो, "गळून पडलेलें नवमालिकेचें पुष्प रुईच्या झाडावर सापडावें, त्याप्रमाणें, ही शकुंतला त्या मुनीला सापडली"[३६]

राजाच्या मुखांतून निघालेले आणखी कांही साधर्म्य-व्यञ्जक उद्गार अगोदरच येऊन गेले आहेत.[३७]

शकुंतलेचें यौवन, कोमलता आणि लावण्य दुष्यंतालाहि प्रतीत होतें. पण त्याच्या आणि मैत्रिणींच्या सौंदर्यदृष्टींत फरक आहे. मैत्रिणींना तें सर्व कौतुकाचा आणि निरागस आनंदाचा विषय होतें. पण दुष्यंताला शकुंतलेचें यौवन "लोभनीय" वाटतें.[३८] दुष्यंत शकुंतलेचा प्रियकर आहे; आणि प्रियकर प्रेयसीकडे ज्या दृष्टीनें पाहतो तीच दृष्टि दुष्यंताची आहे. म्हणूनच शकुंतलेच्या मुखाभोंवतीं भुंगा घोटाळला

---

३१ लावण्यं हि नाम अवयव संस्थानाभिव्यङ्ग्यम् अवयवव्यतिरिक्तं धर्मान्तरमेव। नच अवयवानामेव निर्दोषता वा भूषण योगो वा लावण्यम्।

—अभिनवगुप्त-ध्वन्यालोक लोचन.

(३२) मुक्ताफलेषु छायायास्तरलत्वमिवान्तरा।
प्रतिभाति यदङ्गे तल्लावण्यमथोच्यते॥

(३३) प्रियंवदा—अनुदिनं परिहीयसे अङ्गै:।
केवलं लावण्यमायी छाया त्वां न मुञ्चति।
—अंक ३ रा.

(३४) शोच्या च प्रियदर्शनाच मदन
क्लिष्टेय मा लक्ष्यते
पत्राणामिव शोषणेन मरुता स्पृष्टा लता
माधवी। अंक ३।९

(३५) शुद्धान्त दुर्लभमिदं वपुराश्रमवासिनो
यदि जनस्य।
दूरीकृता खलु गुणैरुद्यानलता
वनलताभि:॥ अंक १।१७

(३६) सुरयुवतिसंभवं किल मुनेरपत्यं
तदुज्झिताधिगमम्।
अर्कस्योपरि शिथिलं च्युतमिव
नवमालिकाकुसुमम्॥ अंक २।८

(३७) मागील टीप २१ आणि ३४ पाहा.

(३८) मागील टीप २१ पाहा.

असतां, " हे भ्रमरा, तूं खरोखर भाग्यवान् आहेस, आम्ही मात्र नुसतेच खरें-खोटें पाहण्याच्या भानगडींत पडलों. "[३९] —असें तो बोलून जातो; किंवा " तिचें रूप म्हणजे अनाघ्रात पुष्प किंवा नखांनी न खुडलेलें किसलय आहे; या रूपाचा उपभोग घेण्यास विधात्याने कोणाची नेमणूक केली आहे, कोण जाणे ! "[४०]—असे स्वतःशीच तो उद्गार काढतो.

शकुंतला आणि नवमालिका यांच्यांतील साधर्म्य दुष्यंताला केवळ प्रेमाच्या पहिल्या भरांतच प्रतीत होतें असें नाही. शकुंतलाप्रत्यादेशानंतर सुद्धा राजाला शकुंतलेची स्मृति झाल्यावर तें त्याच्या मनांत आलेलें दिसतें. आपल्या धर्मपत्नीचा आपण निष्कारण त्याग केला आणि तिला मोठा अन्याय केला, ही टोचणी राजाला रात्रंदिवस खात असते. त्याला झोप सुद्धा येत नाही. अशा मनःस्थितींत तो आपल्या मनाला कदाचित् बरें वाटेल, म्हणून उद्यानांत येतो व तेथे आल्यावर आपल्याबरोबरच असलेल्या विदूषकाला म्हणतो, " मित्रा, माझ्या प्रियेचें किंचित् अनुकरण करणाऱ्या लतांवर दृष्टि फिरवूनच आता समाधान मानणें भाग आहे. "[४१] तो जातो कोठे ?—तर माधवीलतामंडपांत !

उद्यानलतांना मागे टाकणाऱ्या वनज्योत्स्नेशीं शकुंतलेचें पूर्णच सादृश्य होतें. पण उद्यानांतील माधवीलतेशींहि तिचें किंचित्सें सादृश्य होतेंच. शकुंतलेला बाहेर घालवून दिल्यावर आणि वनज्योत्स्नेला विसरल्यावर उद्यानांतील माधवीकडे पाहून समाधान मानल्याशिवाय दुसरा कोणता मार्ग उरणार ?

उद्यानांतील माधवींत राजाला असा कोणता गुण दिसला की, ज्यामुळे राजाला ती प्रियानुकारिणी वाटावी ? कालिदासाने तो गुण आपणास सांगितला नाही. पण आपणास तो शोधून काढतां येईल.

कालिदासाचे बहुतेक नायक विरहावस्थेमध्यें असतांना लतेकडे पाहतात व लतांच्या ठिकाणीं त्यांना कांही गुण दिसतात.

(१) इंदुमतीबद्दल शोक करतांना अज म्हणतो– " कोकिळांच्या ठिकाणीं मधुर भाषण, राजहंसींच्या ठिकाणीं मदालस गति, हरिणींच्या ठिकाणीं चंचल वीक्षित आणि वाऱ्याने हालणाऱ्या लतांच्या ठिकाणीं विभ्रम—हे सर्व गुण, हे प्रिये, तूं स्वर्गाला जाण्यास उत्सुक झाली असतांनासुद्धा माझ्याकडे पाहून तूं मागे ठेवलेस; पण तुझ्या विरहाने अत्यंत व्यथित झालेल्या माझ्या अंतःकरणाचें समाधान करण्यास ते समर्थ नाहीत. "[४२]

(२) यक्ष आपल्या पत्नीला संदेश देतांना म्हणतो:— " लतांच्या ठिकाणीं तुझ्या अवयवांची हालचाल, भयचकित हरिणींच्या प्रेक्षणांच्या ठिकाणीं तुझा दृष्टिपात, चंद्राच्या ठिकाणीं तुझी मुखकांति, मयूरबर्हांच्या ठिकाणीं तुझा केशकलाप आणि नदीच्या चंचल लहरींच्या ठिकाणीं तुझे भ्रूविलास—अशी तुझ्या गुणांची मी कल्पना

---

(३९) ही पूर्ण कविता अशी—

चलापाङ्गां दृष्टिं स्पृशसि बहुशो वेपथुमतीं
रहस्याख्यायीव स्वनसि मृदु कर्णान्तिकचरः।
करं व्याधुन्वन्त्याः पिबसि रतिसर्वस्वमधरं
वयं तत्त्वान्वेषान्मधुकर हतास्त्वं खलु कृती ॥
अंक १-२४

(४०) अनाघ्रातं पुष्पं, किसलयमलूनं कररुहै-
-रनाविद्धं रत्नं, मधु
नवमनास्वादितरसम्।
अखण्डं पुण्यानां फलमिव च तद्रूपमनघं
न जाने भोक्तारं कमिह समुपस्थास्यति
विधिः ॥ अंक २।१०

(४१) राजा—सखे, कोपविष्टः प्रियायाः किंचिदनुकारिणीषु लतासु दृष्टिं विलोभयामि।
विदूषकः—ननु आसन्न परिचारिका चतुरिका भवता संदिष्टा। माधवीमण्डप इमां वेलामति वाहयिष्ये। शाकुं. अंक ६

(४२) कलमन्यभृतासु भाषितं कलहंसीषु
मदालसं गतम्।
पृषतीषु विलोलमीक्षितं पवनाधूतलतासु
विभ्रमाः ॥
त्रिदिवोत्सुकयाप्यवेक्ष्य मां निहिताः
सत्यममी गुणास्त्वया।
विरहे तव मे गुरुव्यथं हृदयं न त्ववलंबितुं
क्षमाः ॥ रघुवंश सर्ग ८

करतों; पण कोणत्याहि एके ठिकाणीं तुझें सादृश्य नाही. "[४३]

(३) उर्वशीच्या विरहानें वेडा झालेला पुरुरवा वनांतून हिंडत असतांना त्याला एक लता दिसते. तिला पाहतांच तो उद्गारतो— "अरे, पुष्पविरहित अशा या लतेला पाहून सुद्धा माझ्या मनांत प्रेम का उत्पन्न होत आहे? किंवा, तेंहि ठीकच आहे—कारण ही नाजूक लता सुद्धा तिचे पल्लव मेघोदकानें आर्द्र झाल्यामुळे अश्रूंनीं अधर धुतल्याप्रमाणे दिसते; पुष्पोद्गम थांबल्यामुळे विरह-कालीं आभरणशून्य झाल्याप्रमाणें वाटतें; भ्रमरांचा गुंजारव ऐकूं येत नसल्यानें दुःखानें मौन धारण केल्याप्रमाणें वाटतें; चरणाशीं लीन झालेल्या मला अव्हेरून नंतर जिला अनुताप झाला आहे अशा माझ्या प्रियेप्रमाणें ही लता दिसत आहे. माझ्या प्रियेचें अनुकरण करणाऱ्या या लतेला आलिंगन द्यावेंसें वाटतें.[४४]

विरहावस्थेंत असणाऱ्या या नायकांचे हे उद्गार वाचल्यावर हें स्पष्ट दिसतें कीं, कालिदासाच्या नायकांना लतांमध्ये आपल्या प्रियेचे "विभ्रम" किंवा अवयवांची मोहक हालचाल दिसते. दुष्यंत माधवी मंडपांत बसला असतांना त्याला शकुंतलेचे विभ्रम नवमालिकेच्या ठिकाणीं दिसत असले पाहिजेत.

पार्वती शंकराचें प्रेम संपादन करण्याकरिता तपश्चर्या करण्यास गेली, तेव्हा त्यावेळीं तिला उपयोगी नसलेल्या पण पुढे ज्यांचें काम पडेल अशा दोन वस्तु तिनें दोघींजवळ ठेव म्हणून ठेवल्या. एक म्हणजे नाजूक लतांच्या ठिकाणीं आपलें विलास चेष्टित आणि दुसरी म्हणजे हरिणींच्या ठिकाणीं विलोल दृष्टि.[४५] ही गोष्ट लक्ष्यांत घेतली म्हणजे वरील विधानाबद्दल शंका राहात नाहीं.

दुष्यंत आणि शकुंतला यांचीं रहस्यांतलीं रहस्यें नवमालिकेच्या मंडपांत घडलेलीं आहेत. एके दिवशीं माधवीलतामंडपांतच तीं दोघें बसलीं होतीं. जवळच एक मृग-बालक होतें. दुष्यंतानें कमलपत्राच्या एका द्रोणांत पाणी घेऊन मृगबालकाला तें प्यावयास दिलें. पण तें पाणी पिईना. नंतर शकुंतलेनें तो द्रोण घेतला; आणि काय आश्चर्य! हरिण चटकन् पाणी प्यालें. तेव्हा दुष्यंत हसून म्हणाला, "बरोबरच आहे. कोणीहि सजातीयावरच विश्वास ठेवील. दोघेहि आरण्यकच ना!"[४६]

दुष्यंताच्या दरबारांत स्वतःची ओळख करून देण्याचा शकुंतलेवरच जेव्हा प्रसंग आला, तेव्हा तिनें प्रथम आंगठी दाखविण्याचा विचार केला. परंतु आंगठी जेव्हा दिसेना, तेव्हा तिनें वरील प्रसंगाची आठवण करून दिली. दुष्यंताची

---

(४३) श्यामास्वङ्गं चकित हरिणीप्रेक्षणे दृष्टिपातं
वक्त्रच्छायां शशिनि शिखिनां बर्हभारेषु केशान्।
उत्पश्यामि प्रतनुषु नदीवीचिषु भ्रूविलासान्
हन्तैकस्मिन् क्वचिदपि न ते चण्डि सादृश्यमस्ति ॥ उत्तरमेघ.

(४४) राजा—अये, किंतु खलु कुसुमरहितामपि लताप्रियां पश्यता मया रतिः उपलभ्यते। अथवा स्थाने मम मनो रमते। इयं हि—

तन्वी मेघजलार्द्रपल्लवतया धौताधरेवाश्रुभिः
शून्येवाभरणैः स्वकालविरहाद्विश्रांत पुष्पोद्गमा
चिंतामौनमिवास्थिता मधुलिहां शब्दैर्विना लक्ष्यते
चण्डी मामवधूय पादपतितं जातानुतापेव सा ॥
यावदस्यां प्रियानुकारिण्यां लतायां परिष्वंग प्रणयी भवामि।—विक्रमोर्वशीय अंक ४।६६

(४५) पुनर्ग्रहीतुं नियमस्थया तया द्वयेऽपि निक्षेप इवार्पितं द्वयम्।
लतासु तन्वीषु विलासचेष्टितं विलोलदृष्टं हरिणाङ्गनासु च ॥—कुमार, सर्ग ५।१३

(४६) शकुन्तला—ननु एकस्मिन् दिवसे नवमालिका मण्डपे नलिनीपत्र भाजनगत मुदकं तव हस्ते सन्निहित मासीत्। तत्क्षणे स मे पुत्रकृतको दीर्घापाङ्गो नाम मृगपोतकः उपस्थितः। त्वयायं तावत् प्रथमं पिबतु इति अनुकम्पिना उपच्छन्दितः उदकेन। न पुनस्ते अपरिचयात् हस्ताभ्याशं उपगतः। पश्चात् तस्मिन्नेव मया गृहिते अनेन कृतः प्रणयः। तदा त्वमित्थं प्रहसितोऽसि। सर्वः सगन्धेषु विश्वसिति। द्वावप्यत्र आरण्यकौ इति ॥
शाकुन्तल अंक ५ वा.

स्मृति दुर्वास-शापामुळे नष्ट झाली होती आणि, त्यामुळे वरील आठवणीचा कांही उपयोग झाला नाही, ही गोष्ट वेगळी. पण प्रेमिकांचे रहो-विलास हे त्यांना अत्यंत महत्त्वाचे असतात, ही गोष्ट यावरून स्पष्ट होते. आणि, शकुंतलेच्या आयुष्यांतील असे प्रसंग नवमालिकेच्या मंडपांत घडून आले ही गोष्ट लक्षांत घेतली असतां शकुंतला आणि नवमालिका यांचा किती निकट संबंध आहे, हें स्पष्ट दिसतें. अनसूया आणि प्रियंवदा ह्या शकुंतलेच्या प्रिय मैत्रिणी खऱ्या. पण त्यांनाहि ज्या गोष्टी माहीत नव्हत्या, त्या नवमालिकेला माहीत होत्या.[४७]

दुष्यंताच्या दृष्टीला शकुंतला आणि वनज्योत्स्ना यांच्यांतलि केवळ सादृष्यच दिसतें, असें नाही, तर त्याला त्यांच्यांत तादात्म्यहि दिसतें. लतेच्या ठिकाणीं त्याला शकुंतलेचे विभ्रम दिसतात, हें मागे सांगितलेंच आहे. लतेच्या जागीं त्याला शकुंतला दिसते, हें पुढील गोष्टीवरून दिसून येईल.

राजाने शकुंतलेला घालवून दिल्यानंतर कांहीं दिवसांनी जेव्हा त्याला पुनःस्मृति झाली, तेव्हा त्याने मनोविनोदाकरिता शकुंतलेचें चित्र काढलें. त्या चित्राकडे आपण पाहूं. शकुंतलेची ज्या अवस्थेंतील मूर्ति त्याच्या मनांत ठसली असेल, तीच त्या चित्रांत उतरली असेल. या दृष्टीने चित्राकडे पाहिल्यास आपणास काय दिसतें ?

राजाने त्या चित्रांत तीन मुली काढल्या आहेत. त्यांपैकी श्रमाने अत्यंत थकलेली अशी एक मुलगी सहकार वृक्षाशेजारीं उभी केली आहे. तीच शकुंतला.[४८] राजाला आश्रमांतील सर्व देखावा जसाच्या तसाच दिसतो. त्याच पाणी घालणाऱ्या मुली आणि तेच लतावृक्ष दिसतात. तोच सहकार वृक्ष दिसतो. मग त्या सहकाराला वेढून उभी असलेली वनज्योत्स्ना त्याला दिसली नसेल काय ? जरूर दिसली असेल. पण राजाला त्या वनज्योत्स्नेच्या ठिकाणीं ही चालती-बोलती वनज्योत्स्ना दिसली. शकुंतला आणि वनज्योत्स्ना यांच्या एकरूपतेचा याहून वेगळा असा कोणता पुरावा हवा ?

जलवाहनाने श्रांत झालेल्या शकुंतलेचें हें वर्णन वनज्योत्स्तेच्या बाबतींत तिच्या उपभोगोत्तर अवस्थेला सूचित करीत नाही काय ? पहिल्या अंकांतील वनज्योत्स्नेचें वर्णन हें उपभोगपूर्व अवस्थेचें आहे, हेंहि लक्ष्यांत घेतलें पाहिजे.

सारांश, शकुंतला आणि वनज्योत्स्ना यांच्यामधील तादात्म्य कण्व, मैत्रिणी आणि दुष्यंत या सर्वांनाच प्रतीत होतें. दोघींकडे पाहण्याची त्यांची दृष्टि आपापल्यापरी भिन्न असली, तरी दृश्य विषयाच्या दृष्टीने एकाच तऱ्हेची आहे. म्हणजे, त्यांना आपापल्यापरी शकुंतला जशी दिसते, तशीच वनज्योत्स्ना दिसते. कण्वांना दोघीहि मुलीच वाटतात. दोघीहि बाहेरून आलेल्या आणि पाळलेल्या, दुष्यंत हा शकुंतलेकरता कण्वाने मनांत योजिलेला वर; तर वनज्योत्स्ना सहकार वृक्षाजवळच वाढवलेली. दोघीहि अनुरूप पतींशीं संगत होतात आणि कण्व वीतचिंत

---

(४७) प्रेमिकाला ओळख पटवितांना एखादी आंगठी वगैरेसारखी बाह्य खूण आणि रहस्यमय प्रसंगाची एखादी अंतरींची खूण यांचा उपयोग वाङ्मयांतून केलेला सापडतो. रामायणांतहि असा प्रसंग आहे. सीतेचा शोध घेऊन मारुति जेव्हा परत निघाला, तेव्हा आपली खूण म्हणून सीतेने त्याच्या करवीं आपल्या वेणींतील एक मणि पाठविला; आणि, त्या बरोबरच चित्रकूट पर्वतांतील एका निवांत गुहेंत रामाच्या वक्षःस्थलावर डोकें ठेवून ती झोपली असतांना रामाने तिला मनःशिलेचा तिलक लावला होता त्या प्रसंगाची आठवण करून द्यावयास सांगितली. हा प्रसंग फक्त राम व सीता यांनाच माहीत होता. आणि, म्हणून नक्की ओळख पटविणारी अशी ती खूण होती. पहा—वाल्मीकि रामायण, सुंदरकांड सर्ग—६५।२३ (निर्णयसागर प्रत)

(४८) विदूषकः—तर्कयामि या एषा शिथिलकेशबन्धनोद्वान्त कुसुमेन केशान्तेन, उद्भिन्न स्वेदबिन्दुना वदनेन, विशेषतोऽपसृताभ्यां बाहुभ्याम्, अवसेकस्निग्धतरुणपल्लवस्य चूतपादपस्य पार्श्वे, ईषत् परिश्रान्तेव आलिखिता सा शकुन्तला। इतरे सख्यौ इति। — शाकुंतल अंक ६

अनुक्रमणिका

झालेला दिसतो. मैत्रिणींना दोघांचेंहि यौवन, सौंदर्य आणि अंतर्बाह्य कोमलता प्रतीत होते. प्रियंवदेला केसर वृक्षांच्या बाजूला उभी असलेली शकुंतला लतेसारखी दिसते, आणि वनज्योत्स्ना सहकाराशीं संगत झालेली पाहतांच शकुंतलेच्या विवाहाची कल्पना येते. राजाला तर लतेच्या ठिकाणीं शकुंतला आणि शकुंतलेच्या ठिकाणीं लता अशीच प्रतीति येते. त्यांच्यामधील रहस्येंहि एक तर त्याला, शकुंतलेला किंवा नवमालिकेलाच माहीत असतात.

+ + +

शकुंतला आणि वनज्योत्स्ना यांची परिणयपूर्व कहाणी एकच आहे, पण त्यानंतरची वनज्योत्स्नेची हकीगत आपणास कळत नाही. "वनज्योत्स्ने, मी आजपासून तुला सोडून चालल्यें ग!" — असें म्हणून शकुंतला आपल्या लताभगिनीचा निरोप घेते; त्यानंतर त्यांची फिरून भेट होत नाही. शकुंतलेचा प्रत्यादेश, दुष्यंताचा पश्चात्ताप आणि अखेर त्यांचें पुनर्मीलन ही हकीगत कालिदास आपणास सांगतो. पण वनज्योत्स्नेबद्दल तो कांहींच बोलत नाही.

राजाने शकुंतलेला बाहेर घालवून दिल्यावर कण्व-शिष्य आणि गौतमी कण्वाश्रमांत वापस गेले. त्यांनी दरबारांत घडलेली सर्व हकीकत महर्षि कण्वांना सांगितली असेल. ती हकीगत ऐकून मैत्रिणींना अत्यंत दुःख झालें असेल. शेवटीं मारीच शिष्याच्या तोंडून त्यांना पुनर्मीलनाची बातमी कळतांच त्यांना आनंद झाला असेल. आणि मध्यंतरीच्या काळांत त्यांचे दिवस अत्यंत कष्टाचे गेले असतील.

आश्रमांतील लतावृक्ष आणि पशुपक्षी यांचीहि अशीच स्थिति झाली असेल काय?

—शक्य आहे; कारण शकुंतला पतिगृहीं जाण्यास आश्रमांतून बाहेर पडली, तेव्हा त्यांना दुःख झालेंच होतें.[49]

कालिदासाच्या दृष्टीने निसर्ग जिवंत आहे, एवढेंच नव्हे, तर त्याला मानवांसारखेंच संवेदनक्षम हृदयहि आहे. रतीच्या बरोबर वनभूमिसुद्धा दुःखित झाली;[50] रतीचा शोक ऐकून पशुपक्षी व वृक्ष कष्टी झाले;[51] आणि अजाचा विलाप ऐकून वृक्षांनीसुद्धा अश्रू गाळले.[52]

तेव्हा आपल्या प्रिय भगिनींचें दुःख ऐकून वनज्योत्स्नेला शोक झाला नसेल काय? शोकामुळे तिचीं पानें फुलें गळालीं नसतील काय? दुःखामुळे तिची वाढ खुंटली नसेल काय? आणि अखेर जेव्हा शकुंतलेचें दुष्यंताशीं पुनर्मीलन झालें तेव्हा इतरांप्रमाणेंच वनज्योत्स्नाहि आनंदाने फुलून गेली नसेल काय? खात्रीने तसें झालें असलें पाहिजे. मग कालिदासाने तें सांगितलें कां नाही?

तेंहि सांगितलें आहे. कसें तें आपण पाहूं.

एके दिवशी धर्मासनावरून उठून[53] विश्रांति घेण्याकरिता दुष्यंत अंतर्गृहांत विदूषकासह बसला असतां त्याच्या कानावर पुढील अर्थाचें गीत पडलें.

"हे भ्रमरा, नवीन मधाची चव घेणारा तूं पण त्याप्रकारे आम्रमंजरीचा आस्वाद घेतल्यावर, आता तिला तूं विसरलास आणि केवळ

---

(४९) मागील टीप नं. ८ पहा.

(५०) अथ सा पुनरेव विह्वला वसुधालिंगन धूसरस्तनी। विललाप विकीर्णमूर्धजा समदुःखामिव कुर्वती स्थलीम्॥ कुमार सर्ग ४।

(५१) नृत्यं मयूराः कुसुमानि वृक्षाः दर्भानुपात्तान विजहुर्हरिण्यः। तस्याः प्रपन्ने समदुःखभावमत्यन्तमासीद्रुदितं वनेऽपि॥ रघु. १४।६९

(५२) विलपन्निति कोसलाधिपः करुणार्थं ग्रथितं प्रियां प्रति। अकरोत् पृथिवीरुहानपि स्त्रुतशाखारस बाष्प दूषितान्॥ रघु. ८।७०

(५३) राजा धर्मासनावरून उठून विश्रांतिकरितां आला होता, याचा पुरावा असा—कण्वाश्रमांतून शिष्य आल्याचें सांगण्याकरितां कंचुकी तेथेच येतो आणि येतांना स्वतःशींच म्हणतो—"तथापि इदानीमेव धर्मासनादुत्थिताय पुनरुपरोधकारि कण्वशिष्यागमनमस्मै नोत्सहे निवेदयितुम्।—अंक ५

कमलांत वसति करूनच समाधान पावलास हें कसें ! ” ५४

हंसपदिकेने हें गीत गायिलें होतें. हीच हंसपदिका पूर्वी एकदा दुष्यन्ताचा प्रेमविषय झाली होती. पण आता तो तिला विसरला होता. या गीतांतून तिने आपल्याला खासा टोमणा मारला याचे त्याला मोठें कौतुक वाटलें; आणि, आपली ती पसंती तिला कळवावी, म्हणून विदूषकाला त्याने तिच्याकडे पाठविली. जातांना विदूषक म्हणतो—“ जशी तुझी आज्ञा. पण मी तेथे गेल्यावर ती दुसऱ्या स्त्रियांकडून माझी शेंडी धरावयास लावून मला ताडन कराल आणि ज्याप्रमाणें एखाद्या वीतराग तपस्व्याला अप्सरेने घेरलें असता त्याला मोक्ष मिळत नाही, तसाच मलाहि मोक्ष (मुक्तता) मिळणार नाही. ” ५५

विदूषक गेल्यानंतर राजा एकटाच राहिला. आणि आपल्याशींच म्हणूं लागला,—“ किं नु खलु गीतार्थमाकर्ण्य इष्टजनविरहात् ऋते अपि बलवदुत्कण्ठितोऽस्मि । अथवा—

रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान्
पर्युत्सुकी भवति यत् सुखि तोऽपि जन्तु: ।
तच्चेतसा स्मरति नूनमबोधपूर्वं
भावस्थिराणि जननान्तरसौहृदानि ॥ अंक ५।२

(कोणत्याही इष्ट व्यक्तीशीं माझा वियोग झालेला नाहीं; तरी सुद्धां हें गीत ऐकतांच माझ्या मनाला अशी हुरहुर का बरें लागावी ? किंवा अत्यंत सुखांत असलेला प्राणी सुद्धां जेव्हां रम्य दृश्य पाहून किंवा मधुर शब्द ऐकून उत्कंठित होतो, तेव्हां वासनारूपानें स्थिर असलेल्या जन्मांतरींच्या सौहार्द संबंधाची त्याला मनांत आठवण होत असली पाहिजे; मात्र त्यांची ओळख पटत नसावी.)

हंसपदिकेनें गायिलेलें हें गीत ऐकून दुष्यंताला वस्तुतः शकुंतलेची आठवण व्हावयास पाहिजे होती. त्या गीताचा भावार्थ शकुंतलेच्या बाबतींत त्याला बराबर लागूं पडत होता. पण त्याला शकुंतलेची आठवण झाली नाही आणि त्याने त्या गीताचा अर्थ हंसपदिकेलाच अनुलक्षून लाविला त्यानंतर विदूषकाच्या बोलण्यांतहि अप्सरस, वीतराग इत्यादिक पदें आलीं. त्यावरूनहि शकुंतलेची आठवण त्याला सहजपणें व्हावयास पाहिजे होती. अशाच एका प्रसंगाशीं शकुंतलेच्या उत्पत्तीचा संबंध होता आणि त्या प्रसंगाची माहिती कण्वाश्रमांत, शकुंतलेच्या समोरच, राजाला अनसूयेनें दिली होती. ती विसरणें राजाला शक्य नव्हतें. असें असतांहि त्याला शकुंतलेची आठवण झाली नाहीं. आणि म्हणूनच कोणत्याहि इष्ट व्यक्तीशीं माझा वियोग झाला नाहीं, अशी त्याची पक्की भावना झाली. दुर्वासाचा शाप आपला प्रभाव दाखवूं लागला.

दुर्वासाच्या शापामुळें शकुंतलेची आठवण राजाला झाली नसली, तरी तें गीत आपला परिणाम केल्याशिवाय थोडेच राहणार ? त्यानें राजाला उत्कंठित केलेंच. समजा, दुर्वासशापाची घटना घडून आली नसती आणि दुश्यंत हस्तिनापुरास आल्यावर राजकार्यांत गढून गेल्यामुळें शकुंतलेकरिता मूळ पाठविण्याचें विसरला असला आणि अशाच परिस्थितींत त्यानें हंसपदिकेचें गीत ऐकलें असतें, तर त्याला खात्रीनें शकुंतलेची आठवण होऊन तो उत्कंठित झाला असता. जें त्यावेळी झालें असतें, तेंच आताहि झालें. फरक एवढाच कीं, दूर्वासशापाच्या व्यवधानामुळें त्या इष्टव्यक्तीचा बोध त्याला झाला नाहीं, आणि म्हणूनच “ इष्टजन-विरहाशिवाय ” उत्कंठा—हा विरोध त्याच्या समोर उभा राहिला.

या मानसिक अवस्थेचें स्पष्टीकरण त्यानें पुढील प्रमाणें केलें. जेव्हा एखादे रम्य दृश्य पाहिल्यानें

---

(५४) अहिणव महू लोलुवो तुमं
तह परिचुम्बिअ चूअ मञ्जारिं ।
कमलवसइमेत्त णिव्वुदो
महुअर विम्हरिओ सि णं कहं ॥अंक५।१

(५५) विदूषक:-यद् भवानाज्ञापयाति ।(उत्थाय) भोवयस्य। गृहीतस्य तथा परकीयै: हस्तै: शिखण्डके ताडमानस्य अप्सरसा वीत रागस्य इव नास्ति इदानीं मे मोक्ष: ।—अंक ५ वा

किंवा मधुरगीत ऐकल्यानें कांही कारण नसतांना सुखी प्राण्याच्या चित्ताला सुध्दा हुरहुर लागते, तेव्हां त्या दृष्याच्या किंवा गीतांच्या निमित्तानें वासनारूपानें स्थिर झालेले त्याचे पूर्वजन्मांचे सौहार्द संबंध स्मरणाच्या कक्षेंत येत असले पाहिजेत. मात्र त्याची जाणीव होत नसावी व त्याचाच परिणाम ही अकारण अशी भासणारी चित्ताची हुरहुर असावी. ५६

यांतील कारणपरंपरा पुढील प्रमाणें आहे.

(१) पूर्वजन्मींचे कांहीं सौहार्द संबंध असतात.

(२) ते संबंध "भावस्थिर" म्हणजे वासनारूपाने जीवाशी संलग्न झालेले असतात.[५७]

(३) कोणत्या तरी दृष्याच्या किंवा श्रवणाच्या निमित्ताने चित्तांत त्यांचें स्मरण होतें. (४) तें स्मरण 'अबोधपूर्व' असतें, म्हणजे स्मृत विशेषांचे ज्ञान त्यांत नसते.[५८] अमुकच व्यक्ति किंवा अमुकच प्रसंग अशी जाणीव त्या स्मरणामुळें होत नाहीं. (५) त्यामुळें मन उत्कंठित होऊन मनाला आकुलता येते.[५९]

हें विवेचन सकृद्दर्शनीं अप्रस्तुत वाटण्याचा संभव आहे. पण तसें नाही. राजाच्या या मनःस्थितींतून आणि त्याने दिलेल्या कारणमीमांसेतूनच शकुंतला–प्रत्यादेशाकडे पाहिले पाहिजे. हें विवेचन लक्ष्यांत ठेवलें, तरच आपणाला नवमालिकेच्या—वनज्योत्स्नेच्या–पुढील हकीगतीचें बीज ओळखतां येतें.

दुर्वासाच्या शापाचे व्यवधान असल्यामुळे दुष्यंताचे कण्वाश्रमांतील जीवन आणि त्यानंतरचे हास्तिनापुरांतील जीवन यांचा कांहींच संबंध राहिला नाही. अंगुलीय दर्शनानंतर राजाला तो संबंध पुनः आठवला, ही गोष्ट वेगळी. पण तोंपर्यंत त्या दोन जीवनांतील दुवा नष्ट झालेला आहे. त्याच्या दृष्टीनें आता कण्वाश्रमांतलि अनुभव म्हणजे पूर्वजन्मीच्या अनुभवासारखेच आहेत.

हंसपदिकेचे गीत ऐकल्यामुळे त्याला एक विलक्षण हुरहूर लागलेली असते आणि त्याचे मन गोंधळांत पडलेले असतें. त्याच अवस्थेंत त्याला कंचुकीचे पुढील शब्द ऐकूं येतात.—

"महाराजांचा जय असो. हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या अरण्यांत राहणारे कांही तपस्वी कण्वाचा निरोप घेऊन कांहीं स्त्रियांसह आलेले आहेत."

त्यावर राजा अत्यंत आदराने विचारतो. "काय, कण्वांच्याकडून निरोप आलेला आहे?"[६०]

राजाच्या या प्रश्नांतच त्याच्या मानसिक अवस्थेचें स्पष्टीकरण आहे. कण्व हे त्याच्या राज्यांतील फार मोठ्या योग्यतेचे कुलपति आहेत व त्यांच्याबद्दल राजाच्या मनांत अत्यंत पूज्य बुद्धि आहे. म्हणूनच 'कण्वाकडून निरोप आला' हे शब्द ऐकतांच अत्यंत आदराने (सादरम्) त्याची मान लवते. पण कण्वाश्रमाचें नांव ऐकून सुद्धा या आश्रमांतील आपल्या जीवनाची त्याला आठवण होत नाही. किंवा "सस्त्रीकः" या शब्दप्रयोगामुळे त्या आश्रमांतील स्त्रियांचाहि बोध त्याला होत नाही. कण्व शिष्यांचें स्वागत करून त्यांना घेऊन येण्याकरितां सोमरात उपाध्याकडे तो निरोप पाठवितो आणि आपण स्वतः त्यांना भेटण्याकरिता अग्निगृहाकडे जाण्यास निघतो.

---

५६ दुष्यंताचा अनुभव गायनामुळें आलेला आहे. दृष्यामुळें येणारा असाच अनुभव कालिदासानें रघुवंशांत वर्णत केला आहे.

पाहा रघु—११—२२

(५७) "भावैः वासनाभिः स्थिराणिः—
राघव भट्ट.

(५८) "विषय विशेषज्ञानाभावपूर्वम्"—
राघव भट्ट.

(५९) (इति पर्याकुलः तिष्ठति।) ५।२
नंतरची रंगसूचना.

(६०) कंचुकी–जयतु जयतु देवः। एते खलु हिमगिरेरुपत्यकारण्यी वासिनः काश्यप सन्देशमयाद सस्त्रीकाः तपास्विनः संप्राताः।

राजा—(सादरम्) किं काश्यप सन्देशहारिणः!

परंतु राजाच्या मनांत विषण्णतेने जो एकदा ठाव दिला आहे, तो कायमच आहे. म्हणूनच तो अग्निगृहाकडे जात असतांना त्याच्या मुखांतून "राज्ञां तु चरितार्थता दुःखोत्तरैव" असे उद्गार निघतात. आणि, वैतालिकांचें स्तुतिगीत ऐकल्यानंतर "एते पुन: क्लान्त मनस: नवीकृत: स्म:" असें तो म्हणतो.

पण वैतालिकांची स्तुति ऐकून राजाची विषण्णता खरोखर नष्ट झाली होती काय? राजा अग्निगृहांत गेल्यावर तेथील संमार्जित वेदीवर तो चढतो आणि एका सेवकाचा आधार घेऊन उभा राहतो.[६१] परिजनाचा आधार त्याला घ्यावा लागतो, यांतच त्याच्या मनोविकलतेचें बीज आहे.

आणि, अशा अवस्थेंत असतांनाच तो वेत्रवतीला विचारतो, —"वेत्रवति, किमुद्दिश्य भगवता काश्यपेन मत्सकाशमृषय: प्रेषिता: स्यु: ।

किं तावद्व्रतिनामुपोढतपसां विघ्नैस्तपो दूषितं
धर्मारण्यचरेषु केनचिदुत प्राणिष्वसच्चेष्टितम् ।
आहोस्वित् प्रसवो ममापचरितै विष्टंभितो
वीरुधा—
—मित्यारूढबहुप्रतर्कमपरिच्छेदाकुलं
मे मन: ॥ अंक ५।९

(भगवान् कण्वांनी हे ऋषि माझ्याकडे कशाकरिता पाठविले असतील बरें? व्रतस्थ होऊन ज्यांनी तपाचा आरंभ केला आहे, अशा तपस्व्यांचें तप विघ्नांनी दूषित तर केलें नसेल ना? किंवा, त्या धर्मारण्यांत फिरणाऱ्या (किंवा चरणाऱ्या) प्राण्यांना कोणी इजा केली असेल? किंवा, माझ्याच अपकृत्यामुळे तेथील लतांचा बहर खुंटला असेल? अशा प्रकारचे अनेक तर्क माझ्या मनांत येतात, आणि कोणताहि निश्चित निर्णय करतां न आल्यामुळे माझें मन आकुल होत आहे.)

वर वर पाहतां हा श्लोक साधा दिसतो. आश्रमांतून कांही संदेश आला आहे. तो कशाबद्दल असणार?— एक तर, तपांत विघ्न आलें असेल किंवा त्या आश्रमाला व तेथील प्राणिवृक्षादिकांना कोणी इजा केली असेल. या शिवाय वेगळी कोणती तक्रार असणार आहे? पण या श्लोकाकडे आपण एका विशिष्ट कक्षेंतून पाहूं या. म्हणजे या साध्या श्लोकांतहि मोठा आशय आपल्याला आढळेल आणि त्यांतूनच आपणांस वनज्योत्स्नेचा पत्ता लागेल.

कालिदासाने हा श्लोक राजाच्या मुखीं तो एका विशिष्ट मनोवृत्तींत असतांना घातलेला आहे. राजा सुरुवातीसच विरहामुळे येणाऱ्या उद्विग्नतेच्या अवस्थेंत आहे. पण कोणाचाहि विरह (त्याच्या दृष्टीने) झालेला नसल्याने हा अनुभव का यावा, हें त्याला कळत नाही, म्हणून तो गोंधळलेल्या मन:स्थितींतहि आहे.

ही उद्विग्नतेची मन:स्थिति इतकी जबर आहे कीं, ती इतर कोणत्याहि प्रकाराने नष्ट होत नाही. अखेरपर्यंत कायम राहाते. मनाला आलेली उद्विग्नता ही एकतर विस्मयाने नाहीशी होईल, किंवा कोणी आपल्या मनास उल्हसित केल्यास नाहीशी होईल. राजा उद्विग्नतेंत असतांना कण्वाकडून संदेश आल्याचें त्याला कळलें, तेव्हा त्याला विस्मयाचा धक्का बसला असेल[६२] व तेवढ्यामुळे त्याची उद्विग्नता क्षणभर मावळली. पण तो अग्निगृहाकडे निघाला असतां तिने पुन: उचल खाल्ली. मध्ये वैतालिकांच्या स्तुतिवाक्यांनी त्याला थोडेंसें उल्हसित झाल्यासारखें वाटलें, पण अग्निगृहांत येऊन बसतांच पुन: उद्विग्नता कायमच. इतकेंच काय, पण शकुंतलेच्या प्रकरणाचा निकाल लागल्यानंतरहि, आणि खरोखर हें सर्व निर्विकार मनानें केलें असतांहि ती मुळची उद्विग्नता कायमच राहिली! एवढा तिचा त्याच्या मनावर पगडा बसला होता.

या जबर उद्विग्नतेच्या मुळाशीं कोणतें कारण होतें? त्याच्या दृष्टीने कोणाचाहि विरह नव्हता. तें कारण त्याने "रम्याणि वीक्ष्य......" या श्लोकांत सांगितलें आहे. आणि, त्या श्लोकाची बैठक सबंध पाचव्या अंकाला आहे.

---

(६१) आरुह्य परिजनांसावलम्बी तिष्ठति ।
अंक ५।९ पूर्वीची रंगसूचना

(६२) मागे टीप ४० मध्यें राजाच्या तोंडचें वाक्य दिलें आहे. त्यांत (सादरम्) अशी रंगसूचना आहे. त्याऐवजी (सविस्मयम्) असाहि पाठ आहे.

या श्लोकामधील तत्त्वाचा आविष्कार पांचव्या अंकांतून दोन मार्गांनीं झालेला आहे. त्यांपैकी एक मार्ग म्हणजे शकुंतलाप्रत्यादेश. कण्वाने ऋषींना का पाठविलें असेल, या विचारांत राजा असतांना शकुंतला त्याच्यासमोर येऊन उभी राहते. तो तिला अखेरपर्यंत आपली पत्नी म्हणून ओळखीत नाही. आणि, तिला निघून जावें लागतें. ती बाहेर निघून गेली असतांना कोणी एक तेजोमय स्त्रीची आकृति तिला उचलून घेऊन जाते. पुरोहिताकडून राजाला हें कळतें, तेव्हा तो म्हणतो—"आपण नाही तरी अगोदरच तिला घालवून दिलें आहे; तेव्हा आता अधिक विचार कशाला?"[६३] हें त्याने अगदी निर्विकारपणें म्हटलें आणि पुरोहित निघून गेला.

पण दुसऱ्याच क्षणीं राजा म्हणतो, "वेत्रवति, माझें मन अगदी पर्याकुल झालें आहे मला शयनगृहाकडे घेऊन चल."[६४] आणि चालतां चालतां तो उद्गारतो—

(ही घालवून दिलेली मुनिकन्या माझी पत्नी आहे, हें मला स्मरत नाही ही गोष्ट खरी; पण माझें हें वेदनाकुल हृदय मात्र जणूकांही तिच्या म्हणण्याचा प्रत्यय आणून देत आहे.)

शकुंतलेच्या म्हणण्याचा बोध राजाच्या बुद्धीला होत नाही, हृदयाला मात्र तें पटतें, असाच या श्लोकाचा भावार्थ आहे. '…तच्चेतसा स्मरति नूनमबोध पूर्वम्' अशीच ही स्थिति नाही काय?

याच तत्त्वाचा आविष्कार करणारा दुसरा मार्ग, वर उध्दृत केलेला 'किं तावद् व्रतिनाम्' (५।९) हा श्लोक होय. या श्लोकांत राजाने जे तर्क केले आहेत, ते नुसते वरवरचे नाहीत. तपस्व्यांच्या तपांत आलेलें विघ्न, आश्रमांतील प्राण्यांना होणारी इजा, किंवा लतांचा प्रसव-निरोध यांच गोष्टींचें राजाला नेमकें स्मरण झालें, तें कां? याचें कारण राजाचा त्या सर्व गोष्टींशी सौहृदसंबंध आहे. शकुंतलेशी राजाचा जो प्रणयप्रसंग झाला त्याशी या प्रत्येक गोष्टीचा निकटवर्ति संबंध आहे. आश्रममृगाची शिकार करण्यास राजा गेला नसता, तर शकुंतलेसारखी मृगाक्षी त्याला दिसली नसती राजा झाडाआड उभा राहून पाहूं लागला. पण पुढे येऊन ओळख करून घेण्याची संधि त्याला येईना. इतक्यांत शकुंतला नवमालिकेला-वनज्योत्स्नेला पाणी घालण्यास गेली. आणि त्या लतेवरचा भृंग उडून तिला त्रास देऊं लागला. त्याचें निवारण करण्याच्या निमित्तानें राजाला पुढे होतां आलें आणि शकुंतलेची ओळख करून घेतां आली. पण त्यानंतर आश्रमांत पुन: कसें जातां येईल, ही राजाला पंचाईत पडली. इतक्यांत आश्रमांतील तपस्व्यांनी निरोप पाठविला की, "महर्षि कण्वांच्या गैरहजेरींत राक्षस आमच्या इष्टींत विघ्न आणीत आहेत. तेव्हा आपण आश्रमांत येऊन राहावे." त्यामुळे राजाला आश्रमांत राहतां आलें.[६५] आणि, शकुंतलेशीं विवाह करतां आला. यापैकी कोणतीहि एक गोष्ट घडली नसती, तर राजाला शकुंतला प्राप्त होती ना. या सर्व घटनांचें राजाच्या आयुष्यांत अत्यंत महत्त्व होतें. ह्या गोष्टी राजाला वारंवार आठविल्या असतील. राजा व शकुंतला यांच्या रह:संवादांत या गोष्टी राजाने अनेक वेळा सांगितल्या असतील. त्यावर तीं दोघेंहि अनेक वेळां प्रेमाने आणि आनंदाने हसलीं असतील. ह्या घटनांनी राजाच्या हृदयांत कायमचें स्थान पटकाविलें होतें. त्यांचा राजाशी भावस्थिर सौहृद संबंध झाला होता.

---

(६३) राजा–भगवन्, प्रागपि सोऽस्माभिरर्थ: प्रत्यादिष्ट एव। किं वृथा तर्केण अन्विष्यते।
अंक ५

(६४) राजा–वेत्रवति, पर्याकुलोऽस्मि। शयनभूमिमार्गमादेशय। अंक ५

कामं प्रत्यादिष्टां स्मरामि न परिग्रहं मुनेस्तनयाम्।
बलवत्तु दूयमानं प्रत्याययतीव मां हृदयम्॥
अंक ५।३१

(६५) उभौ–तत्रभवत: कण्वस्य महर्षेरसान्निध्यात् रक्षांसि न इष्टिविघ्नमुत्पादयन्ति। तत् कतिपय रात्रं सारथि द्वितीयेन भवता सनाथी क्रियतामाश्रम इति।

राजा–अनु गृहीतोऽस्मि।

विदूषक:–(अपवार्य) एषा इदानीमनुकूला तेऽभ्यर्थना।–अंक २ रा.

म्हणूनच त्या उद्विग्नतेच्या अवस्थत राजानें ज्व्हा कण्वाश्रमांतून तपस्वी आल्याचें ऐकलें, तेव्हा त्याला नेमक्या त्याच गोष्टीचें स्मरण झालें. एरवीं 'सस्त्रीकाः तपस्विनः' यावरून त्याचे विचार दुसऱ्या मार्गाने धावले असते. कण्वाचा निरोप घेऊन तपस्वी आले, पण ते सस्त्रीक का यावेत, अशा प्रकारचा विचार त्याला पडला असता.

पण हें स्मरण त्याला सामान्यरूपाने झालें होतें. कारण दुर्वासाच्या शापामुळे पूर्वजीवनाशी त्याचा संबंध तुटला होता. त्याच्या हृदयांत कायमचे स्थित असलेले ते संबंध असले, तरीहि शाप-व्यवधानामुळे त्यांची वैशिष्ट्यपूर्वक जाणीव होत नव्हती. तें स्मरण 'अबोधपूर्व' होतें. विशिष्ट तपोविघ्न, विशिष्ट मृगपीडा आणि विशिष्ट लतेचा प्रसव अशी जाणीव त्याला राहिली नव्हती. ती तशी जाणीव झाली असती, तर त्याला शकुंतलेची चटकन् आठवण झाली असती......तच्चेतसा स्मरति नूनमबोध पूर्वं भाव स्थिराणि जननान्तर सौहृदानि।

आणि, या स्मरणामुळेच त्याचें मन आकुल झालें होतें.

हंसपदिकेचें गीत ऐकल्यानंतर त्याचें मन उत्कंठित होऊन तो 'पर्याकुल' होऊन बसला; कण्वशिष्य आल्याचें ऐकल्यावर तो तर्कमूढ होऊन त्याचें मन 'अपरिच्छेदाकुल' झालें; शकुंतलेला घालवून दिल्यावर बुद्धीचें विस्मरण आणि हृदयाची प्रतीति यांच्या गोंधळाने तो 'पर्याकुल' झाला... रम्याणिवीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान् पर्युत्सुकी भवति यत् सुखितोऽपि जन्तुः।

'किं तावत् व्रतिनाम्' या श्लोकांत जे तर्क सांगितले आहेत, त्यांत एक तर्क 'माझ्या कांहीं अपचरितामुळें लतांचा बहर तर खुंटला नसेल ना!' असा आहे. या विधानांतील सामान्यत्व हे शाप-व्यवधानमूलक आहे हे सांगितलेंच आहे. एकदां हे शापव्यवधान निघून गेले, म्हणजे हेंच विधान लताविशेषाच्या बाबतींत गृहीत धरतां येतें. आणि मग विशिष्ट लता म्हणजे 'वनज्योत्स्ना' असें समजण्यास कांहीं प्रत्यवाय येत नाहीं. राजाच्या या सामान्य निर्देशाचें विशेषीकरण म्हणजे माझ्या कांहीं 'अपचरितामुळें वनज्योत्स्नेची बहरतर खुंटला नसेल ना!' अशा प्रकारचें होईल. आणि, ही गोष्ट लक्षांत आली कीं, वनज्योत्स्नेच्या पुढल्या हकीगतीचें सूत्र सांपडलेंच.

येथे असा प्रश्न उपस्थित होतो कीं, कालिदासाने वनज्योत्स्नेचा निर्देश इतक्या गूढपणाने का केला? उत्तर अगदी सोपें आहे. राजाला जर शकुंतलेचेंच स्मरण राहिलें नाही, तर वनज्योत्स्नेचेंच कोठून राहणार? जेथें शकुंतला समोर उभी राहिली असतांना सुद्धा तो तिला परकलत्र समजून केवळ 'अत्रभवती' या शब्दाने तिचा निर्देश करतो आणि एक 'मुनिकन्या' म्हणूनच तिला ओळखतो, तेथे वनज्योत्स्नेला सुद्धा एक 'वीरुध्' या पलीकडे काय म्हणूं शकेल? वनज्योत्स्नेला त्याने वनज्योत्स्ना म्हणून ओळखलें की, त्याला शकुंतलेची ओळख पटलीच पाहिजे! आणि शापाचा परिणाम शकुंतलेच्या बाबतींत जसा होणार, तसाच वनज्योत्स्नेच्या बाबतींतहि झाला पाहिजे.

वनज्योत्स्नेचा बहर जो खुंटला असेल, तो का खुंटला असेल? त्याचेंहि उत्तर दुष्यंताने 'ममापचरितैः'— माझ्या अपकृत्यांनी— असें दिलें आहे. हें अपकृत्य म्हणजे राजाने शकुंतलेचा केलेला प्रत्यादेश. प्रत्यादेशाची प्रत्यक्ष क्रिया जरी नंतर घडून आली, तरी त्याची सुरवात अगोदरच झाली होती. ज्यावेळीं शक्रावताराच्या सरोवरांत शकुंतलेची अंगठी हरवली, त्याचवेळीं प्रत्यादेशाचें बीज रोवलें गेलें. आणि म्हणूनच राजाला लतांचा बहर खुंटण्याची जी शंका आली, ती खरी होती. प्रत्यादेशानंतर शकुंतलेचें जीवन दुःखी झालें, तिचा आनंद मावळला आणि तिचें सुख लोपलें. इकडे वनज्योत्स्ना कष्टी झाली, तिची पानें-फुलें गळालीं आणि ती सुकत चालली.

वनज्योत्स्नेच्या गोष्टीचा न सापडणारा धागा शोधून काढण्याकरिता इतका विस्तार करावा लागला. या पुढील हकीकत सरळहि आहे आणि थोडीहि आहे. प्रत्यादेशानंतर कालिदास दोनच घटना सांगतो— एक म्हणजे दुष्यंताचा

पश्चात्ताप आणि दुसरी शकुंतलेचें पुनर्मीलन. याला तुलकून वनज्योत्स्नेसंबंधीं कांहीं सांगितलें आहे काय ?

राजाला आंगठी सापडल्यानंतर तो पश्चात्तापाने होरपळून गेला. शकुंतलेला आपण घोर अन्याय केला, याची त्याला जाणीव झाली आणि तो दुःखाने व तिच्या विरहाने वेडा होण्याची वेळ आली. त्यांतच वसंत ऋतु आला. वसंत ऋतु म्हणजे प्रेमी जनांना केवढा सुखाचा काळ ! पण तोच राजाचे दुःख वाढविण्यास कारणीभूत झाला. वसंतोत्सव करावयाचा नाहीं असें त्याने ठरविलें. वसंतोत्सव राजाने बंद केला, त्यावेळेचें कालिदासाने वर्णन केलें आहे.

चूतांना चिर निर्गतापि कलिका बध्नाति न स्वरजः । —अंक ६।४

(आम्रवृक्षाला कळ्या लागून बराच काळ लोटला, तरीहि त्या कळ्या खुलत नव्हत्या.)

राजाचा आनंद मावळणं आणि आम्रवृक्षाची कळी न खुलणें या दोन घटनांचा कांहीं संबंध आहे काय ?

कालिदासीय काव्यांत ज्या प्रमाणें नायिकांचा लतांशी साम्य संबंध आहे, या प्रमाणें नायकांचा वृक्षाशी संबंध आहे. अज राजा इंदुमतीबद्दल शोक करतांना म्हणतो, " किंवा माझ्या दुर्दैवाने विधात्याने या पुष्पमालेलाच विद्युत्पात करविलें, त्याने वृक्ष जरी पाडला नाहीं, तरी त्या वृक्षाच्या आश्रयाने असलेल्या लतेचा नाश केला " ६६ तसेंच, रति विलाप करीत असतांना म्हणत " विधात्या ! केवळ मदनाला मारलें आणि मला सोडून दिल, हा खरोखरच; अर्धवध केला. मजवृत असा आश्रयवृक्ष हत्तीने जर मोडून टाकला, तर लता खालीं पडलीच पाहिजे." ६७ आणि, अग्निमित्र तर मालविकेला सरळच म्हणतो, " मी सहकार वृक्षासारखा आहे, असें समजून, तूं मला अतिमुक्त लतेप्रमाणें आलिंगन दे "६८ येथें तर पुनः आम्रवृक्ष आणि नवमालिका यांची जोडीच आली. तेव्हा दुःखांत असतांना आम्रवृक्षाची कळी खुलूं नये, हें साहजिकच आहे.

एकीकडे शकुंतला दुःखी, तर दुसरीकडे दुष्यंत कष्टी. इकडे वनज्योत्स्नेचा बहर खुंटलेला, तर तिकडे सहकाराची कळी खुलेना. अशा अवस्थेंत कांहीं काळ लोटला.

अखेरीस हेमकूट पर्वतावरील मारीचाश्रमांत स्वर्ग आणि पृथ्वीचें मीलन होते, त्या रिसरांत दुष्यंत आणि शकुंतलेचें पुनर्मीलन झालें. शकुंतलेने दुष्यंताचे अश्रुपूर्ण नयनांना स्वागत केलें. दुष्यंत तिच्या जवळ आला आणि तिचे अश्रु पुसण्याकरिता त्याने हात वर केला, तोंच काय आश्चर्य !

—दुष्यंताच्या बोटांत तीच आंगठी !

शकुंतला म्हणते, " आर्यपुत्रा,हीच ती आंगठी. फार द्वाड असली पाहिजे ही; म्हणून तर वेळेवर मला सापडली नाही. "

दुष्यंताने आपल्या बोटांतून आंगठी काढली; आणि, शकुंतलेच्या बोटांत घालतांना तो म्हणतो, " तर मग वसंताशी संयुक्त झाल्याची खूण म्हणून लता पुष्प धारण करो ! "

दुष्यंत आणि शकुंतला यांच्या पुनर्मीलनांतील हें शेवटलें वाक्य आहे. यानंतर भरताला घेऊन हीं दोघींहि महर्षी मारीचाच्या दर्शनास निघालीं.

मारीचांनी ही आनंदाची बातमी कण्वाकडे पाठविली. बातमी सांगण्यास निघालेला शिष्य कण्वाश्रमांत सायंकाळीं पोहोचला. शकुंतलेचें

---

(६६) अथवा ममभाग्य विप्लवादशनिः कल्पित एष वेधसा । यदनेन तरुर्न पातितः क्षपिता तद्विटपाश्रिता लता ॥ रघु. ८।४७

(६७) विधिना कृतमर्धवैशसं ननु मां कामवधे विमुञ्चता । अनपायिनि संश्रयद्रुमे गजभग्ने पतनाय वल्लरी ॥ कुमार ४।३१

(६८) परिगृहाण गते सहकारतां त्वमतिमुक्तलता चरितं मयि ॥ मालविकाग्निमित्र अंक ४।१३

दुष्यंताशी पुनर्मीलन झालें, हें ऐकून आश्रमांत आनंद व उत्साह दिसूं लागला. शकुंतला गेल्यापासून प्रथमच आश्रमांतील ती रात्र आनंदाची अशी गेली. दुसरे दिवशीं सकाळीं प्रियंवदा पर्णकुटींतून बाहेर आली आणि पाहाते तों काय !

—वनज्योत्स्ना फुलांनी अगदी बहरलेली !

× + ×

दुष्यंताने शकुंतलेला पहिल्यांदा पाहिलें, त्यावेळीं त्याच्या तोंडून लताविषयक उद्गार निघाला. दुष्यंताचें शकुंतलेशी पुनर्मीलन झालें, त्यावेळचें अखेरचें वाक्यहि लताविषयकच आहे.

राजाला कण्वाश्रमांत दोन वनलता दिसल्या. शकुंतला आणि वनज्योत्स्ना. शकुंतलेचें यौवन कुसुमाप्रमाणे लोभनीय होतें. वनज्योत्स्ना नवकुसुमांनीं यौवनवती होती. शकुंतलेचा राजाशी आणि वनज्योत्स्नेचा सहकाराशी तेथेच व त्याच मोसमांत समागम झाला. दोघींच्याहि बाबतीत कण्वाची काळजी दूर झाली... पुढे, राजाच्या अपचारितामुळे शकुंतला दुःखी झाली आणि वनज्योत्स्नेचा बहर खुंटला. आणि, राजा पश्चात्तापाने कष्टी झाला, तेव्हा वसंत असूनहि सहकाराची कळी खुलेना ! अखेर दुष्यंत-शकुंतलेचें पुनर्मीलन झालें आणि शकुंतला व वनज्योत्स्ना आनंदाने फुलून गेल्या... ऋतुसमवायचिह्न प्रतिपद्यतां लता कुसुमम् ।

---

६९ शकुन्तला—(नाममुद्रां दृष्ट्वा) आर्यपुत्र, एतत् तदङ्गुलीयकम् !... विषमं कृतमनेन यत् तदा आर्यपुत्रस्य प्रत्यय काले दुर्लभमासीत् ।

राजा—तेन ऋतुसमवाय चिह्नं प्रतिपद्यतां लता कुसुमम् ।

आपलीं लोकगीतें

मूळ लेखक—प्रा. श्यामाचरण दुबे, एम्. ए.
अनुवादिका—सौ. लीला दुबे, एम्.ए.

● नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजांतील प्रा. श्यामाचरण दुबे यांच्या लोकवाङ्मयाचा व मानववंशशास्त्राचा गाढ व्यासंग आहे. नागपूर विद्यापीठानें त्यांना 'डॉक्टरेट' देण्याचें ठरविलें आहे. अशा अधिकारी विद्वानाचा हा लोकगीतांवरील प्रबंध वाचकांस अतिशय महत्त्वपूर्ण वाटेल.

प्रा. दुबे यांच्या मूळ हिंदी लेखाचा मराठी अनुवाद त्यांच्या सुविद्य पत्नी 'युगवाणी' च्या लेखिका सौ. लीला दुबे यांनी केलेला आहे.

* * *

आजच्या विकसित साहित्याच्या प्रवाहाचा परम्परागत स्त्रोत आमच्या लोकसाहित्यांत आहे. अधिकांशत: मौखिक व अलिखित असें हें साहित्य म्हणजे आपल्या विविध लोकसंस्कृतींचा दर्पणच. याच्यांत आपले परम्परागत विश्वास, आचारविचार आणि प्रथा आपल्या लोकजीवनांतील सुखदु:खें व आपला भूत व वर्तमानकाळ हीं सर्व सुरक्षित आहेत. देशांतील सर्वव्यापी नवीन सांस्कृतिक चेतनेमुळें आपण आपल्या संस्कृतीच्या या अक्षय भांडाराकडे आकृष्ट झालों आहोंत. आपल्या संस्कृतीचीं मूलतत्त्वें कोणतीं, याबद्दल संशोधन करण्याकरिता आज आपण केवळ प्राचीन भग्नावशेष, प्रस्तरमूर्ति व दुर्लभ प्राचीन ग्रंथांवरच पूर्णत: अवलंबून न राहातां त्यांना जनजीवन व त्याच्या उपलब्ध परम्परा यात शोधण्याचा प्रयत्न करीत आहोत. लोकसाहित्याचीं निरनिराळीं अंगें-लोकगीतें, लोकगाथा, लोककथा, लोकोक्ति, लोकविश्वास—वगैरे केवळ विशुद्ध साहित्याच्याच दृष्टीने अभ्यासाचा विषय नसून सांस्कृतिक—अर्थात् मानवशास्त्र व समाजशास्त्र यांच्या-दृष्टीने देखील अत्यंत महत्त्वाचीं आहेत.

लोक-साहित्याच्या भांडारांत लोकगीतांचें स्थान नि:संशय सर्वोच्च आहे. प्राथमिक संस्कृतीच्या निम्नतम स्तरांवर असणाऱ्या लोकांत देखील हृदयांतील अनुभूति संगीतमय शैलींत व्यक्त करण्याचे केलेले प्रयोग फारसे प्रयत्न न करतां देखील दृष्टीस पडण्यासारखे आहेत.

संस्कृतीच्या क्रमिक विकासाबरोबर माणसाच्या काव्यात्मक वृत्तींचा देखील विकास होतो व लोकगीतांची शैली व भावभूमि देखील अधिक विस्तृत होऊं लागते. लोकगीतांचें क्षेत्र मुळांतच अत्यंत व्यापक आहे. मानवी जीवनांतील एखादा महत्त्वाचा मूलभाव सरल स्वरूपांत व्यक्त करणाऱ्या दोन ओळींमध्येच पूर्ण झालेलें एखादे लहानसें गीत अथवा शैली व भाववर्णन यांच्या दृष्टीने विकसित व जीवनाच्या भिन्न भिन्न पैलूंना कवित्वपूर्ण, रसमय व अलंकारिक पद्धतीने स्पर्श करणाऱ्या लोकगाथा—दोन्हींचीहि गणना लोकगीतांतच केली जाते.

लोकगीतें हीं स्वयंस्फूर्त अशा प्राकृतिक काव्याचीं अंगें आहेत. प्रत्यक्ष विचार किंवा प्रयत्न न करतांच त्यांची क्रमश: निर्मिति होत असते. पं. रामनरेश त्रिपाठी यांनी लोकगीतांची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे. 'लोकगीतें म्हणजे प्रकृतीचे उद्गार आहेत. त्यांत अलंकार नाहीं, फक्त रस आहे; छन्द नाही, फक्त लय आहे; लालित्य नाही, फक्त माधुर्य आहे.' लोकगीतांत त्यांचा रचयिता किंवा रचनाकाल यांचा प्रश्न महत्त्वाचा नाही. त्यांचें महत्त्व त्यांची सहज रसोद्रेकाची शक्ति व सरल सौंदर्य यांमध्ये आहे. त्यांची गणना परम्परागत मौखिक साहित्यांत करायला पाहिजे. त्यांत एका व्यक्तीच्या अनुभूतीपेक्षा लोकहृदयाची अनुभूतीच अधिक असते. लोकगीतें एका विशिष्ट व्यक्तीच्या भावनांचें प्रतिनिधित्व करीत नसून लोकसमुदायाच्या भाव-

नांचें कांही अंशीं अधिक खऱ्या स्वरूपांत प्रतिनिधित्व करतात. काळाच्या व स्थानाच्या सीमा उल्लंघून, ग्रामीण स्त्रिया व गायक यांच्या ओठांवर जिवंत राहाणारीं हीं लोकगीतें गतकाळाच्या परम्परेला वर्तमानकाळांत अंशत: जिवंत ठेवतात. काळाच्या ओघाबरोबर लोकगीतांच्या बाह्य स्वरूपांत थोडेसें परिवर्तन तर होतेंच, परंतु त्यांचा मूलभाव, त्याचप्रमाणें, अभिव्यक्तीची मौलिक शैली बहुतेक अपरिवर्तितच राहाते.

सर्वच लोकगीतें काव्याच्या क्षेत्रांत येत नाहीत. मूलत: तर तीं गीतें आहेत. गेय असणें हा त्यांचा प्रमुख गुण आहे. अनुभूतीची मार्मिकता, त्याचप्रमाणें, अभिव्यक्तीची सरळ, स्पष्ट व तीव्र पद्धति— यांमुळे बऱ्याचशा गीतांत 'काव्य'गुण थोड्याफार प्रमाणांत येऊन जाणें अगदी स्वाभाविकच आहे. त्या मानाने विकसित व सुसंस्कृत लोकांच्या बहुतेक गीतांत साधारणत: काव्याचा अंश थोड्याफार प्रमाणांत सापडतोच. परंतु प्राथमिक संस्कृतींच्या खालच्या थरांवर राहून आयुष्य कंठणाऱ्या अनेक आदिवासी जातींच्या गीतांच्या बाबतींत असें म्हणतां येत नाही. हैद्राबादेंतील 'चेंचू' नांवाच्या आदिवासी जातीसंबंधी लिहितांना डॉ. हैमंडॉर्फ यांनी म्हटलें आहे कीं, त्यांचीं गीतें म्हणजे जवळ जवळ अस्पष्ट उद्गारच असतात. त्यांत काव्यमय अभिव्यक्तीचा पूर्णत: अभाव असतो. आसाममधील "कोन्यकनागा" जातीचीं गीतें सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचीं असूनहि काव्याच्या दृष्टीनें मुळीच महत्त्वाचीं नसतात. छत्तीसगढांतील 'कमार' जातीच्या गीतांसंबंधीं माझें मत देखील हेंच आहे. त्यांच्या गीतांत विस्तारपूर्वक वर्णन करण्याची शक्ति तर आहे; परंतु जेथें भावनांच्या तीव्र आवेगाच्या अभिव्यक्तीचा प्रश्न येतो तेथे त्यांच्या गीतांची शक्ति कुंठित होऊन जाते व अशा वेळी त्यांचे उद्गार अर्थहीन आणि अस्पष्ट होतात. त्याचबरोबर अनेक भारतीय आदिवासी जाति अशा देखील आहेत कीं, ज्यांचीं गीतें काव्याच्या दृष्टीने समृद्ध आहेत. वेरियर एल्विन व शामराव हिवाळे यांनी संकलित केलेलीं मध्यप्रदेशांतील गोंड, बैगा, परधान–वगैरे जातींचीं गीतें किंवा श्री. डब्ल्यू. जी. आर्चर यांनी संगृहित केलेलीं संथाल व छोटा नागपूर मधील इतर कांही जातींचीं गीतें या म्हणण्याची साक्ष देतील.

प्रकार व शैली यांच्या दृष्टीने लोकगीतांचे आपण खालीं दिल्याप्रमाणें वर्गीकरण करूं शकतो. सामान्य गीतें, नृत्यगीतें, गीतकथा व लोकगाथा.

गीतांचे विषय, गाण्याच्या वेळा, त्याचप्रमाणें, गाणाऱ्यांची सामाजिक स्थिति यांच्या आधारावर भारतीय लोकगीतांचें अधिक विस्तृत वर्गीकरण केलें जातें.

'सामान्य गीतें' म्हणजे समय किंवा जाति यांचा भेद न करतां सर्वसाधारण लोकांकडून गाईलीं जाणारीं गीतें.

विशिष्ट प्रसंगांचीं गीतें— उदा. विशिष्ट ऋतुंची गीतें, तसेंच, विशिष्ट उत्सव, सण वगैरेंच्या दिवशीं गाईलीं जाणारीं गीतें, विशिष्ट नृत्यांना साथ देणारीं गीतें, विवाह, जन्म यांसारख्या संस्कारांच्या प्रसंगीं गावयाचीं गीतें.

विशिष्ट जातींचीं गीतें – या गीतांवर सर्वसाधारण लोकांचा अधिकार नसून एखादी विशिष्ट जाति किंवा समूह यांचाच अधिकार असतो.

धार्मिक गीतें.

स्त्रियांचीं गीतें.

भीक मागणाऱ्यांचीं गीतें.

लोकविश्वास समाविष्ट करणाऱ्या गीतकथा.

वीरगाथा.

अनुभवांचे बोल, उपदेशपर गीतें–वगैरे.

जास्त विस्तृत विवेचनाने वर दिलेल्या प्रत्येक प्रकारच्या गीताचे भेद, उपभेद वगैरे सहजपणे मांडले जाऊं शकतात. पण साधारणपणें वरच्या वर्गीकरणांत भारतीय लोकगीतांचे सर्व प्रकार येऊन जातात. या निरनिराळ्या प्रकारांत सामान्य गीतांच्या विभागांत येणाऱ्या गीतांची संख्या सर्वांत जास्त आहे. 'काव्य' गुण देखील यांच्यांतच अधिक प्रमाणांत आढळतात. बरींचशीं नृत्यगीतें केवळ नृत्याचींच गीतें नसतात. तीं एरवीं देखील गाइलीं जाऊं शकतात. उदा.—

मध्यप्रदेशांतील 'कर्मा' गीतें. परंतु नृत्यगीतांत निरनिराळ्या प्रकारच्या नृत्यांकरिता उपयुक्त अशीं निरनिराळ्या प्रकारचीं गीतें असतात. मध्यप्रदेशांतील गोंड व बैगा या आदिवासी जातींत कर्मा, सैला, झारापत-वगैरे नृत्यांचीं गीतें वेगवेगळ्या पद्धतीचीं असतात. ओरिसामधील 'जुआंड' जातीच्या गृध्रनृत्य, कोयलनृत्य, पक्षीनृत्य, मयूरनृत्य, भालूनृत्य, हत्तीनृत्य, अजगरनृत्य, नागनृत्य, हरिणनृत्य त्याचप्रमाणें, वनशूकरनृत्य यांच्याकरिता उपयुक्त अशीं निरनिराळ्या पद्धतीचीं गीतें आहेत. विशिष्ट प्रसंगांयोग्य गीतांच्या विभागांत हिंदूंच्या निरनिराळ्या संस्कारांचीं गीतें सर्वांत महत्त्वाचीं आहेत. जन्म, विवाह, मरण, जीवनांतील प्रत्येक संक्रमणकाळाच्या उपयुक्त अशीं गीतें आपल्या लोकगीतांच्या भांडारांत आहेत. आपल्या देशांतील प्रत्येक ऋतूच्या वैशिष्ट्याचें व सौंदर्याचें वर्णन करणारीं गीतें म्हणजे आपल्या लोकसाहित्याची विशेषता आहे; आणि, अशा प्रकारचीं गीतें आपल्या अनेक प्रांतीय भाषांत व उपभाषांत उपलब्ध आहेत. कांहीं गीतांवर एका विशिष्ट जातीचीच सत्ता असते व अशा गीतांत त्या जातीचीं सांस्कृतिक वैशिष्ट्यें, त्याच प्रमाणें, आचार, विचार व व्यवहार यांची सुंदर झांक पडलेली आपल्याला दिसते. धार्मिक लोकगीतांचें—विशेषतः महाराष्ट्र व दक्षिण भारतांतील धार्मिक गीतांचें—आपल्या लोकसाहित्यांत अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे. कारण या लोकगीतांनी आपल्या ओजस्वी व उपदेशपूर्ण वाणीने विशिष्ट संस्कृतिक्षेत्रांना अनुप्राणित केलेलें आहे. स्त्रियांच्या गीतांमध्ये मुलांना निजवावयाचीं अंगाई गीतें, जात्यावर दळतांना गावयाचीं गीतें, धान कुटतांनाचीं गीतें, त्याचप्रमाणें, मुलीची सासरीं पाठवणी करतांना गावयाचीं गीतें महत्त्वाचीं असतात. त्यांत भारतीय स्त्रीत्वाच्या मार्मिक पैलूंचें हृदयस्पर्शी चित्रण असतें. लोकविश्वास समाविष्ट करणाऱ्या गाथा व गीतें यांचें महत्त्व अजूनपर्यंत आमच्या लोकगीतें संगृहित करणाऱ्या लोकांनी जाणलेलें नाही. परंतु मानवशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी भारतीय आदिवासी जातींच्या लोकसाहित्याचें आपलें अध्ययन पुढे मांडून त्यांचें या दृष्टीने असलेलें महत्त्व सिद्ध केलें आहे. गीतकथा व लोकगाथांचे संग्रह अजून फारसे झालेले नाहीत. परंतु काव्य, त्याचप्रमाणें, संस्कृति या दोन्हींच्या दृष्टीने त्यांचे संग्रह होणें अत्यंत आवश्यक आहे. वेरियर एल्विन् यांनी प्रकाशित केलेली 'रसालू कुवर'ची गाथा, तसेंच, प्रस्तुत लेखकाने प्रकाशित केलेल्या 'चंदेनी' आणि 'ढोला' यांच्या गाथा यांच्यामुळे लोकसाहित्याच्या या अंगांत किती सुंदर काव्य भरलेलें आहे, हें स्पष्ट झालें आहे. महाराष्ट्रांतील वीरगाथात्मक पोवाड्यांनी कोण प्रभावित होणार नाही! उपदेशात्मक गीतें व अनुभववचनयुक्त गीतें यांचा एक वेगळाच विभाग आहे. उत्तर भारतांतील 'घाघ' व 'भड्डरी' या गीतांत विनोदाबरोबरच महत्त्वाचें शिक्षण देण्याचें देखील सामर्थ्य असणारे ग्रामीण जीवनाचे अनेक नित्योपयोगी अनुभव भरलेले आहेत.

(२)

पहिलें म्हणजे, लोकगीतें हीं लोकजीवनाचीं गीतें आहेत. तसेंच, आपलें प्राकृतिक सौंदर्य व सरल व निष्कपट भावसौंदर्य यांच्यामुळें काव्याच्या दृष्टीने देखील तीं महत्त्वाचीं आहेत. लोककाव्याचें स्वतःचें असें एक वैशिष्ट्य आहे. त्यांत लोकजीवनाचें सुख व दुःख, माधुर्य व कारुण्य, अश्रु व हास्य यांचें सुंदर व हृदयस्पर्शी चित्रण असतें. त्यांत छंद नसतो, पण लय अवश्य असते. साहित्याच्या विद्यार्थ्यांनी अलंकार व रस यांच्या दृष्टीने लोकगीतांचा अभ्यास करून त्यांच्या वैशिष्ट्याचीं सुंदर विवेचनें केलीं आहेत. भावव्यंजना व ध्वनिसौंदर्य यांच्या दृष्टीनेंदेखील पुष्कळशीं लोकगीतें अत्यंत मधुर असतात. विशेषतः, शृंगार, करुण, वात्सल्य, वीर व हास्यरस यांचा सुंदर उद्रेक आमच्या लोकगीतांतून आढळतो.

मीलनातुर हृदयाच्या उत्सुकतेचें हें चित्र आपल्या सरलतेमुळेंच मोहक आहे.—

'को जानि बालम ला भेटिबो कि नाईं !
कोरे गाथे मांग सवारे
दरपन में छैया देखे
को जानि बालम ला भेटिबो कि नाईं'

'कोण जाणे, माझ्या प्रियकराशीं माझी भेट होते की नाही! भांग काढून आणि केसांचा शृंगार करून मी आरशांत आपलें रूप तर न्याहाळतें आहे; पण कोण जाणे, माझा प्रियतम मला भेटेल की नाही!'

आमचीं कितीतरी लोकगीतें विरहिणींच्या अश्रूंनी आर्द्र झालीं आहेत. उत्तर हिंदुस्थानांतील एका लोकप्रिय गीताच्या ओळी आहेत—

"सजन सकारे जाँयगे, नैन मरेंगे रोय
बिधना ऐसी रैन कर भोर कबहूं न होय"।

'सकाळ होईल आणि माझा प्रियतम निघून जाईल. रडून रडून माझ्या नेत्रांची ज्योत मंदावेल. दैवा! अशी रात्र कर कीं, पहाट कधीं होणारच नाहीं!"

एक दुसरें गीत आहे—

"कागा सब तन खाईयो,
चुन चुन खईयो मांस,
दो नैना मत खाईयो पियामिलनकी आस।
कागा नैन निकास दूं पिया पास ले जाय,
पहिले दरस दिखायके पीछे दीजो खाय'।

'हे काक! माझें सर्व शरीर खा, मांस काढून काढून खा पण हे दोन नेत्र मात्र खाऊ नकोस! कारण मला अजूनहि प्रियकराच्या भेटीची आशा आहे, हे काक! मी माझे नेत्र काढून देतें; ते तूं माझ्या प्रियकराजवळ घेऊन जा. प्रथम माझ्या नेत्रांना त्यांचे दर्शन घेऊं दे; मग हवें तर ते खाऊन टाक!'

एका विरहिणीचे खालील उद्गार इतके मार्मिक आहेत कीं, त्यांचा अनुवाद करणें अशक्य जरी नाहीं, तरी कठिण मात्र अवश्य आहे!

'मैं पापन ऐसी जली, कि कोयला भई न राख'

'मैथिली' तील खालील विरहगीत पहा—

'दीप जरिए बाती जरल
तै ओने पहुं मोरा आयल'

'दिव्याची ज्योति मंद पडली, वात जळून गेली; पण माझा प्रियतम अजून आला नाही!'

आणखी एक गीत आहे—

'साजन तेरे हेत, अँखियां तो नदियां भई
मन भयो बास रेत-गिर गिर पडत करार ज्यों'

'प्रियकरा! तुझ्यामुळे माझ्या नेत्रांचें नदींत रूपांतर झालें आहे; आणि, माझे मन पुन:पुन्हा कोसळून पडणाऱ्या वाळूच्या बांधाप्रमाणें झालें आहे!'

केवळ प्रेम व विरहच नाही, तर जीवनाच्या दुसऱ्या पैलूंच्या देखील मार्मिक अभिव्यक्तीची क्षमता आमच्या लोकगीतांत आहे. कटु जीवनांतील यथार्थता व्यक्त करणाऱ्या खालील गीतांत किती तीव्र व्यंग भरलेलें आहे—

महंगी के मारे बिरहा बिसरिगा,
बिसरिगा कजरी कबीर;
देखके गोरी के उभरा जोबन,
उठत न करेजवा में पीर!

'महागाईमुळे मी 'बिरहा' (गीत) विसरून गेलों. 'कजली' व 'कबीर' देखील विसरलों. आता तर प्रियेच्या उन्नत उरोजांकडे पाहून देखील हृदयांत कालवाकालव होत नाही!'

जानपद जीवनाची अभिव्यक्ति व कला यांच्या दृष्टीने उत्कल मधील ग्रामीण कृषकाचें हें गीत तरी किती सुंदर आहे—

'थांब जरा!
माझ्या शेतकरी मित्रा! थोडा वेळ थांब.
गरमीमुळे तूं व्याकुळ झाला आहेस.
क्षणभर थांब, विसावा घे.
तूं मला मारतोस—
पण मी कसा चालूं? मी तर म्हातारा आहे.
तारुण्यांत तर न थांबतां चालत होतों.
त्यावेळीं धानाचे किती उंच उंच ढीग लागत असत!
मी म्हातारा बैल! तूंच सांग, कसा चालूं?
मार! मार! मार!
जीर्ण हाडांमधून निर्जीव रक्त वाहील
पण मी शक्तिहीन कसा चालूं!
मालक, सावकार, जमीनदार सर्व तुला मारतात
व तूं चुपचाप सगळे सहन करतोस.
मार, मार, मला तूं मारून घे!
मी सगळें चुपचाप सहन करीन.
—थांब जरा! मित्रा, थोडा वेळ थांब!'

मुलीचें पित्याच्या घरचें वास्तव्य किती अल्पकाल टिकणारें असतें, या वस्तुस्थितीची जाणीव करून देणारें एक गुजराती गीत पाहा—

अमे रे लीलुडा वननी चल कलड़ी
उडी जाशुं परदेश जी
आज रे दादाजी ना देश मां
काले जाशुं परदेश जो ।
मी तर हिरव्यागार जंगलांतील पक्षी आहे.
उडून परदेशांत चालती होईन.
आज बाबाच्या देशांत आहे,
उद्या परदेशांत जाईन !'

एका पंजाबी लोकगीतांत मुलगी आपल्या पित्याला म्हणते आहे.—

साँज चिडियां दा चम्बा वे,
बाबल असीं उड़ जाना ।
साडी लम्बी उडारी वे
बाबल के हड़े देश जाना ।
तेरा चौका भाण्डा वे
बाबल तेरा कौन करे ?
तेरा महलाँ दे विच विच वें
बाबल मेरी माँ रोवे

बाबा ! मी तर पक्षी आहे.
मला एक दिवस उडून जायचें आहे.
माझा प्रवास दूरचा आहे.
उडून, कोण जाणे, कोणत्या अनोळखी
देशांत जाईन ।
कोणजाणे, कोण तुमच्याकरिता स्वैपाक करील ।
हाय ! तुमच्या महालांत माझी आई माझ्या-करिता किती रडेल ।

आमच्या लोकगीतांचें क्षेत्र याहीपेक्षा अधिक व्यापक आहे. कधी कधी तत्त्वज्ञान्याची गंभीरता धारण करून आमचीं लोकगीतें जीवनाकडे दृष्टिक्षेप करतात.—

जीयत नम लेवो
हाँसि लेवो खेलि लेवो;
मरे ले दूलभ संसार !
जिनगी के नई है भरोसा !

' आपण जन्म घेतला आहे, तर जगून घेऊं
हसून घेऊं, खेळून घेऊं
मेल्यानंतर जग दुर्लभ होईल !
आयुष्याचा काय भरवसा आहे ? '

लोकगीतांत आढळणाऱ्या दोन काव्यगत वैशिष्ट्यांचा वेगळा उल्लेख करणेंहि आवश्यक आहे; एक तर त्यांची ध्वनि व गति यांच्या द्वारां अभिप्राय व्यक्त करण्याची शक्ति व दुसरें म्हणजे, लोकगीतांत सापडणारीं सुंदर प्रतीकें !

खालील गीतांतील मीलनातुर हृदयाचें चित्र गति व ध्वनि यांच्यामुळे अधिकच मधुर झालें आहे—

' कोलकी ले झाँक देखे—
डांगभर बेला
लकर लकर आवत होहि
मोर अलबेला ! '

खिडकींतून वाकून पाहिलें,
सूर्य क्षितिजावर येऊन पोंचला आहे.
माझा अलबेला प्रियतम झप झप पावलें टाकीत येत असेल ?

त्याचप्रमाणें आपल्या लोकसाहित्यांत किती तरी सुंदर प्रतीकांचा देखील उपयोग केला जातो. प्रत्यक्षपणें व स्पष्ट भावांचा प्रयोग न करतां लोकगीतांत अनेक ठिकाणी प्रतीकांच्या भाषेचा प्रयोग केला आहे. आपल्या लोकगितांत देखील चंद्रोदय होणें आशेचें प्रतीक आहे व अंधःकार निराशेचें ! ' मनांत वसत असलेल्या फुलांचा ' सुगंध मिळणें म्हणजे म्हणजे इच्छित प्रियकर किंवा प्रेयसीची प्राप्ति होण्याचें द्योतक आहे. प्रियकर-प्रेयसीच्या मीलनाच्या वेळीं वादळ होणें व वृष्टि होणें त्यांच्या प्रेमाचें शारीरिक दृष्ट्या साफल्य होण्याचें प्रतीक आहे. संकेत-प्रतीकांची ही अस्पष्ट भाषा अनेक लोकगीतांचें अश्लीलतेच्या दोषापासून रक्षण करून त्यांच्यांत काव्यात्मकता आणण्यास मदत करते.

लोकगीतांचें सारें महत्त्व त्यांच्या काव्य-सौंदर्यांतच भरलेलें आहे, असें नाही. सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या देखील तीं अत्यंत महत्त्वाचीं आहेत. लोकसाहित्य म्हणजे लोकसमुदायाचा आरसा आहे. त्यांत आमच्या बहुजनसमाजाचें जीवन प्रतिबिंबित झालेलें आहे. श्री. देवेंद्र सत्यार्थींनी म्हटलें आहे, ' भारताचें कोणतेंहि चित्र, भारतीय प्रथा, रीतिरिवाज व आमच्या आंतरिक जीवनांतील सखोलता लोकगीतांइतक्या

चांगल्या पद्धतीने व्यक्त करूं शकत नाही.' हिंदुस्थानांतील निरनिराळीं सांस्कृतिक क्षेत्रें, त्याचप्रमाणें, निरनिराळ्या जातींचीं सांस्कृतिक वैशिष्ट्यें समजण्याकरिता त्यांच्या लोकगीतांचें अध्ययन आवश्यक आहे. लोकगीतांत आपल्या सामाजिक व कौटुंबिक आदर्शांची सुंदर अभिव्यक्ति दृष्टीस पडते. समाजाला कोणत्या प्रकारचा व्यवहार ग्राह्य आहे व कोणत्या प्रकारचा अग्राह्य आहे, याचें विवेचन या गीतांत असतें. परम्परा, लोकाचार, तसेंच, सामाजिक प्रथा व समाजांत जुन्या काळापासून चालत आलेल्या रुढि इत्यादींचें विश्लेषण या गीतांच्या साहाय्याने सहज व सोपें होतें. भारतीय संस्कृतीच्या ज्या पैलूंसंबंधीं वेद व स्मृति मौन आहेत, त्यासंबंधी देखील लोकगीतें थोडेसे कांहीं सांगूं शकतात. आर्येतर संस्कृतींतील ज्या अनेक प्रथा आर्यांच्या आगमनानंतर देखील येथें टिकून राहिल्या व परम्परेनें येऊन आज देखील आपल्या समाजांत कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत अस्तित्वांत आहेत, त्यांच्या बाबतींत आपलीं लोकगीतें नक्कीच मार्गप्रदर्शन करूं शकतात. बंगालमधील लोकगीतांसंबंधी केलेल्या संशोधनावरून हें स्पष्ट झालें आहे कीं, इतिहासांतील अंधःकारमय पृष्ठांना देखील या लोकगीतांपासून प्रकाश मिळणें शक्य आहे. लोकगीतांतील एखाद्या घटनेचें वर्णन हें एकच ऐतिहासिक प्रमाण असूं शकत नाहीं, तरीहि लोकगितांत विखुरलेल्या उल्लेखांमुळे संशोधकाला कोणत्या दिशेने प्रयत्न करावयास पाहिजेत, याची सूचना किंवा संकेत अवश्य मिळतो. सामान्य लोकगीतांत इतिहास अप्रत्यक्ष स्वरूपांत व लोकभावनेमुळे बदललेला असा आलेला दृष्टीस पडतो. परंतु भाटांनी सुरक्षित ठेवलेल्या गीतांत इतिहासाचें स्वरूप अधिक विश्वसनीय असतें. छत्तीसगढांतील रतनपूर, श्रीपूर–वगैरेंच्या इतिहासासंबंधीं तेथील देवार जातीच्या गीतांतून निःसंशय बरीच उपयुक्त माहिती मिळण्याचा संभव आहे. गोंडवनांतील गोंडांच्या राजकीय उत्थान व पतन यांचा इतिहास परधानांच्या बऱ्याचशा गाथांमधून अगदी सुरक्षित आहे. त्यांत वैज्ञानिक दृष्ट्या जें ग्राह्य आहे, त्याचा इतिहाससंशोधक उपयोग करूं शकतात. विकसित संस्कृतीमध्ये लोकगीतांतील असंख्य व अज्ञात अशा कवींच्या अभिव्यक्तीद्वारा मनोरंजन करून घेण्याचाच मुख्य उद्देश असतो. परंतु प्राथमिक संस्कृतींत लोकगीतें मनोरंजनाव्यतिरिक्त आपल्या विशिष्ट समूहाचीं सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्ट्यें स्थायी करण्याकरिता अप्रत्यक्ष रूपाने बरीच मदत करतात. अनेक वर्षें मानवशास्त्रासंबंधीं संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी लोकगीतांची उपेक्षाच केली. परंतु एल्विन्‌ने बैगा जातीवरील आपल्या पुस्तकांत त्या जातीच्या लोकगीतांचा उपयोग करून भारतीय मानवशास्त्राच्या अध्ययनाकरिता लोकगीतांचें विश्लेषण किती आवश्यक आहे, हें दाखवून दिलें आहे. आमच्या अधिकांश आदिवासी जातींचे सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोण त्यांच्या गीतांत व्यक्त होतात व त्यांचीं गीतें चांगल्या रीतीने समजल्याशिवाय त्यांचे दृष्टिकोण समजणें अत्यंत कठीण आहे. मध्यभारतांतील आदिवासींचें एक गीत आहे— 'जर तुम्हाला माझें जीवन जाणून घ्यावयाची इच्छा असेल, तर माझी 'कर्मा' गीतें ऐका!'— निःसंशय आदिवासी समाजाचा मूलभूत दृष्टिकोण या गीतांत निश्चित रूपाने व्यक्त होतो. छोटा नागपूरमधील 'हो' जातीच्या संस्कृतिवैशिष्ट्याच्या अध्ययनांत डॉ. मुजुमदार त्या लोकांच्या एका गीतामुळेच, समाजाने स्वीकृत केलेल्या व परिवर्तन काळांत त्यांच्या संस्कृतीला मूल प्रेरणा देणाऱ्या चरम मूल्यापर्यंत पोंचले. डॉ. एल्विन यांनी 'बैगा' जातीवरील अध्ययनांत, श्री. सावे यांनीं 'वार्ली' जातीवरील अध्ययनांत व प्रस्तुत लेखकाने 'कमार' लोकांवरील अध्ययनांत त्या त्या लोकांच्या गीतांच्या मदतीनेच त्यांच्या मानसिक प्रतिक्रिया व सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोण यांचें विश्लेषण केलेलें आहे. 'कोन्यक नागा' लोकांच्या संस्कृतींत त्यांच्या गीतांचें स्थान किती महत्त्वाचें आहे, हें डॉ. हैमंडॉर्फ यांनी आपल्या एका लेखांत पटवून दिलें आहे. जेथे भाषा लिपीच्या अभावीं मौलिकच राहाते व जेथे शिक्षणाची प्रत्यक्ष व

स्थायी अशी कोणतीच सोय नसते, त्या आदि-वासी संस्कृतींत लोकसाहित्य–विशेषत: लोकगीतें–शिक्षणसंस्थांचें कार्य पार पाडत असतात. छत्तीसगढांतील ‘ कमार ’ लोकांत अत्यंत निकटच्या आप्तांमध्यें शारीरिक संबंध न होऊं देण्याकरिता प्रत्यक्ष शिक्षणाची मुळीच आवश्यकता नसते. एका गीतांत पिता पुत्रीशीं संबंध ठेवून तिला पत्नी म्हणून ग्रहण करतो ! याचा परिणाम म्हणून तलाव नदींतून मासे सांपडत नाहीत, वृष्टि होत नाही, शेती करणें अशक्य होतें, वनांतील कंद-मुळें व फळें देखील दुर्लभ होतात ! एका दुसऱ्या गीतांत बहीण–भाऊ वैषयिक संबंध ठेवतात. त्याबद्दल तीं समाजांकडून बहिष्कृत केलीं जातात व प्रसूतीच्या वेळीं त्या मुलीला दारुण असह्य वेदना होऊं लागतात ! वरील गीतांचा शिक्षणात्मक अभिप्राय स्पष्ट आहे. प्राथमिक संस्कृतींत लोक-गीतें केवळ सामुहिक किंवा व्यक्तिगत अनुभूतीची अभिव्यक्ति किंवा केवळ मनोरंजनाचें साधन नसून तीं शिक्षणाच्या माध्यमाचें देखील काम करीत असतात; व जातीचा धर्म, आचारविचार, प्रथा व संस्कृति यांच्या भूत व वर्तमानकाळांत सामंजस्य राखून भविष्यकाळाकरिता देखील त्यांच्या परंपरा टिकवून धरण्याची जबाबदारी घेतात.

(३)

आजपर्यंत सुशिक्षित समाजाने लोकगीतांची जवळ जवळ उपेक्षाच केली. जेव्हा त्यांच्याकडे साहित्यिक आकृष्ट झाले, तेव्हा देखील त्यांनी बरेंच दिवसपर्यंत प्रकाशनापूर्वी विद्वत्तापूर्ण साफसफाई करून लोकगीतांना पाहिल्यापेक्षा भिन्न स्वरूपांत लोकांच्या दृष्टीसमोर ठेवण्याचें धोरण ठेवलें ! या प्रवृत्तीचा परिणाम असा झाला की, काव्य व शास्त्र यांच्या दृष्टीनें अनेक सुंदर गीतांची हत्या झाली व आता पुन्हा तीं लोकगीतें मूळस्वरूपांत मिळवायचे कोणतेंच साधन उपलब्ध नाही ! सुदैवाने लौकरच या क्षेत्रांत ज्यांना लोकगीतांबद्दल खरें प्रेम होतें व आपल्या ध्येयाकरिता संकटें सहन करायला देखील जे तयार होते, अशा कांही अभ्यासू वृत्तीच्या लोकांनी प्रवेश केला. पंडित रामनरेश त्रिपाटींनी अत्यंत परिश्रमपूर्वक संयुक्तप्रांतांतील व हिंदुस्थानांतील इतर भागांमधील लोकगीतांचा बहुमूल्य संग्रह तयार करून या क्षेत्रांतील कार्य-कर्त्यांना मार्ग दाखवला. ‘ देवेंद्र सत्यार्थी ’ व ‘ लोकगीतें ’ तर आज जवळ जवळ समानार्थी शब्दच झाले आहेत, असें म्हणायला हरकत नाही ! देशांतील निरनिराळ्या प्रांतांतून फिरून त्यांनी केलेलें लोकगीतांचें संकलन हिंदुस्थानच्या संस्कृतीचें भूषण आहे श्री. सूर्यकरण पारीक, नरोत्तमदास स्वामी व जगदीशसिंह गहलोत यांनी गीतें संगृहित केली आहेत. मैथिली लोकगी-तांचा एक आदर्श संग्रह तयार करण्याचें काम श्री. रामइकबालसिंग राकेश यांनीं केले आहे. स्वर्गवासी मेघाणींना गुजरातमधील लोकगीतांचा बहुमुल्य संग्रह तयार केला आहे. हिंदुस्थानांतील इतर प्रांतांतून देखील अनेक उल्लेखनीय संग्रह झालेले आहेत. “ मैमनसिंह गितिका ” यामध्यें मैमनसिंग जिल्ह्याचीं गीतें संगृहित केलेलीं आहेत. प्रा. सत्येंद्र यांनी व्रजभाषेच्या गीतांचा संग्रह तयार केला आहे. श्री. शामराव हिवाळे व वेरि-यर एल्विन यांनीं प्रकाशित केलेले दोन मध्य-भारतीय आदिवासी जातींतील लोकगीतांचे संग्रह अत्यंत आकर्षक आहेत. श्री. आर्चर यांनी छोटा नागपूर व बिहार यांमधील आदिवासी लोकांच्या गीतांचे सुंदर संग्रह प्रकाशित केले आहेत. छत्तीसगढी लोकगीतांचे संग्रह वेरियर एल्विन यांनीं व प्रस्तुत लेखकाने वेगवेगळे प्रकाशित केले आहेत. कुमारी दुर्गा भागवत यांनीं सातपुड्यांतील गीतें एका विस्तृत लेखांत प्रसिद्ध केलीं आहेत; व कुमारी अनसूया भागवत यांनी आपल्या लेखांत महाराष्ट्रांतील ओव्यांवर विस्तारपूर्वक लिहिलेलें आहे. श्री. एम् एन्. श्रीनिवास यांनी आपल्या लिखाणांत तामील गीतांबद्दल माहिती दिली आहे. यां व्यतिरिक्त डॉ. प्रधान, डॉ. सौ. चंद्रकला हाटे, कु. कृष्णा उज्ञावरकर, डॉ. खानापूरकर, श्री. भंडारी वगैरेंनी देखील भिन्न भिन्न प्रदेशांतील स्फुट गीतांचें सकलन केलेलें आहे. विदर्भ व कोंकण यांमधील लोकगीतांचे संग्रह देखील पुस्तकरूपाने उपलब्ध

झाले आहेत. वेळोवेळीं मासिकपत्रांत लोकगीतांवर लेख प्रकाशित होतच असतात.

भारतीय जागृतीच्या पाठीमागे ज्या शक्ति होत्या, त्यांना लोकगीतांचें खरें महत्त्व काय आहे, हें समजून घेण्याचा कधीं प्रयत्नच केला नाहीं ! रशियांतील नवीन सांस्कृतिक जागृतीमध्यें तेथील साधारण लोकांच्या स्वयंस्फूर्त लोकगीतांचा बराच हात होता व म्हणूनच तेथील सध्याच्या सांस्कृतिक पार्श्वभूमींत लोकगीतांचा प्रभाव स्पष्ट दिसून येतो.

आपल्याला आपल्या साहित्यिक, तसेंच, सांस्कृतिक दृष्टिकोनांत व मूल्यांत परिवर्तन घडवून आणावयाचें आहे. भारतीय जनसंस्कृतीच्या परंपरेच्या पार्श्वभूमीवर एक नवें साहित्य व संस्कृति निर्माण करावयाची आहे. याकरिता लोकसाहित्याचा पुनरुद्धार करणें अत्यंत आवश्यक आहे. लोकगीतें आपल्या साहित्याला—विशेषतः काव्याला—एक नवी व बलवान् प्रेरणा देतील, एवढेंच नव्हे, तर ते आपल्याला ज्याच्या अभावीं आपण जीवंत भारताचा जीवंत इतिहास लिहिण्यास असमर्थ आहोंत, तो नवा सांस्कृतिक दृष्टिकोन देखील देतील.

• • •

त्याचा अबोल शेजारी

'शांताराम,' एम्. ए.

● 'त्याचा अबोल शेजारी' एक दिवस बोलका कां झाला, याचें उत्तर या सुंदर शब्दचित्रांत नागपुरचे प्रसिद्ध तरुण लेखक 'शांताराम' यांनी दिलें आहे.

• • •

"अरे, बाबा, शेजाऱ्याने स्वतःला गोळी घातली काय, किंवा असाच कांहीं विपरीत प्रकार केला काय, आपल्याला कळायचं देखील नाही मुंबईत. आणि कळलंच तरी तिकडे लक्ष द्यायची सवड नसते; पुष्कळदा प्रवृत्तीहि नसते. "— मी.

"मुंबईत माणसं राहतात की पशू ?" तो.

"राहतात माणसंच, पण तीं तुझ्यासारखीं फाजील चौकस नसतात. जीवनकलहाच्या तीव्रतेमुळे सगळ्या वागण्याबोलण्यांत देवघेवीचा एक विचित्र औपचारिकपणा भरलेला असतो. अवास्तव जिव्हाळा व गैरवाजवी मार्दव चुकून सांपडायचं नाही. "— मी.

"असं, मुंबईच्या समाजाची तुझी खास जानपछान दिसते. पण एक विसरलास ?"—तो.

"काय तें ?"— मी.

"माझ्या प्रश्नाचा तुझ्या या पांडित्याशीं बिलकुल संबंध नाही. तुला जर आपल्या विश्लेषण बुद्धीचं प्रदर्शन करायचं असेल, तर माझ्या कॉलेजांत विद्यार्थ्यांसमोर तुझं एक व्याख्यान ठरवायला मी तयार आहे. मी तुला साधा प्रश्न विचारला की, माझा शेजारी असा अबोल कां ? आणि, तूं मला सांगतोयस् की, मुंबईतले लोक शेजाऱ्याला न कळत डोक्यांत गोळी घालून घेतात; नाही तर, कांही विपरीत प्रकार तरी करतात "— तो.

"छान. माझ्या बोलण्याचा अर्थ तुला चांगला कळलेला दिसतो. कॉलेजातला प्राध्यापक आहेस तूं "-मी.

"हें बघ, मी जें कांही आहे, तें आहेच. माझ्या प्रश्नाला सरळ उत्तर द्यायचं असेल, तर तें दे. उगीच उखाळ्या-पाखाळ्या काढणं मला जमत नाही. " तो.

" मला तरी कुठं जमतं तें ? तुझ्या प्रश्नाचं उत्तर द्यायचाच तर मी प्रयत्न करीत होतों. असल्या अबोल माणसाच्या वैयक्तिक प्रश्नाची चर्चा करण्याऐवजी अशा मनोवृत्तीचा वर्ग कां वाढत आहे, हें मी तुला सांगत होतों. मुंबईसारख्या मोठ्या शहरीं असलेली विकट परिस्थिती आता लहान शहरांतहि निर्माण झाली आहे. दैनंदिन काळजींचं ओझं सारखं वाढत आहे. अवांतर गप्पागोष्टी करण्याची वृत्ति दिवसेंदिवस पिचत आहे, हा सांगण्याचा मुद्दा. पण तूं ऐकशील तर ना ? तुला पटेल असं एकच कारण दिसतं बुवा. "—मी.

" कोणतं ? "—तो.

" तुझ्या शेजाऱ्याच्या मातोश्रीने टवटवीत फुललेल्या फुलांच्या ऐवजीं अर्धोन्मीलित कळ्या वाहिल्या असतील कदाचित् देवाला—" मीं.

'हें कारण पटलं. तें शोधून काढणाऱ्या डोक्याचा तल्लखपणाहि पटला. बरं तर येतों मी ! "—तो.

" आता जातोस तर जा. पुन्हा येशीलच बहुतेक "—मी.

माझा मित्र समजतो तसा त्याचा शेजारी लोकाविलक्षण नाही. अत्यंत सामान्य अशा माणसांतला तो एक आहे. कुठल्याशा सरकारी खात्यांत दहा वर्षांहून अधिक काळ तो सचोटीने कारकुनी करीत आहे. पंधरा वर्षं झालीं संसाराचा गाडा तो ओढीत आहे. त्याच्या आयुष्यांत खदखदून हसविणारीं सुखं किंवा ढळढळा रडविणारीं दु:खं विशेषशीं आलीं नाहीत. सकाळीं उठावं, बारीकसारीक बाजार करावा, त्यानंतर स्नानपूजा, दहाला आपली सायकल घ्यावी, (पंधरा वर्षांहून अधिक काळ ती त्याची सेवा करीत आहे) कचेरींतल्या कामाचा गठ्ठा सायकलच्या दांड्याला बांधावा आणि कचेरींत जावं, पांचपर्यंत काम करावं—कधीं थोडसं अधिक—परतावं, भाजीबाजार, जेवण, घरीं आणलेलं सरकारी काम आणि नंतर आराम करावा. वर्षानुवर्षं त्याचा हा कार्यक्रम चालू आहे. या दहापंधरा वर्षांत समाजांत स्थित्यंतरं झालीं, परिस्थितींत परिवर्तन घडलं, क्रांति पूर्ण झाली असं लोक म्हणतात. त्याने एका शब्दानेहि ही गोष्ट अमान्य केली नाही. त्याच्यापुरतं बोलायचं तर तो स्वप्नांतल्या घटनांसारखा त्यांच्यापासून दूर राहिला. जीवनांत जें कर्म त्याच्या वाटेला आलं, तें तो निमूटपणें पार पाडीत आहे. विधिलिखित पूर्ण करण्यांत निसर्ग आणि मानव क्वचितच इतक्या एकोप्याने वागत असतील.

काय विचित्र आहे या माणसांत ? कामाशिवाय बोलणं त्याच्या अंगी नाही; नसेल. त्यासाठी माझ्या मित्राने जिवाचा एवढा त्रागा का करावा !

जीवनाच्या सुखकर श्रेणींत जन्मलेला माझा प्राध्यापक मित्र अगदी तरुण आहे. कालिदास, शेक्सपीअर, बाण, रूसो, मार्क्स असल्या थोर लोकांच्या संगतींत त्याचा काळ जातो. तारुण्याशी, सौंदर्याशी, रसिकतेशी, विद्वत्तेशी, कलेशी त्याची पावलोपावलीं भेट घडते. तो खूप बोलतो. त्याने सारखं बोलत रहावं, असंच ऐकणाऱ्यांना वाटतं. व्याख्यानवजा बोलण्यांत तो कुशल आहे. त्याचा तो धंदाच आहे. स्वत: बोलावं आणि दुसऱ्यांना बोलायला लावावं, हा त्याचा आवडता छंद. माणूस म्हणजे 'बोलका प्राणी' अशी त्याची श्रद्धा आहे. बोलण्याची कला ही निसर्गाची देणगी आहे आणि ती वाया जातां कामा नये, अशी त्याची भावना. 'निसर्गाची देणगी' हा त्याचा आवडता शब्दप्रयोग आहे. 'ईश्वर' या शब्दांत मानवाच्या असमर्थतेची कबूली आहे, असं त्याचं मत आहे.

अशीं हीं दोन माणसं एकाच वाड्यांत बिऱ्हाडकरू म्हणून राहतात. तशी कांही कुत्र्यामांजराची जोडी नव्हे. ती तशी असती, तर माझ्या मित्राला आनंदच झाला असता. माझ्या मित्राची बोलकी वृत्ति सात्त्विक असली, तरी आक्रमक आहे. आपल्या सारखंच लोकांनी हसावं-बोलावं, हा त्याचा सतत प्रयत्न. असल्या प्रयत्नांत त्याला यश देखील मिळत गेलं आहे. माझ्यासारख्या जातीचा अबोल प्राणी बोलका होण्याला कारणीभूत तोच 'मूकं करोति वाचालम्' हें वर्णन त्याला शोभतं. आणि म्हणूनच आपल्या लाघवी बोलण्याचा आपल्या शेजाऱ्याच्या स्वभावावर एवढासा देखील परिणाम

होऊं नये, या पराभवाचा माझ्या मित्राला अत्यंत विषाद वाटत आला आहे.

माझ्या मित्राच्या शेजाऱ्याचा स्वभाव तरी केवढा दुर्धर. शेजार-धर्माचे सगळे उपचार त्याने कसोशीने पाळले आहेत. माझ्या मित्राला त्याने चारपांचदा जेवायला सुद्धा बोलाविलेलं आहे. पण इतकं असून गरजेशिवाय एक अक्षर तो कधी अधिक बोलला नाही. त्याने अमुकच विषयावर बोलावं, असा माझ्या मित्राचा आग्रह नाही. त्याचं काय ? तो वाटेल त्या विषयावर सारखाच सहजतेने बोलूं शकतो. गांधीजी आणि जीना आपापली बाजू जितक्या स्पष्टपणे मांडूं शकणार नाहीत, तेवढ्या स्पष्टपणें हा कदाचित् मांडून दाखवील. राजकारण, शास्त्र, काव्य, कला—काय वाटेल तो विषय असो- माझ्या मित्राची रसवंती नेहमी दुथडी वाहत असते. पण असल्या उच्च विषयांवरच बोललं पाहिजे, असा कांही त्याचा कटाक्ष नाही. हवं तर आपल्या शेजाऱ्याने कचेरींतल्या भानगडींबद्दल बोलावं, पण मोकळं बोलावं, हीच त्याची इच्छा. तेंहि नसेल जमत, तर कोळशाचे वाढलेले भाव, गहूसाखरेचा वाढता तुटवडा—हे विषय त्याने निवडले, तरी माझ्या मित्राची हरकत नव्हती. पण त्याचा शेजारी अगदीच शब्दभीरु. त्याचा परिणाम असा झाला की, माझ्या मित्राच्या एरवीं सात्त्विक असलेल्या स्वभावांत सैतान शिरला. आपल्या शेजाऱ्याने आपल्या मुलांना चांगला तोंडभर दम भरावा किंवा बायकोशी तावातावांत गरमागरम बाचाबाची करावी; त्या निमित्ताने तरी त्याचं अघळपघळ बोलणं ऐकूं येईल, असं माझ्या मित्राला वाटूं लागलं.

माझ्या मित्राचा शेजारी अबोल असला काय, बोलका असला काय, मला काय त्याचं ? एरवीं तिकडे मी लक्ष दिलं नसतं. पण जसा तो शेजारी कांही केल्या अघळपघळ बोलत नाही, तसा माझा मित्र त्याच्या अबोलपणाची चर्चा केल्याशिवाय राहत नाही. या निष्फळ चर्चेचा मला उबग आला व माझ्या मित्राने हा विषय बंद करावा, असं मी त्याला कितीदा सुचविलं. त्याचा हा नाद सुटत नाही, हें पाहून अगदी तोडून बोलून त्याचा विरस केला. म्हटलं, येईल राग तर येऊं दे; कांही दिवसांनी जाईल निवून. माझ्या उडवाउडवीच्या उत्तराने चिडून माझा मित्र निघून गेला.

तात्पुरत्या खटक्यानंतर पुन्हा तो माझ्याकडे येईल, ही खात्री होती मला. तसा तो आलाच. पुन्हा तोच प्रकार होऊं नये, म्हणून माझ्या दारांत पाऊल ठेवतांच मी त्याला बजावलं, "हें बघ, गड्या, नेहमीचा तो विषय काढून दोघांचींहि तोंडं आंबट करायची नसतील, तर तुझा तो आवडता विषय काढूं नकोस. नाही तर, पुन्हा तुझा तो प्रश्न हजरच— 'माझा शेजारी मन-मोकळं बोलत का नाही !'

माझ्या मित्राने तावडतोब उत्तर दिलं, "राजा, तो प्रश्न विचारायचं कांही कारणच नाही. माझा शेजारी परवा माझ्याशी अचानक बोलला—चांगलं अघळपघळ बोलला. माझ्या आश्चर्याला पारावर उरला नाही. मी उद्गारलों, "म्हणजे चमत्कारच म्हणायचा."

"अगदी चमत्कार, त्याचं तें अघळपघळ बोलणं आणि त्याच्या बोलण्याचा मुख्य विषय. सगळा चमत्कारिक प्रकार आहे !"—तो.

"सांग; सांग लवकर सांग."—मी.

माझा मित्र सांगूं लागला, "परवाची गोष्ट. संध्याकाळचं जेवण आटोपून मी एक कादंबरी वाचीत पडलों होतों. तोंच 'काय, प्रोफेसर, झोपलांत का ? या ना'—अशी माझ्या शेजाऱ्याची हाक अवचित ऐकूं आली. झोपेंतून उठून डोळे चोळावे तशी माझ्या मनाची अवस्था झाली. तोंच लगोलग दुसरी हाक तयारच—'या ना, पानबिन घ्या.' आश्चर्य करीत मी माझ्या शेजाऱ्याच्या खोलींत प्रवेश केला. त्याने अगदी झोकांत 'घ्या' म्हणत विड्याचं तबक माझ्या पुढे धरलं. पानाबरोबर 'तंबाखू ?' म्हणत त्याने जर्द्याची पुडी नुक्तीच बाजारांतून आणलेली दिसली. चूपचाप त्याच्याकडे नुसतं बघत राहणं बरं नव्हे, म्हणून मीं विचारलं 'जेवण झालं वाटतं ?" त्याने तावडतोब उत्तर दिलं, 'जेवण

होईऽल हो. जेवण काय कुठं पळणार आहे? आत्ता तर कचेरींतून आलों ' उशीर का झाला, या प्रश्नाबरोबर तो हंसत हंसत कारण सांगू लागला..."

संध्याकाळीं घरीं यायला तो कचेरी बाहेर पडला. सायकलच्या चाकांत हवा नाही, हें त्याला दिसलं. तो कचेरीच्या आवाराबाहेर आला. सायकल दुरुस्त करणारं फिरतं दुकान रोजच्याप्रमाणे त्याला जवळपास कुठं दिसेना. दिवसभर काम करून थकलेल्या माणसाच्या मार्गांत हे नवीन विघ्न–तो विचारा त्रासून गेला. आपली खडखडणारी सायकल घेऊन तो चालूं लागला. त्याच्या डोळ्यांदेखत किती तरी लोक बसमध्ये शिरले व भराभर निघून गेले. तो मात्र रखडत रखडत चालूं लागला. दुसरी एक बस भरकन् त्याच्या समोरून निघून गेली. साहेब लोकांच्या मोटारगाड्या त्याच्या डोळ्यांसमोरून झरझर निघून जात होत्या. मध्यमश्रेणीच्या लोकांना घेऊन भराभर रिक्शा, टांगे निघून चालले होते. ' बाजूला व्हा; रस्ता सोडा, काय डोळे आहेत की नाही ? ' या आणि अशाच आरोळ्यांनी रिक्शावाले वातावरण दणाणून सोडत होते. तो मात्र त्रासून जिकिरीला येऊन हळूहळू आपला मार्ग क्रमीत होता. आधीच त्रस्त झालेल्या त्याच्या मनाला त्या आरोळ्या बिलकूल सहन होत नव्हत्या. तो किंचित् पुढे आला, तोंच रस्त्याच्या कडेला असलेल्या बंगल्यांत चाललेला बॅडमिंटनचा खेळ त्याच्या दृष्टीला पडला. त्याला विषाद वाटला. तो जरा पुढे येतांच क्रीडांगणाकडे हसत–खिदळत चाललेल्या विद्यार्थी–विद्यार्थीनींचा मेळावा त्याने पाहिला. त्याचं मन कुठं तरी दूर दूर भटकूं लागलं. आणखी किंचित् पुढे येतांच महाराजबागेंत जमलेले स्त्रीपुरुषांचे थवे त्याने पाहिले. चालून चालून आपण थकून गेलों आहोंत, अशी तीव्र जाणीव झाली. त्याच्या बाजूने लोकांची रीघ परस्पर दिशेला चालली होती, ती किती आनंदांत, बेफिकीरींत, उत्साहांत. हातात असलेलं सायकलीचं धूड फेकून द्यावं, असं त्याला वाटूं लागलं.

तो बडाच्या चौकांत आला–झोरेंत चालावं त्याप्रमाणे. त्याच अवस्थेंत त्याने सायकलच्या दुकानांत आपली सायकल फेकली. ती केव्हा तयार होईल, किती पैसे लागतील, कांही एक विचारलं नाही. चौकांतल्या एका दुकानांत ग्रामोफोनच्या तबकड्या लागल्या होत्या. सगळा चौक गुंजत होता. गर्दीच्या लाटा सारख्या उठत होत्या. पुरुष, स्त्रिया, मुलं, मुली, वृद्ध, तरुण, तरुणी, किती लोक. किती तऱ्हेचे पोषाख. किती तऱ्हेचे चेहरे. किती रंग, किती ढंग. किती तऱ्हा. किती नखरे. किती प्रकारचे आवाज–हसणं, खिदळणं, किंकाळणं. त्या मुक्त समुदायाकडे त्याने अतिमिषपणें पाहिलं–तो सारखा पाहतच राहिला. तो त्या गर्दीत मिळून गेला, एकरूप होऊन गेला. जणू त्याने आपलं पार्थिव अस्तित्व त्या जनसमुद्रांत बुडवून टाकलं. आता त्याला होत असलेली स्वतःची जाणीव सूक्ष्म होती, हवेसारखी होती.

त्याच्याच मागे सडकेच्या कडेला असलेल्या पानांच्या दुकानांत लोक पान विकत घेत होते. त्यालाहि लहर आली. त्याने एक विडा घेतला. इतक्यांत कुणा तरी पट्टीच्या खाणाऱ्याने एकदम दोन विडे व जर्दा मागितला. त्याने अर्धा डझन विडे व जर्द्याची एक पुडी मागितली.

सडकेच्या काठाशी येऊन, हवेंत गुंजणाऱ्या कोलाहलाचा संगीतासारखा आस्वाद घेत, आरामांत विडा चघळत, सुखाच्या संवेदनेने सुस्त होत तो गर्दीशी एकरूप होऊन गेला.

कांही वेळानंतर शहराकडे जाणारी एक बस त्याच्या समोरच उभी राहिली. त्याच्या शेजारचे लोक बस पकडण्यासाठी धावले. त्याचेहि पाय त्याच वेगांत तिकडे वळले. त्याला जागा मिळाली नाही. गर्दीत एक जोराचा हिसडा मात्र मिळाला. त्याच्या जड शरीराची त्याला पूर्ववत् आठवण झाली. तो परत आपल्या जागेवर येऊन स्थिर झाला. त्याची दुचाकी एव्हाना दुरुस्त झाली होती. पण आज जायचं तें बसनेच असा त्याचा निर्धार झाला होता.

अनुक्रमणिका

दुसरी एक बस आली. लोकांच्या झुंडींत तो पुन्हा धावला. पण मघासारखच पुन्हा त्याला धक्का खाऊन परतावं लागलं.

आता त्यानें निश्चयच केला, नुसता धक्का मिळो की कंबरडं तुटो, बसमध्ये जागा मिळवायचीच. त्याने सोयींची जागा पकडली. किल्ला सर करतांना शिपायांनी मोर्च्यांची जागा पकडावी, त्याप्रमाणे, आपल्या जागेवर पाय रोवून तो उभा राहिला. त्याला नको असलेली एखादी जरी बस चौकांत आली तरी त्याच्या हृदयाची जोराने हालचाल होऊं लागली. महत्त्वाकांक्षा जागृत झाल्याचा अनुभव त्याला होऊं लागला. असला अनुभव त्याला आज कित्येक वर्षांत मिळाला नव्हता. बस–एक सामुदायिक वाहन. पण आज तिच्याचमुळे त्याचं हृदय हेलकावत होतं, तरंगत होतं. त्याच्या साध्याचं तें एक प्रतीक होतं, त्याच्या प्रयत्नशीलतेची, विजीगिषेची ती एक परीक्षा होती.

पंधरा वर्षांची त्याची सोबतीण–त्याची सायकल त्याला आज नको होती. ती त्याच्या आठवणींत नव्हती. खिजगणतींत नव्हती.

कचेरींतून नेहमी तातडीने घरीं येणारा तो आज बससाठी वाटेल तितका वेळ थांबायला तयार होता. एरवीं तो वेळेचा गुलाम होता. आज आपण वेळेचे मालक आहोंत ही अननुभूत भावना त्याला तेंव्हा झाली.

नऊ वाजतां त्याला हवी असलेली बस आली. तो धावला. या वेळींहि त्याला धक्का बसला. पण पूर्वीच्या धक्क्यासारखा हाडं खुसळणारा नव्हता. दरवाजांत शिरतां शिरतां एका नाजूक जिवाचा कोवळा धक्का त्याला लागला. एका गोड संवेदनेची पुनःस्मृति त्याच्या मनांत खेळून गेली. तो बसमध्ये शिरला. जागा बरीच होती. त्याला खिडकीच्या शेजारी ऐसपैस जागा मिळाली. लाकडांच्या फळ्यांऐवजी त्या बसमध्यें गाद्या होत्या. तिचा तांबडा रंग कोरा करकरीत होता. कायाकल्पाच्या अवस्थेंतून आपण जात आहोंत, असं त्याला वाटत होतं. ' I am the monarch of all (that) I survey ' ही लहानपणीं वाचलेली ओळ त्याच्या मनांत आली. आपला चेहरा समाधानाने प्रसन्न झाला आहे, आरसा बघितला पाहिजे, म्हणून खिडकीवाटे तो बाहेर पाहत बसला. रस्त्यावरचीं दुकानें, घरं, विजेचे दिवे त्याच्या दृष्टिसमोरून झरझरा सरकत होते. त्याला वाटत होतं, प्रत्येक वस्तू मुद्दाम आपल्यासमोर येऊन म्हणत आहे–' मला बघा. माझं सौंदर्य पाहा. ' साध्या वस्तूंना नवीन अर्थ आला होता. नित्याच्या गोष्टींत अद्‌भुतता आणि सौंदर्य भरलेलं होतं.

भारलेल्या अवस्थेंत तो घरीं आला. आपल्या बोलक्या शेजाऱ्याला पानतंबाखू देत संध्याकाळचा सगळा अनुभव तो रंगांत येऊन सांगूं लागला. माझ्या मित्राला त्याच्या त्या विचित्र अनुभवाचा अर्थ कळत नव्हता. तो ' आ ' वासून नुसतं ऐकत राहिला. त्या अनुभवांत सांगण्यासारखं किंवा ऐकण्यासारखं कांही आहे का, या प्रश्नाने माझा मित्र स्वतःशीच गोंधळून गेला. त्याचा शेजारी मात्र चविष्टपणें भराभर सगळं बोलत राहिला ' ती नवीन बस. तिचा कोराकरकरीत तांबडा रंग, तिचा आकार, तिचा वेग, त्या मऊमऊ गाद्या, तो वेग…' त्याची धर्मपत्नी-अनेक वर्षांची त्याची जीवन–सखी दाराआडून सगळं ऐकत होती, पाहात होती. तिलाहि आश्चर्य वाटत होतं. जेवणासाठी ती किती वेळाची पतीची वाट पाहात होती. पण तिने एका अक्षराने उशीर झाल्याची त्याला सूचना दिली नाही. ती पतीचं तें अघळपघळ बोलणं नुसतं ऐकत होती. बोलतांना आपल्या पतीची इतकी तंद्री लागलेली ती सुद्धा अनेक वर्षांनी पाहात होती. ती अगदी चुपचाप, हळुवारपणें उभी होती. काय झालं, कोण जाणे, पाहतां पाहतां तिच्या डोळ्यांत चटकन् पाणी आलं. पण तिच्या चेहऱ्यावर मात्र आनंदाची व कुतूहलाची विचित्र मिश्र भावना पसरली होती.

" परवाच्या त्या अजब प्रकारानंतर मनात म्हटलं, ' येन केन प्रकारेण ' का होईना, आपल्या

शेजाऱ्याचा स्वभाव बदलला. म्हणून काल आणि आज सारखा प्रयत्न केला मीं त्याच्याशीं बोलायचा. पण कांहीं नाहीं, पुन्हा तेंच 'येरे माझ्या मागल्या.' पुन्हा तोच थंडपणा, तोच शांतपणा, तोच निःशब्दपणा. जणू, एखादं महान् वादळ येऊन गेलं; कांहीं काळ हालचाल घडली; पुन्हा पूर्वीसारखं शांत शांत वातावरण.' उन्मनी आली अन् गेली. आहे कीं नाहीं चमत्कार? काय वाटतं तुला?"—माझा मित्र.

मला जें कांहीं वाटलं, तें माझ्या शब्दांना पूर्णपणें सांगतां यायचं नाहीं, या जाणिवेने मी नुसता निःशब्द राहिलों!

• • •

जहाजावरील कोळसेवाला. (एकांकिका)

मूळ लेखक—हॅरॉल्ड ब्रिग् हाऊस.
अनुवादक—द. चिं. सोमण.

* * *

● [हॅरॉल्ड ब्रिग् हाऊस ह्याच्या 'The Laughing Mind,' 'The Ghosts of Windsor Park,' इत्यादि इतरहि एकांकिका प्रसिद्ध आहेत. टॅल् बॉट, एफ्. ओ. फ्रॅन्सिस्, क्लिफोर्ड बॅक्स् इत्यादि एकांकिका-लेखकांत ब्रिग् हाऊसला अवश्य मानाचें स्थान आहे. गाल्सवर्दीप्रमाणें तो सत्यसृष्टीकडे टक लावून पाहूं शकतो. तद्वत्, बॅरी वा बॅक्स् ह्यांच्याप्रमाणें स्वप्नें अथवा कल्पना ह्यांच्यापासूनहि स्फूर्ति घेतल्याशिवाय रहात नाहीं. त्याच्या 'The oracles of Apollo' किंवा 'The Prince who was a Piper' ह्या एकांकिका दुसऱ्या प्रकारांत मोडतील, तर पुढील एकांकिका पहिल्या वर्गांत निर्दोष म्हणून गणली जाईल.

पात्रें—

१ आर्ची लेटन	२ पीटर हॉवर्ड
३ कॅप्टन	४ जहाजावरील कोळसेवाला
५ मिसेस् लेटन	६ शैला पॅलॉन्ट

स्थळ—

हिंदुस्थानाहून इंग्लंडकडे जाणाऱ्या एका जहाजावरील कप्तानची खोली. खोलीच्या जमिनीवर एक रग टाकलेला असून एका भिंतीजवळ एक रुंद डेस्क आहे; त्यावर एक काचेचा पाणी पिण्याचा ग्लास असून डेस्कच्या वरच्या बाजूला भिंतीतील स्टँडवर पाण्याचें एक मोठें भांडें बसविलेलें आहे. डेस्कच्या समोर फिरत्या बैठकीची एक खुर्ची आहे आणि अगदी तशीच दुसरीहि एक खुर्ची डेस्कच्या उजव्या बाजूलाहि आहे. खोलींतील दुसऱ्या दोन अरुंद बांकासारख्या लांब बैठकी दुसऱ्या भिंतीला कायम जोडलेल्या आहेत. भिंतींत एक दरवाजाहि अवश्य आहेच. डेस्कवरील पोर्टहोल्स्मधून सूर्यप्रकाश आंत येत आहे आणि भिंतीवरील घड्याळांत दहाचा सुमार झालेला दिसत आहे. हे दहा सकाळचे!—

—पडदा वर जातो तेव्हा कप्तानाच्या खोलींत म्हणजे स्टेजवर कुणीच नसते. भिंतींतील दरवाज्या वर दोन थापा मारल्याचा आवाज येतो व शैला पॅलॅन्ट बेधडक आत प्रवेश करते. तरुण वय व सुंदर रूप; मग आत्मविश्वासाने ती कप्तानाच्या खोलींत शिरली तर आश्चर्य कसलें त्यांत? बिचारा आर्ची रेल्टन तिच्यामागून आंत येतो तो मात्र, अगदीं दचकत! शैलाने त्याला जवळ जवळ आत ओढत आणले आहे, असेंच वाटायचें!—

शैला–छान! इथें तर कुणीच नाहीं!

[आर्ची परत जाण्याकरिता दरवाज्याकडे निघतो, पण शैला त्याचें मनगट धरून त्याला खोलीच्या मध्याकडे आणते]

आर्ची–जात नाही मी-पण उगाच शिरलों आपण कप्तानाच्या खोलींत! मला वाटतं......

शैला–का नाहीं-यायचं या खोलींत!

आर्ची–त्याचं एक साधं कारण असं की, जहाजावर कप्तानाच्या खोलींत कुणी जाऊं नये, अशा नोटिसा जिकडे तिकडे—

शैला–हंऽऽ! आपण ब्रिटीश लोक आहोंत, एका जहाजावर आहोंत व आमचा नेल्सन्हि कधीं कधीं वरीष्ठांचा हुकूम मानायचा नाहीं वगैरे वगैरे अनेक कारणें...

आर्ची—तुझं ठीक आहे—

शैला—आणि तुझं काय नाहीं? सांग.

आर्ची—तुझं ठीक म्हणजे असं की, कप्तान हा एक मनुष्यच आहे. पुरुष आहे तो! तूं एकदा त्याच्याकडे पाहून मोहक हसशील आणि तो तुला म्हणेल, 'बाईसाहेब, हे नियम आपल्या-करितां नाहीत, बाईसाहेब! आपण जहाजावर वाटेल तिकडे हिंडूं शकतां''— आणि मला मात्र त्याच्या बुटाच्या लाथा खाव्या लागतील. नाचतांना पुरेवाट होईल माझी! तसा मी नृत्य करूं शकतों, पण लाथा मिळाल्यावर मात्र मला नाहीं वाटत तितकासा चांगला नाचूं शकेन मी! समजलं, बाईसाहेब?

शैला—अरे, मी संरक्षण करीन ना तुझं!

आर्ची—पुरे कर तुझा हा विनोद-चल इथून-वा! हे काय चालवलं आहेस आतां?

शैला—(डेस्क समोरील खुर्चीकडे पहात गुडघे किंचित वाकवून नत होते) पूर्वी सिंहासनाला असा आदराने प्रणाम करीत! सिंहासन आहे हें!

आर्ची—(गंभीर मुद्रेने) शैला! पुरे कर हा पोरकटपणा! खरंच सिंहासन आहे तें! कप्तान हा या जहाजाचा राजा आहे, समजलीस?

शैला—(खुर्चीचें तोंड आपल्याकडे फिरवून घेते व आर्चीकडे बघत खुर्चीवर बसते.) मी सांगतें तुला, या कप्तानाला गोल्फ मुळींच खेळतां येत नाहीं!

आर्ची—गोल्फ?

शैला—हं, गोल्फ!

आर्ची—अस्सं! म्हणजे या कप्तानाची आणि तुझी पूर्वीची ओळख आहे म्हणायची!

शैला—मी कधी म्हटलं आमची ओळख आहे!

आर्ची—त्याला गोल्फ मुळींच खेळतां येत नाहीं, हें कसं कळलं मग तुला!

शैला—अरे, साधं तर्कशास्त्र आहे हें! बघ्रं ही खोली केवढीशी आहे ती, हिच्यांत हा कप्तान गोल्फची सवय कायम कसा ठेवणार? गोल्फला सतत खेळण्याचा अभ्यास असावा लागतो आणि ह्या खुराड्यांत ह्या जहाजाचे बादशहा कप्तान-साहेबच जेमतेम मावायचे, मग खोलींतल्या खोलींत गोल्फच्या शॉटस्चा अभ्यास काय करणार ते! अं?

आर्ची—(शैलाची कप्तानाशीं ओळख आहे असेंच समजून निर्धास्तपणें त्या अरुंद लांब बैठकी-पैकीं एकीवर विराजमान होतो.)– मला वाटतं गोल्फसाठीं तो नोकरी सोडणार असेल ही! तें जाऊं दे– सध्या एवढं निश्चित, की तूं मला इथे आणलस, मी तुला नको म्हणत होतो! जहाज मार्सेलिसला केव्हा पोहोचेल, हें जाणून घ्यायची उत्सुकता तुला आहे, मला नाहीं! शैला! खरं विचारशील, तर हा प्रवास कधींच संपूं नये असंच वाटतं मला— (तिच्याकडे प्रेमाने पाहतो)

शैला—मला नाहीं आवडत तुझी कल्पना!

आर्ची—खरं!

शैला—कपडेसुद्धा नाहीत जवळ भरपूर! रोज नवा पोशाख हवा मला!

आर्ची—शैला ! खरं उत्तर देशील एका प्रश्नाचं ?

शैला—उत्तर देण्यालायक प्रश्न असला तर—

आर्ची—चालेल ! तुला नाताळच्या रात्रीच्या अगोदर घरीं पोचायला हवं आहे, कारण नाताळच्या त्या नृत्यांत तुला भाग घ्यायचा आहे, होय ना ?

शैला—हं !

आर्ची—आता मला असं विचारायचं आहे की, तूं खरोखरच केवळ त्या नृत्यासाठी घरीं जायला इतकी उतावीळ झाली आहेस, का दुसरं कुणी तुझ्या आवडीचं मनुष्य तिथे भेटणार आहे तुला सांग--

शैला—तुझा संशय खरा आहे. त्याला केव्हा भेटेन, असं मला झालं आहे !

आर्ची—(स्वतःच्या भावना लपवीत, उठून उभा राहतो) म्हणजे मला आशेला जागा नाही म्हणायची !

शैला—कांहीहि म्हण, पण नाताळ म्हटला, म्हणजे मला त्याच्याजवळ असायलाच पाहिजे. अगदी पूर्ण पुराणमतवादी बनतें मी नाताळांत ! एडवर्डसाठी केलंच पाहिजे तें-

आर्ची—पुराणमतवादी ?

शैला—अगदी समजायला लागलं तेव्हापासून मी नाताळ एडवर्डबरोबर घालवीत आलें आहे व नाताळांतील त्याची प्रत्येक इच्छा, आज्ञा मानलेली आहे.

आर्ची—असं, म्हणजे एडवर्ड हा-

शैला—माझा बाप ! त्याचं फार प्रेम आहे माझ्यावर !

आर्ची—सुटलों मी ! शैला ! तुझ्या ह्या सुरेख मानेचें चुंबन घेतलंच पाहिजे मला ! (तो पुढे सरकतो, पण इतक्यांत दरवाजा उघडायला लागतो)– काय त्रास आहे !

[पीटर हॉवर्ड दरवाजा उघडून आंत येतो ह्याचें वय चाळीस आहे. तो व्यापारी आहे. हें त्याच्याकडे पाहिल्याबरोबर कळतें. एका गलेलट्ट चिरूटाचा तो मधून मधून आस्वाद घेत आहे. शैला व आर्ची ह्या दोघांना कप्तानाच्या खोलींत पाहून तो रागावतो. शैलासारख्या तरुण मुली आर्चीसारख्या तरुणांबरोबरच नृत्य करायला उत्सुक असतात, हें जहाजावर त्याच्या अनुभवास आलेलें असल्यामुळे त्याचा राग तितकासा निष्कारण नाही. दुसरंहि एक कारण आहेच त्याच्या रागाला !]

हॉवर्ड—त्रास झाला होय तुम्हांला ?- काय ? हें पहा, केवळ जिज्ञासा म्हणूनच विचारतों,– कप्तानाच्या खोलींत प्रियाराधन करायची परवानगी आपल्याला कप्तानाने लेखी दिली की, तोंडी ?

आर्ची–(अडखळत) आम्ही–आम्ही इथें आलों, तसेच आपणहि नाही कां परवानगी शिवाय आलांत ?

हॉवर्ड–कप्तानाने दहा वाजतां **मला** भेट देण्याचें कबूल केलें आहे. (भिंतीवरील घड्याळाकडे पाहतो) बरोबर आहे माझं घड्याळ ! आपल्याला कप्तानानें किती वाजतां बोलावलें आहे ?

[तो कप्तानाची वाट पहायला लागतो]

शैला—बरोबर आहे !

हॉवर्ड—बरोबर आहे ? काय बरोबर आहे ! आपलं रिस्ट वॉच ?

शैला—हं ! रिस्टवॉचच ! पहा तुम्हीच ! [त्याला रिस्टवॉच दाखविण्याकरिता त्याच्याकडे हात लांब करते.]

हॉवर्ड—किती सुंदर हात आहे तुमचा ! असं हाताच्या दिशेने तुमच्याकडे पाहिलें की, तुमचा गळा दिसतो. त्याचा डौलदार आकार फार आवडला मला ! (आतुरतेने) मी-मी—

[घुटमळतो]

आर्ची—' मी, मी ' काय ? काय करावसं वाटतं आहे तुम्हांला–(आर्चीच्या आवाजांत रागाची छटा आहे).

हॉवर्ड—हें पहा, तुम्ही दोघे जा बरं इथून ! मला कप्तानाशीं कांही फार महत्त्वाचें बोलायचं आहे. व्यापारी आहें मी !

आर्ची—(आर्चीच्या मनांतून त्या खोलींतून बाहेर पडायचें असतेंच.तो उठतो)चल,शैला!

शैला—(जागची मुळींच न हलतां) जहाजा-

वरचे शिष्टाचार विचारांत घेतां, मिस्टर हॉवर्ड, मला वाटतं कीं-हो, पण हॉवर्डच ना तुमचं नांव ?

हॉवर्ड—हॉवर्डच !

शैला—मिस्टर हॉवर्ड, मला असं वाटतं की, शिष्टाचाराची अपेक्षा करणाऱ्याचें वर्तन जसें असायला हवें तसें तुमचे नाही ! तेव्हा शिष्टाचार म्हणून इथून बाहेर जायला आपण आम्हांला सांगणं कांहीं विशेष योग्य नाही.

हॉवर्ड—सभ्यतेच्या नियमांची चांगलीच माहिती आहे म्हणायची आपल्याला ! साहजिकच आहे तें ! नाटक पहायला सापडतं प्रेक्षकांनाच ! शिष्टाचारापासून व्यक्ति जितकी अलिप्त, तितकी तिला शिष्टाचाराची माहिती अधिक !

आर्ची (रागाने)—मिस्टर हॉवर्ड !

हॉवर्ड—आपलं नांव ? मिस्टर आर्चिबाल्ड रेल्टन, मला वाटतं.

[सिगारेटची राख झटकून टाकतो.]

आर्ची—हो, आणि—

[कप्तान प्रवेश करतो. ह्याचें वय जवळ जवळ पन्नास असेल. चांगलाच जाडजूड, दणकट मनुष्य आहे हा.]

कप्तान (टोपी डेस्कवर काढून ठेवीत)— सुप्रभात !

[कप्तानच्या खुर्चीत बसलेली शैला उठून उभी राहते.]

कप्तान—आभारी आहे मी ! आपल्याला मी ... ?

हॉवर्ड—आपण मला दहा वाजतां भेटायची परवानगी दिलेली होती !

कप्तान—ही आपली मित्र मंडळी ?

हॉवर्ड—मी ह्यांना आणलं नाहीं इथे; मी आलों, तेव्हा हीं दोघं इथेच होतीं !

[शैला आणि कप्तान ह्यांची पूर्वीची ओळख नाहीं हें आर्चीला आता पूर्णपणें पटते]

कप्तान—खरं ?

आर्ची—आम्ही आपल्या परवानगीशिवाय खोलींत आलों, हें खरं आहे, पण—

कप्तान—पण काय ?

[कप्तान डेस्कपुढील खुर्चीवर त्यांच्याकडे पाठ करून बसतो व डेस्कचा खण उघडतो]

हॉवर्ड (शैलाकडे बघत)— जहाजावरील शिष्टाचारांबद्दल काय्सं सांगत होतां ना आपण मघाशीं ? पुन्हा सांगा तें !

आर्ची (कप्तानाजवळ उभा राहून आर्जवी आवाजानें) —मिस् वॅलॅन्टला नाताळच्या रात्रीं घरीं असायला हवंच आहे ! त्याची शक्यता विचारायला मीच आपल्या जबाबदारीवर तिला आपल्याकडे आणलं !

कप्तान (डेस्कमधून काढलेल्या एका जाड पुस्तकांत लिहित असतांना)— तुम्ही दुय्यम अधिकाऱ्याकडे चौकशी करा !

आर्ची—त्याची भेट घेतली आम्हीं ! तो निश्चित कांहीच सांगत नाहीं आणि इतर अधिकाऱ्यांना तर आमच्याशीं बोलायलाच वेळ नाहीं !

कप्तान (मान वर न करतांच)— आपल्याला खोलीबाहेर जायला सांगणं मला आवडत नाहीं !

(शैला डेस्कजवळच्या दुसऱ्या खुर्चीवर बसते)

शैला (कप्तानाकडे बघत)— सगळा दोष माझा आहे. तुमची व माझी पूर्वीची ओळख आहे, असा मीच मिस्टर रेल्टन त्यांचा ग्रह करून दिला व आग्रह करून त्यांना इथं आणलं !

कप्तान (खाली पुस्तकाकडे बघतच)— तुमची माझी ओळख नाही पण !

शैला—ओळख नाही, पण—

कप्तान—तुमचं वर्तन हें असभ्यपणा व उद्धटपणा ह्याचं निदर्शक—(मान वर करून शैलाकडे बघतो व पेन्सिल खाली ठेवतो)— तुम्ही जेवायला माझ्या टेबलावर का नसतां ?

शैला—जी जागा मला नेमून देण्यांत आली, तिथेच भोजन उरकते मी !

कप्तान—कुणीतरी नक्की घोडचूक केली !

शैला—आपली क्षमा मागतों मी !

कप्तान (खोट्या रागानें)—कप्तान ह्या नात्यानें सुंदर तरुणींबरोबर खाना घ्यायचा हक्क मला आहे, हें ठाऊक नाही तुम्हांला ?

शैला—तुम्ही-तुम्ही थट्टेने—

कप्तान—वास्तविक तुम्हांला हातकड्या घालायच्या, पण क्षमा करतों एकवेळ तुम्हांला ! (उठतो)—नाताळला तुम्हाला घरीं असलंच पाहिजे ! होय ना ? कुठे आहे घर आपलं ?

शैला—लिंसेस्टरशायर. मोटार येईल मला न्यायला.

[शैला उठून उभी राहते.]

कप्तान—आपण वेळेवर घरीं सहज पोहोचूं शकाल, असं मला वाटतं !

[कप्तान दरवाजाजवळ जाऊन तो उघडतो]

शैला—कप्तान ! आपले आभार मी कसे मानूं, सुचत नाही मला आणि जर मी—

आर्ची—जर आम्ही—

कप्तान—(कठोर आवाजांत) मिस्टर रेल्टन ! बरं आहे, एवढंच काम होतं आपल्याशीं—

आर्ची—सुप्रभात !

[आर्ची आणि शैला जातात. कप्तान दरवाजा पुन्हा बंद करून घेतो]

हॉवर्ड—चांगलीच उद्धट दुक्कल आहे ती, नाही ? (चिरुटांची पेटी पुढे करीत) घ्या हिंदुस्थानांतले नाहीत; हॅवाना आहेत !

कप्तान—आभार ! आता नको पण ! मिस् पॅलॉन्टला जें मी सांगितलं, त्यांतच तुमच्याहि प्रश्नाचं उत्तर तुम्हाला मिळालं असेल.

हॉवर्ड—परंतु मला अगदीं नक्की माहिती हवी आहे.

कप्तान—नक्की कसं सांगतां—

हॉवर्ड (त्या अरुंद बैठकीवर बसत)—नक्की सांगाल, तरच कांही—

कप्तान—असं ?

[कप्तान पुन्हां डेस्कपुढील खुर्चीवर हॉवर्डकडे तोंड करून बसतो]

हॉवर्ड—इंग्लंड बद्दल आपल्याला वाटणाऱ्या आपुलकीच्या दृष्टीने पहा या गोष्टीकडे ! एका महत्त्वाच्या कार्याकरिता मी हिंदुस्थानांत गेलों होतों. सगळा यूरोप आज व्यापारांत आपल्याशीं स्पर्धा करायला सज्ज आहे. मी मुद्दाम बोर्डाची सभा–तांतडीची सभा–लंडनमध्ये चोवीस तारखेला दुपारीं बोलावलेली आहे. नाताळच्या संध्याकाळीं त्यांना तसं माझी वाट पाहात ठेवायचं आणि अखेर मी अचूक अनुपस्थित राह्यचं; काय परिणाम होईल त्याचा, विचार करा ! कप्तान ! जायलाच पाहिजे मला तिथे वेळेवर ! कांही महत्त्वाचें निर्णय घ्यायचे आहेत आणि स्पर्धेत विजयी व्हायचं असेल तर प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे, हें ओळखलं पाहिजे ! चोवीस तारखेला दुपारीं मी लंडनमध्ये असूं शकेन, ह्याबद्दल आपण वचन दिलें पाहिजे मला !

कप्तान—जहाजांतून पाण्यांत उतरून जहाज हातांनी ढकलायला लागूं का मी, मिस्टर हॉवर्ड ?

हॉवर्ड—पण या जहाजाचें तिकीट मी जेव्हा काढलें, तेव्हा तशी हमी—

कप्तान—जहाज मार्सेलिसला कोणत्या दिवशीं नक्की जाईल, याचीच फक्त हमी—

हॉवर्ड—दोन दिवस अगदी संथ गतीने जहाज चालवून दोन दिवस तुम्ही व्यर्थ, फुकट—

कप्तान—व्यर्थ ?—फुकट ?—मिस्टर हॉवर्ड !!

हॉवर्ड—क्षमा मागतों मी !

कप्तान—शेकडो लोकांच्या प्राणांची जबाबदारी माझ्यावर आहे ! वादळांत, डोळे मिटून, जहाज घालणारा कप्तान अजून जन्माला यायचा आहे, मिस्टर हॉवर्ड ! अपरिहार्य तें करावंच लागतं ! प्रवासांत दोन दिवस मी व्यर्थ घालवले, ह्याची मला कल्पनाच नव्हती !

हॉवर्ड—क्षमा करा ! विचार न करतां बोललों मी ! पण कप्तान ! माझा प्रश्न विचारांत घ्या ! जहाजावरून बिनतारी संदेश पाठवून मी सभा पुढे ढकलूं शकतों, नाही असें नाही ! पण बोर्डाच्या ह्या योग्य वेळीं होणाऱ्या बैठकीवर पन्नास हजारांचा प्रश्न अवलंबून आहे ! पन्नास हजार पौंड ! कप्तान ! तुम्ही आणि मी दोघेहि मानवप्राणीच आहोंत ! तुम्हांला माझं मन निश्चित कळत असेल. हिंदुस्थानांत मी रात्र की दिवस, हें सुद्धा प्रवास करतांना पाह्यलं नाही. औपचारिकपणेंच साऱ्या भेटी उरकल्या, कुठे चहापार्टीला देखील गेलों नाही ! कशासाठी हें सारं केलं मी ? चोवीस तारखेची सभा टळूं नये, म्हणूनच ना ?

कप्तान (विचार करीत)— तारीख तेवीसला आपण मार्सेलिस गाठूं; रात्रीच्या रात्रीं तुम्ही पॅरिसला जाऊं शकाल ! पॅरिस ते लंडन हा शेवटचा टप्पा विमानानें जा ! मिस्टर हॉवर्ड ! सभा सुरू व्हायच्या सुमारास कां होईना, पण

आपण इच्छीत स्थळीं जाऊं शकाल, असं वाटतं मला !

हॉवर्ड—पण इतकं सारं सुरळित होईल का ? कुठे कमी ज्यास्त वेळ मोडला, म्हणजे साराच ग्रंथ आटोपला !

कप्तान (लिहीत)—मी स्मरणवहींत मुद्दाम लिहून ठेवतों आहें. तुम्ही बोर्डाची बैठक तात्पुरती तहकूब करावी व तसा संदेश पाठवावा, असं जर मला उद्यांपर्यंत वाटलं, तर मी तुम्हांला स्मरणपूर्वक तसें—

[दार ठोठावल्याचा आवाज येतो]

या आंत !

[मिसेस् लेटन येते. तिचें तीस वय असून ती असीम दु:खांत असल्याचें तिचा चेहरा सांगत आहे; तिच्या हातांत बिनतारी संदेशाचा कागद आहे]

मिसेस् लेटन—ते मला इथे येऊं देत नव्हते; मला अडवायचा प्रयत्न केला त्यांनी !

कप्तान—(उठून उभा रहात) साहजिकच आहे तें ! त्यांना त्यांचं कर्तव्य करायलाच हवं !

लेटन—(संदेशाचा कागद पुढे करीत) मी त्यांना हा कागद दाखवला.

[कप्तान तो संदेश घेऊन वाचून पहातो]

लेटन (हॉवर्ड उठून उभा रहात असतांना त्याला उद्देशून)—मिस्टर हॉवर्ड ! माझ्या मुलाबद्दल संदेश आहे तो ! तो आजारी आहे, म्हणूनच त्याच्याकडे जायला निघालें मी ! आणि आता हा संदेश आला की, त्याला......... मेनिन् जाय्टिस् !!......वातांत सारख्या मला हांका मारतो आहे !!......मला हांका मारतो आहे !!!—कप्तान ! अजून मी तिथे लवकर गेलें, तर आशा आहे, असं डॉक्टरांचं मत आहे, हें आहेच त्या संदेशांत !

कप्तान (तिला आधार देत डेस्कजवळच्या दुसऱ्या खुर्चीत तिला नेऊन बसवतो)—बसा इथें मिसेस्...(हातांतील संदेशावरील तिचें नांव वाचून संदेशाचा कागद तिच्या हातीं देत) लेटन !

लेटन—आणि किती हळू चालतं आहे हें जहाज ! हा प्रवास लवकर संपूंच नये, असंच कां सगळ्यांना वाटायला लागलं आहे !

कप्तान—मिसेस लेटन ! सर्वांना प्रवास केव्हा सरतो, असं झालं आहे. प्रत्येकाची कारणें वेगळीं, तुमच्या इतकं सबळ कारण मात्र कुणाचं नसेल ! प्रत्येकजणच प्रवास केव्हा आटोपतो, याची चिंता करतो आहे, मिसेस लेटन !

हॉवर्ड—माझे पन्नास हजार पौंड इरेला पडले आहेत. प्रश्न फक्त पैशाचाच आहे, तरीहि—

कप्तान—कर्तव्य म्हणून मला प्रवास वेळेवर आटोपलाच पाहिजे. नाताळचें टपाल योग्य वेळीं पोहोचायलाच हवं ! अर्थात् तुम्हा लोकांच्या मानाने हें कारण महत्त्वाचं नाही; सांगितलं एवढ्याचकरतां की, जहाजावरील प्रत्येक नोकर प्रवास वेळेवर उरकायच्या फिकीरींत आहे, हें तुम्हांला पटावं !

लेटन—मला माहीत आहे तें ! मी शक्य तितक्या विचारपूर्वकच वागतें आहे, पण त्या वादळाने गोंधळ केला आणि हा प्रवास केव्हा सरणार, याची माहिती कुणालाच नाही ! कांहींना ठाऊक असून ते सांगत नसतील ! पण कप्तान ! आपण .... मला आपल्याकडेच येणं भाग पडलं ! कप्तान !......माझा मुलगा !......तो भयंकर संदेश ......!

हॉवर्ड—मिसेस् लेटन ! औषधीशास्त्र व शस्त्रक्रियाशास्त्र ह्यांची केवढी तरी प्रगति ह्या युगांत झालेली आहे ! तुम्ही डॉक्टरांवर अवलंबून......

लेटन—मुलगा माझ्या नावाचीं पारायणें करतो आहे, मिस्टर हॉवर्ड !

कप्तान—त्यांनी तुम्हांला हें कळवायलं नको होतें ! तुम्ही तिथे केव्हा जाऊन पोहोचाल, हें तुम्हांला डॉक्टरांना कळवायचं आहे ना ?

लेटन—म्हणूनच मला आपली भेट घ्यावीच लागली कप्तान !

कप्तान—अगदी खरं आहे ! तथापि मिसेस लेटन, लांबचा समुद्रप्रवास म्हटला की, त्यांत अनिश्चितता तेवढीच निश्चित असते ! हें जर आपण लक्ष्यांत ठेवाल, तर मी तुम्हांला थोड्याशा आत्मविश्वासाने सांगूं शकेन की, तेवीस तारखेला संध्याकाळपर्यंत मार्सेलिसला पोहोचायला मला हरकत दिसत नाही ! आपल्या जहाजाचा वाद-

ळाने जो खोळंबा केला, त्याचं उट्टं आपण रोज थोडा थोडा वेळ भरून काढीत काढतोच आहों! एवढं लक्ष्यांत ठेवा, मिसेस लेटन की, आपल्या मुलाच्या बिछान्याशेजारीं आपण केव्हा जाऊन पोंहोचतां असं मलाहि झालेलं आहे.

लेटन—किती सहृदय आहां, कप्तान, आपण!

कप्तान (दरवाजाकडे जातांना)--आता तडक तुम्ही संदेशघरांत जा आणि ताबडतोब संदेश रवाना करा! मध्यंतरीं पुन्हा एखादा संदेश आला, तर मी असेन तिथे मला गांठून अवश्य कळवा! यापुढें मला भेटायला येताना आपणाला कुणीहि अडथळा करणार नाही! जा आतां.

[ती जायला निघते. कप्तानने दरवाजा उघडल्याबरोबर एक हिंदी खलाशी आंत येतो. त्याच्या वेषारून तो जहाजावरील कोळसेवाला—एंजिनच्या भट्टीला कोळसे पुरविणारा आहे, हें कळतें. त्याचे सारे कपडे काळे व फाटके आहेत आणि त्याचे हात, तोंड वगैरेवर कोळशांचा काळेपणा मुक्काम करून आहे. धोक्याच्या प्रसंगीं जीव वांचविण्याकरिता उपयोगी पडावी, म्हणून जीं अनेक मोठीं रबरी वलयें जहाजावर असतात, त्यापैकीं एक त्याने आपल्या खांद्यामोंवती बांधून टाकलेलें आहे.]

कप्तान (मान वळवून तो मिसेस् लेटनकडे पहात असल्यामुळे त्याला हा हिंदी खलाशी आंत आलेला प्रथम कळत नाही. परंतु मिसेस् लेटनच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित झालेला विस्मय पाहून तो दरवाजाकडे पहातो व त्याला हा कोळसेवाला दिसतो) कुणाच्या परवानगीने तूं इथे आलास? कुणी आंत सोडलं हें...... हें डुक्कर!

कोळसेवाला हिंदी खलाशी (दार लावून घेतो)—तें रहस्य तसेंच राहूं द्या. (पिस्तुल दाखवीत) कृपा करून सर्वांनी हात वर करा. कप्तान! डेस्कपासून दूर व्हा! नोकर बोलवायच्या घंटा असतील तिथे! किंवा इषारा द्यायचा दुसरी एखादी युक्तीहि डेस्कवर असण्याचा संभव आहे.

[तिघेहि हात डोक्यावर उंच धरून उभे राहतात. कप्तानचा चेहरा मुळींच गोंधळलेला दिसत नाही. कोळसेवालाहि आवाज मुळींच न चढवतां चेहरा सस्मित ठेवूनच बोलतो.]

कप्तान—काय पाहिजे इथे तुला?

कोळसेवाला—इथे? ब्रिटिश साम्राज्याच्या ह्या प्रतिनिधीच्या ह्या महालांत?—मला इथे एका कल्पनेला स्वातंत्र्य द्यायचें आहे.

हॉवर्ड (तोंडांत चिरूट तसाच ठेवलेला असल्यामुळे धुरामुळे बिचारा गुदमरायची वेळ येते.) —हा चिरूट हातांनी तोंडांतून काढून टाकूं कां?

कोळसेवाला (चेहरा ज्यास्तच हंसरा करून)— हात न लावतां तसाच तो जमिनीवर टाका आणि मग बुटाने चिरडा त्याला. एवढीच परवानगी देतों मी तुम्हाला!

हॉवर्ड (तसें करतांना)- सुटलों म्हणायचा!

कोळसेवाला—ह्या स्त्रीने त्या बाकावर बसायला हरकत नाही.–आणि तुम्ही दोघं हात खालीं केलेत तरी चालेल. पण मग दुमडून दोन्ही तळहात हाताच्या कोपरांना स्पर्श करतील, असे ठेवा. (ते तसें करतात) बरंच बोलायचं आहे मला!

कप्तान—कितीहि बोलणें झालें, तरी सशस्त्र बंड ह्या कलमाखालीं दिली जाणारी दहा-पंधरा वर्षांची सक्तमजूरी टळणें शक्य नाही.

कोळसेवाला—ह्या जड जगाप्रमाणें मानसिक जगहि असतें. सक्तमजुरीचें काय महत्त्व? देहाचे हाल म्हणजे मनाचे हाल, असं नाही!

हॉवर्ड (थोडें खोकल्यासारखें करून)--कप्तान! ह्याचं डोकं ताळ्यावर नाही! तेलावर चालणाऱ्या एंजिनच्या खोलींत डोक्यावर परिणाम होईल इतकी उष्णता असूं शकते का? मला वाटे—

कोळसेवाला—मी मानसिक उन्नतीचा अप्रत्यक्ष उल्लेख केला, तेवढ्यानेहि तुम्ही मला माथेफिरू समजावं, ह्यांत तसं नवल नाही!— आणि, आता अगदीं वेळ भरली तेव्हा तुम्हांला एंजिनच्या खोलीची आठवण व्हावी, हेंहि साहजिकच आहे!

कप्तान—मिस्टर हॉवर्ड! आपलं हें जहाज कोळशावर चालणारं आहे!

कोळसेवाला—(हॉवर्डला) आदराने मी आपल्यापुढे नम्र होत आहे. (किंचित् वांकतो,

पण तेवढ्यांतच हॉवर्ड त्याच्या अंगावर तुटून पडण्याच्या इराद्याने हालचाल करतो) हां! एकदम मागे–हें पिस्तुल पश्चिमेनें बनवलं पण पूर्व तें वापरूं शकते, हें विसरूं नका! (हॉवर्ड मागें होतो) आमचं दुर्दैव आहे हें!! कांहीहि पूर्व-तयारी नसतां पश्चिमेचीं शस्त्रें पूर्वेला क्वचित् वापरावीं लागतात.

हॉवर्ड (कोळसेवाल्याकडे दुर्लक्ष करीत)—तुमचं एंजिन कोळशावर चालतं का तेलावर, हें जाणून घ्यायला मी मोठा आतुर झालों होतों, असं नाही कप्तान! मी अशा उद्देश्यानें म्हटलें...

कप्तान—ह्याला पकडल्याशिवाय आपण रहात नाही. प्रश्न फक्त थोड्या फार कालाचा आहे!

कोळसेवाला—खरं आहे! योग्य वेळींच कार्य करण्यांत जयाची आशा असते.

लेटन—हा कोळसेवाला आहे, हें खरंच वाटत नाही. ह्याचे उच्चार, भाषा–विचार...

कोळसेवाला—बुद्धिमान् सभ्य स्त्रिये! मी तुमच्याच केंब्रिज विश्वविद्यालयाचा एम्. ए. आहे!

कप्तान—मग हें कोळसेवाल्याचं काम कां पतकरलंस्?

कोळसेवाला—तुम्ही आम्हांला अर्पण केलेल्या नवीन संस्कृतीचा आणि सुधारणांचा अभ्यास करतों आहें मी! माझे हिंदी बांधव, आम्ही पूर्वेकडील लोक कोणतें जीवन जगत आहों, हें त्या एंजिनच्या खोलींत मला कळलें!

हॉवर्ड—मला आशा आहे की, तें जीवन तुला मनपसंत वाटलं असेल?

कोळसेवाला—तिरस्कार आला मला त्या आयुष्याचा! तुम्हां पांढऱ्या कातडीच्या लोकांच्या जहाजाच्या भट्या माझे देशबांधव तिथे घामाने निथळत जळत ठेवताहेत! त्यांचीं मनं सुद्धा तुम्ही मारून टाकलेलीं आहेत. तें तसं प्रेताचं आणि गुलामाचं जीवन माझे हिंदी बांधव जगत आहेत!—भेकडांनो! तुमचीं जहाजं त्यांच्या ताब्यांत आहेत, हें तुम्हांला पक्कं ठाऊक आहे. हें सत्य तुमचा थरकांप करतं, म्हणून तर तुम्ही एंजिनच्या खोलीकडे कधी फिरकत नाही.

कप्तान—जहाज माझ्या ताब्यांत नाही!!

कोळसेवाला—भट्टींत कोळसा पडला नाही, तर कप्तान, आपल्या आज्ञेप्रमाणें जहाज गती घेईल का?

हॉवर्ड—असं! असं! तुमच्यांतहि तें समाजसत्तावादाचं वेड शिरलेलें आहे म्हणायचं! ह्या मूर्ख लोकांना आम्ही एम्. ए. पर्यंत शिकायची परवानगी देतों आणि हीं गाढवं त्या दुसऱ्या गाढवांचं अनुकरण करून ओरडायला आणि लाथा झाडायला लागतात. खरं म्हणजे...

कोळसेवाला—समाजसत्तावादाला तर तुम्ही धन्यवाद दिले पाहिजेत. आम्ही हिंदी लोक, निग्रो, चिनी जनता ह्यांच्या एकींत तुम्हां लोकांचा सत्यानाश किती संपूर्ण आहे, हें त्या ढगामुळेच तर तुम्हांला दृष्टिआड करतां येतं. एक दिवस असा उगवेल कीं, निग्रो आणि आमचे चिनी बांधव ह्यांच्या मदतीने... ...

कप्तान—तूं माझ्या जहाजावरील इतर काळ्या लोकांना त्यांच्या कर्तव्यापासून दूर रहायचा उपदेश करीत होतास,–त्यांना चिथावणी देत होतास–हें खरं की नाही?

कोळसेवाला—त्यांचा मी शिक्षक बनलों, पण माझें कांही एक ऐकायला ते तयार नाहीत.

कप्तान—त्यांचा अभिमान वाटतो मला!!

कोळसेवाला—तुम्ही बळी घेतला आहे त्यांचा! त्यांचीं मनं ताब्यांत घेतलीं आहां तुम्ही! पांढरी कातडी काळ्या कातडीपेक्षा श्रेष्ठ असं त्यांना देखील मनापासून वाटतं!! पांढरे लोक काळ्यांपेक्षां श्रेष्ठ...

हॉवर्ड—खरंच पागल आहे हा!–मग काय काळे लोक जास्त श्रेष्ठ? अहो हिंदुस्थान–महाराज! मी म्हणतों......

कोळसेवाला—थोड्याच वेळांत मी कप्तानाला एक हुकूम देणार आहे. हें जहाज थांबवायला सांगणार आहे मी त्याला! कप्तान! हुकूम माझा आपल्याला मान्य करावाच लागेल!!!

कप्तान—हा तमाशा, ही गुंडगिरी फार वेळ चालूं राहायची नाही!

कोळसेवाला—फार वेळ चालली नाही, तरी मला पुरेसा वेळ मिळेल, त्याबद्दल मला शंका

नाही ! ही सकाळची वेळ सहेतुकच निश्चित केली मी !

हॉवर्ड—कप्तान ! तो काय म्हणाला, ऐकलंत् ना ? जहाज थांबवायचं····· ती बोर्डाची बैठक आता······

कप्तान—कांही काळजी करूं नका तुम्ही ! योग्य वेळीं ह्याचा बंदोबस्त होईल.

कोळसेवाला—कुणालाच कांही कारण नाही काळजी करायचं !–आमची जीविताकडे बघायची दृष्टि तुमच्या पेक्षां वेगळी आहे, अगदी निराळी आहे. म्हणूनच आमचें सामर्थ्य तुमच्यापेक्षा अधिक आहे. माझं स्वतःचं हें आयुष्य म्हणजे माझ्याच चिरजीवनांतील एक बिंदु, असं मी मानतों ! आमचं बल तुमच्यापेक्षा अधिक कारण आम्ही मृत्युला भीत नाही. आणि, तुमच्या बायबलमध्ये आहे कीं पैसा आणि काल एकच ! Time is Money !

लेटन—बायबलमध्ये नाही तें !

कोळसेवाला—नेहमीच माझा असा गोंधळ उडतो. तुमचे आचारविचार आणि तुमचा तो धर्मग्रंथ यांचा कांही एक संबंध नाही हें मी विसरतोंच ! तुमचं बायबल चिरजीवन मान्य करतं आणि तुम्ही असं वागतां कीं·····

हॉवर्ड—मी पक्का व्यवहारी मनुष्य आहें. वेळेचें मूल्य पैशाने मोजतों मी ! माझे पांच हजार पौंड ···!!····बोल ! तुझ्याशीं सौदा करायला राजी आहें मी !···किती हवेत तुला ?

कोळसेवाला—पैशाने सगळ्या गोष्टींची किंमत करतां तुम्ही ! जें डोळ्यांनी दिसतं, तेवढंच महत्त्वाचं मानतां···मी जहाज थांबवणार, हें ऐकून तुम्ही कासावीस व्हावं, ह्यांत आश्चर्य मुळींच नाही !

हॉवर्ड—खरं आहे तुझं म्हणणं, पण···!

कोळसेवाला—कप्तान ! जहाज थांबवा !!!

कप्तान—मी झोपेंत वावरतों, अशी का तुमची कल्पना आहे ?

कोळसेवाला—तुमची दुर्बलता कुठे आहे, हें मला ठाऊक आहे ! ह्या नश्वर देहाला तुम्ही अमोल समजतां ! मी आतां समुद्रांत उडी टाकली कीं मला वांचविण्यासाठीं तुम्ही जहाज थांबवालच ! कप्तान ! नकळत तुमच्या मुखांतून तो हुकूम बाहेर पडेल.

हॉवर्ड—कप्तान जहाज थांबवील, असं वाटतं तुला ? तुझ्यासारख्या आत्महत्या करणाऱ्या माथेफिरूला वाचाविण्यासाठीं तो...

लेटन—कप्तान ! जहाज थांबवूं नका, तुम्ही ! आपले किती तरी तास मोडतील त्यांत !

कोळसेवाला—जहाज थांबेल ! थेम्स् नदींत आपण होऊन जीव देणाऱ्या व्यक्तीला वाचविण्यासाठीं तिथले पोलीस जशी आटापिट करतात, तशी हा कप्तान करीलच !

हॉवर्ड—त्या पोलीसांचं कर्तव्य ते करतात, पण तुझ्या बाबतींत... ...

कोळसेवाला—जहाज थांबेल ! तुमची मानवी आयुष्याकडे पहावयाची दृष्टी आम्हांला अपरीचित नाही ! कप्तान जहाज थांबवीलच ! ब्रिटिश साम्राज्याच्या ह्या तरत्या तुकड्याचा हा बादशहा जहाज थांबवील ! आम्हां पूर्वेकडील लोकांचं सामर्थ्य कशांत आहे, हें तुम्हांला आणि एंजिनच्या खोलींतल्या त्या गुलाम बनलेल्या माझ्या देशबंधूंना मी पटवून देणार आहे !

कप्तान—अजून तें पटवून दिलेलं नाहींस !!

कोळसेवाला—कप्तान ! वायफळ बकवा करणारा दिसतो का मी ?

लेटन—(कोळसेवाल्यास) माझा मुलगा मृत्युशय्येवर आहे, माझ्या नावानं टाहो फोडतो आहे. वातांत माझं नांव घेऊन किंचाळतो.... हा बघ संदेश ...बघ... !!

कोळसेवाला—आत्मा अमर आहे !!!

लेटन—माझा मुलगा ! माझा...एकुलता एक (घेरी आल्याचा अभिनय करते) ...कप्तान ! ......पाणी !......पा...णी !!......

कप्तान—(कोळसेवाल्यास) त्या भांड्यांत पाणी आहे; देऊं का तिला ?

कोळसेवाला—त्या कोपऱ्यांत जा तुम्ही दोघं. तिथं उभे रहा ! तिला पाणी मी देतों !

[पाणी ओतीत असतांना पिस्तुल हॉवर्ड व कप्तान ह्यांच्याकडे रोखून धरतो. मिसेस् लेटन कोळसेवाल्याच्या नकळत कप्तानाला खूण करते.

कोळसेवाला पाण्याचा ग्लास तिच्याकडे घेऊन जातो; ती घोट प्यायला लागते.

लेटन—पुष्कळ हुषारी आली आतां...... ......माझ्या पायावर......

[उठून उभी राहते व पाण्याचा ग्लास तोंडाजवळ नेते. तथापि दुसऱ्याच क्षणीं ग्लासांतले पाणी ती कोळसेवाल्याच्या तोंडावर फेकते. हॉवर्ड व कप्तान कोळसेवाल्याच्या अंगावर चाल करून जातात, पण चपळाईने तो पुन: पिस्तुल रोखतो आणि ते दोघे माघार घेतात.]

कोळसेवाला—मी सांगतों, ह्या बाईला चित्रपट पहायचं व्यसन आहे. पश्चिमेकडील सुधारणांची ती शाखाहि मलाहि अनोळखी नाही !!

कप्तान—मिसेस लेटन ! आपलं प्रसंगावधान अपूर्व आहे !

लेटन—माझ्या मुलाकरता......

कोळसेवाला—बाईसाहेब ! आपला मुलगा वाचला तर, फार मोठ्या जागतिक घडामोडी त्याला बघायला सापडतील. पांढऱ्या लोकांनी स्वार्थी हेतूने खांद्यावर घेतलेलें काळ्या लोकांच्या सुधारणेचें ओझें त्यांना असह्य झालेलें तो पाहील !— बाईसाहेब ! उद्धटपणा, मग्रुरी, खोटा आत्मविश्वास हीं तुमची वैशिष्ट्यें ! तीं वैशिष्ट्यें नामशेष झालेलीं तुमच्या मुलाला कदाचित् दिसतील. तुमचं वैभव म्हणजे पैसा, तुमचं सुख म्हणजे पैसा ! तुम्ही मृत्युला भिता, कारण तो तुमचा पैसा हिरावून घेतो, तुम्ही वेळेचे गुलाम आहां, कारण प्रत्येक क्षणाचा उपयोग तुम्हांला पैसा मिळविण्यासाठीं करायचा असतो. पांढऱ्या लोकांनी उराशी बाळगलेलं हें भयाण तत्त्वज्ञान धुळींत मिळालेलं तुमच्या मुलाला दिसेल, बाईसाहेब ! पृथ्वीचे मालक पांढरे लोक ही कल्पना कदाचित् त्यालाहि पटणार नाहीं !

हॉवर्ड—कप्तान ! वेडा मनुष्यसुद्धां तत्त्वज्ञानाविषयीं बोलूं शकतो बरं !

कोळसेवाला— आणि, एखादीच लहानशी कृति करतो, पण त्यामुळें तुम्हां शहाण्या लोकांचा मोठा पराभव होतो. वेळेला परमेश्वर मानणारे लोक तुम्ही; किती तरी पहिल्या वर्गाच्या उतारूंचा नाताळ माझ्या माथेफिरूपणामुळे—

हॉवर्ड — हलकट ! पाजी ! – नीच !

कोळसेवाला— तुमचे सण आम्हांला पाठ आहेत; तारखाहि समजूं शकतात आम्हांला नाताळ हा तुमचा उत्सव– शांतीचा उत्सव आहे तो,हो ना? केवळ हा एक तास मी माथेफिरूपणा केला कि, तुमचा तो उत्सव अशांत मन:स्थितीत तुम्हांला घालवावा लागेल. आफ्रिकेंत, हिंदुस्थानांत सगळिकडे काळे लोक म्हणतील,“ आश्चर्य आहे; त्या एका कोळसेवाल्यानें कुणाच्याहि मदतीशिवाय पांढऱ्या लोकांचें एक जहाज अडवले. पांढऱ्या लोकांना पाठविलेले सारे शुभसंदेश अशुभ ठरले. त्या कोळसेवाल्यानें संघ स्थापन केला नाही की, संप पुकारला नाही. तो एकटा होता, पण जीवावर उदार झालेला होता; म्हणून तर विजयी झाला ! ”— सगळे काळे लोक हेंच म्हणतील !

लेटन—कप्तान ! कसला विचार करीत आहां, आपण ! कांहीच बोलत नाही तुम्ही ! थांबवाल तुम्ही जहाज ? पराभव होईल तुमचा ? ह्या वेड्याचा प्राण माझ्या शहाण्या मुलाच्या प्राणापेक्षा अधिक मोलाचा वाटेल तुम्हाला ?...आपल्याला त्याला वाचवतां येईलच, असं कसं म्हणतां येईलें ? तो तर आपले लोक जवळ गेले कीं मुद्दाम दूर पळेल ! आणि......

कोळसेवाला—(प्राणसंरक्षक रबरी वलयावर टिचक्या मारीत) तुम्हां पांढऱ्या लोकांचा हा शोध मला बुडूं देणार नाही, असं तुम्हां पांढऱ्या लोकांनाच वाटत नाही का ?

हॉवर्ड—अरे, मला वाटलं, तुला जीवाची पर्वा नाही ! आत्मा अमर आहे ना ?

कोळसेवाला—हें कडं मी मुद्दामच वापरतों आहे. कप्तानची मदत मला मिळेपर्यंत मी जिवंत राहूं शकेन, हें कप्तानलाच कळेल ! अर्थात जहाज थांबवणं भाग आहे त्याला !—आणि, आत्मा अमर असला तरी माझ्या देशबांधवांना हें माझें तत्त्वज्ञान शिकविण्याकरीता मला जगलेंच पाहिजे !

लेटन—माझा मुलगा तिकडे तो आणि ......इकडे !

कप्तान—मिसेस लेटन ! तुमच्या मुलाभोंवतीं स्टर आहेत त्याला वाचवायची खटपट करायला!

लेटन—तो मला हाका मारतो आहे !

कप्तान—सगळ्यांनाच प्रवास लवकर संपायला हवा आहे !

कोळसेवाला—मला नको आहे. तुम्ही इतके-जण व तुमच्याविरुद्ध मी एकटा ! पण पराभव होणार तुमचा !

हॉवर्ड—कप्तान ! मिसेस् लेटनसाठी तरी तुम्हांला ह्या वेड्याकडे दुर्लक्ष्य केलें पाहिजे ! मरूं द्या त्याला !

[थोडा वेळ कुणी कांहीच बोलत नाही]

कोळसेवाला—ब्रिटिश साम्राज्याचा हा प्रतिनिधी गोंधळला आहे ! विचार करणं त्याला भाग पडलं आहे.

हॉवर्ड—वेडा ! वेडा ! वेडा ! वेडा आत्महत्या करीत आहे ! मूर्ख मनुष्या ! हा तमाशा न करतां कुणाच्याहि देखत समुद्रांत उडी टाकली असतीस, तरी जहाज थांबलं असतं ! तुझ्या बडबडीमुळं कप्तानचा स्वाभिमान दुखविला गेला आहे ! जयापजयाची भाषा तूं बोललास ! कप्तान पराभूत होणार नाही, मी सांगतों !!

कोळसेवाला—माझी कल्पना इथें सत्यस्वरूप मी केली, माझा तर्क खरा ठरला ! तो आणि मी–कप्तान आणि जहाजावरील कोळसेवाला–पश्चिम व पूर्व-इथे समोरासमोर उभे राहून सत्याकडे बघत आहोंत ! पांढऱ्या लोकांच्या ह्या जहाजाचें ध्येय गती ! एक काळा मनुष्य ब्रिटिश साम्राज्याचा हा तरंगणारा तुकडा अगतिक करीत आहे ! कप्तान ह्या साम्राज्याचा मालक–विचार करतो आहे ! (हॉवर्डकडे बघत) दुसराहि एक मार्ग अजून आहे. अनायासें हा हॉवर्ड—मिस्टर हॉवर्ड–इथे उपस्थित आहे. पश्चिमेने तयार केलेल्या ह्या पिस्तुलाने मी ह्याला गोळी घातली, तरी—

हॉवर्ड—(भयभीत होऊन) काय ! काय म्हणालास ?...पण...

कोळसेवाला—घाबरूं नकोस ! त्यांनी मला तुझ्या खुनाबद्दल फांसावर लटकवलं, म्हणजे तुझ्या आत्म्याला शांति मिळेल ! आत्मा अमर आहे, मिस्टर हॉवर्ड ! पण घाबरूं नकोस, तसा आततायीपणा आम्हां भारतवासीयांत नाही. मी माझ्या पद्धतीनेच तुम्हांला पराभूत करणार आहे !

लेटन—कप्तान ! आपण अजुनही मूकच आहांत ? काय करणार आहांत आपण ?

कोळसेवाला—मी सांगतों, तो न बोलतां साडेदहा वाजायची वाट पाहतो आहे.

कप्तान—(त्रासिक मुद्रेने) धन्य आहे तुझी ! हेंहि तुला माहीत आहेच वाटतं ?

कोळसेवाला—बरोबर साडेदहाला कप्तानासाठी व्हिस्की आणि सोडा घेऊन नोकर येईल. कप्तानला वाटतं आहे की, तोपर्यंत मी असाच बोलत राहीन!, कप्तान! गैरसमज आहे तो आपला! हा मी चाललों; मी बाहेर जाऊन दरवाजा लावून घेईन. तुम्ही कुणीहि मी समुद्रांत उडी टाकपर्यंत खोलीबाहेर यायचं नाही. फक्त पाच यार्ड मला जावं लागणार आहे आणि दरवाजा उघडला गेला तर मी गोळ्या झाडीन !

[कोळसेवाला डाव्या हाताने दार उघडतो आणि उजव्या हातांतील पिस्तुल त्यांच्याकडे रोखीत दरवाज्याकडे पाठ करूनच खोलीबाहेर जायला लागतो. तो दरवाजा उघडत असतांना बाहेरून खोलीकडे येत असलेली शैला दिसते. आर्ची तिच्यामागे आहेच. दुसऱ्याच मिनिटांत शैला खोलींत पाय टाकते देखील ! कोळसेवाल्याची पाठ अजून दरवाज्याकडेच आहे]

शैला—कप्तान ! आम्हांला पुन्हा यावं लागलं, कारण···

[कोळसेवाला तिचा आवाज ऐकून एकदम दरवाज्याकडे वळतो व तिला दूर ढकलून खोली-बाहेर पळायचा प्रयत्न करतो]

कप्तान—अडवा त्याला ! जाऊं देऊं नका त्याला !

[कोळसेवाला खोलीबाहेर आल्याबरोबर आर्ची त्याला पकडतो. दोघेहि झटापट करीत खोलींत येतात. कप्तान व हॉवर्ड आर्चीच्या मदतीला धावतात. एक मिनिट खूप झटापट होते व त्या

गोंधळांत पिस्तुल उडून आवाज होतो. अखर कप्तान आणि आर्ची कोळसेवाल्याचे दंड धरून त्याला उभा करतात. कप्तानच्या डाव्या हातांत कोळसेवाल्याचें पिस्तुल आहे.]

कप्तान—गोळी कुणाला लागली तर नाही ना?

हॉवर्ड—नाही!

आर्ची—(कोळसेवाल्यास) मी तुला हार जाणारा नाहीं! सकाळ संध्याकाळ क्रिडांगणावर धांगडधिंगा करणारा खेळाडू आहे मी, समजलास?

कप्तान—मिस्टर हॉवर्ड! दुय्यम अधिकाऱ्याला बोलवा. एक कैदी ताब्यांत घ्यायला ये, म्हणून सांगा!

हॉवर्ड—(धापा टाकीत) जातों मी.

[हॉवर्ड जातो.]

कप्तान—(शैलाकडे पहात) आपण का परत आलां, मला ठाऊक नाही, पण आल्याबद्दल आपले आभार मानतों मी!

शैला—कप्तान! आपल्या परवानगीशिवाय आम्ही पुन्हां इथे आलों, कारण—

कप्तान—मिस् पॅलॉन्ट! तुमच्या या परवानगीशिवाय येण्याने आमचा मोठा प्रश्न सुटला, हें मात्र खरं.

लेटन—कप्तान! मी……

कप्तान—आतां काळजीचं कांहीच वं नाही मिसेस् लेटन! माझ्या जहाजावर म खोलींत हा जो त्रास आपणाला झाला, त्य मी आपली क्षमा मागतों!

लेटन—कप्तान! एक प्रश्न विचारूं कां?

कप्तान—अवश्य!

लेटन—ह्या कोळसेवाल्याला त्याच्या इच्छेप्रमाणें वागणं शक्य झालं असतं, तर आपण जहाज थांबवलं असतं का? आपण पराभव मान्य केला असता का?

कप्तान—त्याचं आता काय महत्त्व? जाऊं द्या तें!

कोळसेवाला—ह्या खेळाडू इंग्रजानें मला पकडलं, प्रत्यक्षांत माझा पूर्ण पराजय झालेला आहे. कप्तान! आता त्या प्रश्नाचं उत्तर देण्याइतकं धैर्य व खेळाडूपणा आपणहि दाखवणं साहजिक होईल!

आर्ची—खेळाडू वृत्तीच्या इंग्रजाने एका हिंदी मनुष्याचा सहज पराभव केला!!

लेटन—कप्तान! खरंच सांगा, ज़हाज थांबवलं असतं कां तुम्ही?

कप्तान – (अत्यंत विचारी मुद्रेने) मिसेस् लेटन! माझं कर्तव्य मी केलं असतं!!!

पडदा

• • •

़पादकीय

लेखनाची ता. २७ नोव्हेंबर १९४७

चालू अंक

" युगवाणी ' चा नोव्हेंबरचा दिवाळी-अंक ़ारिहार्य अडचणीमुळे उशीरा निघत आहे, ़बद्दल मी दिलगीर आहें. ग्राहक व वाचक ़दार मनाने क्षमा करतील, अशी आशा आहे.

अंक उशीरा निघत असला, तथापि त्यांतील ़ाहित्य तज्ज्ञांस बहुमोल वाटेल, यावद्दल मला ़ंका नाही. या अंकासाठी ज्या ज्या लेखकांनी ़ेखन-साहाय्य केलें, त्यांचे मी मन:पूर्वक ़ाभार मानतों.

कै. न. चिं. केळकर

कै. न. चिं. केळकर यांस १४ ऑक्टोबर ़ोजीं एकाएकी देवाज्ञा झाली, हें सर्वांस ़िदितच आहे. केळकर हे अष्टपैलू लेखक होते. ़िशेषत: त्यांच्या तोडीचा ' शैलीकार ' मराठींत ़ुसरा झाला नाही, असें म्हटल्यास ती खचित अत्युक्ति होणार नाही. वृत्तपत्रकार म्हणूनहि ़्यांनी पहिल्या प्रतीचे यश संपादन केलें. असा ़ा श्रेष्ठ साहित्याचार्य दिवंगत झाल्याबद्दल "युगवाणी"स दु:ख होत आहे आणि ती त्यांस श्रद्धांजलि अर्पण करीत आहे.

वाचनालय परिषद

उमरावती-जिल्हा-वाचनालय-परिषद् ६ व ७ डिसें. रोजीं उमरावती येथें प्रा. न. र. फाटक यांच्या अध्यक्षतेखालीं भरत आहे. वाचनालयांचें महत्त्व केवढें आहे, हें नव्यानें सांगावयास नको. वऱ्हाड-मध्यप्रांतात उत्कृष्ट वाचनालयाचें दुर्भिक्ष्य असल्यामुळें अशा प्रकारच्या परिषदांचें प्रयोजन स्वयंसिद्ध आहे. स्थायि व फिरती वाचनालयें भरभक्कम पायावर निर्माण होण्यास ही परिषद चालना देईल, अशी उमेद आहे.

नियतकालिकांचें स्वागत


चालू वर्षी ' मौज ', 'अभिरुचि', ' नवयुग ', 'जयहिंद' , 'सह्याद्री' , 'किर्लोस्कर' , 'स्वदेश' , 'प्रतिभा' , 'पुढारी' – इत्यादि नियतकालिकांचे दिवाळी-अंक निघाले असून ते ' युगवाणी ' कडे वा व्यक्तिश: मजकडे आलेले आहेत. हे सर्वच अंक आपापल्या परीनें वाचनीय आहेत. त्याबद्दल या सर्व नियतकालिकांच्या संपादकांचे मी अभिनंदन करतों.

पुणें येथे ' नवभारत ' व नागपूर येथे ' पूजा ' हीं नवीं मासिकें निघालीं आहेत, त्यांचे मी स्वागत करतों व त्यांस दीर्घायु चिंतितों.

* * *

" युगवाणी " (Yugawani)　　　　Regd. No. N 945

मध्यप्रांत वऱ्हाड शाळाखात्याने आपल्या ता. ११-१-४७ च्या ऑर्डर नं. 104/Genl I A
अन्वयें ' युगवाणी ' मासिकास लायब्ररीसाठी मंजुरी दिली आहे.





द. ना. टाकूर यांनी टाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून ' युगवाणी कार्यालय १९, ४२९ मुधोळकर पेठ अमरावती, येथे प्रकाशित केले.